युवकांसाठी पर्यटन क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्या म्हणून द्वितीय चरणाची घोषणा करून पूर्ण जगभर त्याचा प्रचार प्रसार करण्यात येणार आह. ५०० करोड रुपये खर्च करून १४,००,००० ICDS अंगणवाडी केंद्र सुरु करण्यात येणार आहे. ह्यामुळे एकाच ठिकाणी महिलांना सक्षम करण्यासाठी, त्यांचा कौशल्य विकास होण्यासाठी Digital Literacy, स्त्रियांचे आरोग्य व आहार. रोजगाराच्या संधी या सगळ्या गोष्टी यांना केंद्राच्या माध्यमातून एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. महिलांसाठी आणखी एक चांगली गोष्ट त्या

अंदाजपत्रकात आढळते, ती म्हणजे बाळंतपणासाठी प्रत्येक गरीब महिलेला ६००० रुपये, दिल्या जातील व ते परस्पर तिच्या बँक खात्यात जमा होतील त्यामुळे गर्भवती महिलेचे आरोग्य, तिचे बाळंतपण आणि होणाऱ्या बाळांचे लसीकरण ती या पैशातून करू शकेल. त्याचप्रमाणे गरीब जनतेला परवडतील अशी अल्प किंमतीत घर तयार करून देण्याचाही मानस ह्या अंदाजपत्रकात दिसतो. ह्या सर्व तरतुदींमुळे बालमृत्यू दर जो सध्या ३९ आहे तो ह्या अंदाजपत्रकातील तरतुदींमुळे २८ वर आणण्याचा action plan आहे. तसेच 'माता मृत्यूदर' २०११-१३ मध्ये तो १६७ होता, २०१८-२०२० पर्यंत तो दर १०० वर आणण्याचा प्रयत्न होणार आहे.

संपूर्ण देशाचा आर्थिक विकास होण्यासाठी दळणवळण विभागावर म्हणजेच रेल्वे, रस्ते आणि जहाज बांधणी ह्या सर्वांसाठी ह्या अर्थसंकल्पामध्ये २,४२,३८७ करोडची तरतूद केली आहे. त्या अंदाजपत्रकात एकूण भांडवल आणि विकासावर होणारा खर्च १३१.००० करोड हे निश्चित केले आहे. ह्या मध्ये सरकारकडून ५५,००० करोड रेल्वेच्या विकासासाठी मिळणार आहे. ३५०० कि.मी. नवीन lines टाकण्यात येणार आहेत एवढेच नाही तर २५ स्टेशनच्या पुनर्विकासासाठी ह्यात तरतूद केली आहे. ग्राहकांसाठी SMS वर आधारित 'Clean my Coach' ही सर्विस सुरु केली आहे . मेट्रोसाठी नवीन policy तयार करण्यात आली आहे की ज्यामध्ये एक आदर्श प्रमाणित व्यवस्था आणि त्याची अंमलबजावणी होण्यासाठी आर्थिक तरतूद केली आहे. ह्याशिवाय न्यू मेट्रोरेल्वे act तयार करण्यात येणार आहे जेणेकरून खासगी कंपन्या तसेच गुंतवणूकदारांचे सहकार्य होऊन बांधकाम विभागातील लोकांचा ह्यामध्ये सहभाग वाढवण्यात येणार आहे. रस्ते वाहतुकीमध्ये खास करून राष्ट्रीय महामार्गासाठी ५६९७६ करोड रुपयांची तरतूद २०१६-१७ च्या अंदाज पत्रकात केली होती. ती आता ६४९०० करोड करण्यात आली आहे .

TIER-२ शहरांमध्ये पप्प मॉडेलमध्ये गुंतवणूक केल्या जाईल. ह्या सर्वांमुळे नवीन नवीन उद्योग प्रस्थापित होतील आणि आर्थिक विकास जोमाने सुरु होण्यास मदत होईल.

ह्या अर्थसंकल्पाचे आणखी एक वैशिष्ठ म्हणजे Foreign Investment Promotion Board (FIPB) हे संपुष्टात आणले आहे. आणि त्याएवजी liberalization of FDI पॉलीसीचा विचार करण्यात आलेला आहे. विदेशी थेट गुंतवणूकदारीचा मार्ग सोपा होईल ही अपेक्षा औद्योगिक जगतातून व्यक्त केली जात आहे.

२०१७-१८ मध्ये 'इंद्रधनुष' संकल्पने अंतर्गत १०,००० कोटींची पूर्णभांडवलाची बँकांसाठी तरतूद केली आहे. प्रधानमंत्री मुद्रा योजने अंतर्गत २.४४ लाख कोटींची कर्ज समाजातील दलित, आदिवासी, मागासवर्गीय तसेच महिलांसाठी देण्याची तरतूद केली आहे . सरकार emarket च्या माध्यमातून वस्तू आणि सेवा स्वीकारणार आहे. (procurement) मुख्य टपाल कार्यालयातून पासपोर्ट निगडीत सेवा देणार त्यामुळे बंद पडत चाललेली टपाल कार्यालये जिवंत राहतील.

सैन्यदलांच्या निवृत्तीधाराकांची पेंशन सुद्धा इलेक्ट्रोनिक किंवा वेबच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. सर्व व्यवहार पारदर्शक होण्याच्या दृष्टीने हे पाऊल अत्यंत महत्वाचे आहे.

राज्य आणि केंद्राशासित प्रदेश आणि

विधीमंडळ ह्यांना सर्व माध्यमातून येणारा पैसा हा २०१६-१७ मध्ये ३.६० लाख कोटी होता तो आता ह्या अर्थसंकल्पामध्ये ४.११ लाख कोटी करण्यात आला आहे.

सार्वजनिक गुंतवणूकीची व शाश्वतकर्जाचे लक्ष्य यांच्यातील समतोल साधत असतांना FRBM समितीने येणाऱ्या ३ वर्षाकरिता राजकोषीय तुटीचे प्रमाण ३ प्रतिशत असावे अशी शिफारस केली असून २०१७-१८ वर्षाकरिता हे प्रमाण GDP च्या ३.२ प्रतिशत असावे असे सूचविले आहे.

महसुली तुट २०१६-१७ मध्ये २.३% होती ती कमी करून २.१% अंदाजित करण्यात आली आणि पुढल्या वर्षी साठी ती FRBM Act प्रमाणे २% अनिवार्य केलेली आहे. परंतु भारतानी मात्र महसूल तुट पुढच्या वर्षासाठी १.९% करण्याचे ध्येय ठेवले आहे. ८ नोव्हेंबर ते ३० डिसेंबर २०१६ मध्ये २ लाख ते ८० लाख गुंतवणारे जवळपास १.०९ करोड खाते तयार झाले ज्यामध्ये सरासरी Deposit हे ३.३१ करोड असे आहे.

हे सर्व होण्यासाठी मुळात राजकीय पक्षांना जो निधी दिला जातो त्यामध्ये स्पष्टपणे पारदर्शिकता आणण्याची गरज आहे. त्यासाठी cash donation घेताना एका व्यक्ती कडून फक्त रू. २००० देणगी घेता येईल अशी अट घातली आहे. ह्यापेक्षा जास्त देणगी cheque वा digital माध्यमातून ते देणगी स्वीकारू शकतात. त्यामुळे लोकशाही बळकट होण्यासाठी मदत होणार आहे.

वैयक्तिक उत्पन्न कर मर्यादा २.५ लाखांवरून ५ लाखांवर केली आहे. पूर्वी १०% कर लागत होता तर आता ५% लागणार आहे. या मुळे नागरिकांचे disposable income वाढणार असून त्याने अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

**४. समारोप :**

एकूणच भारतीय अर्थव्यवस्थेला एक सकारात्मक कलाटणी देणारा अर्थसंकल्प असे याचे वर्णन करता येईल. या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून अजून एक महत्वाची बाब समोर येते ती म्हणजे सरकारची धोरणात्मक सुसूत्रता. गेल्या २.५ वर्षापासून एका पाठोपाठ एक एकमेकाला पूरक असे धोरणात्मक निर्णय सरकारने घेतलेले आपल्याला दिसतात. अर्थसंकल्पाच्या यशाचे खरे गमक त्याच्या अंमलबजावणीत असते. आणि नेमके याच बाबतीत सर्वाधिक समस्या आपल्याला सतावत असतात. त्यामुळे या अर्थसंकल्पाची 'नियत' जरी योग्य असली तरी त्याची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी करण्यात या सरकारला किती यश मिळते हे बघण्यासारखे असेल.

◆◆◆

ISSN 2320-0197

# The Empirical Analysis of the Relationship between Agricultural and Industrial Sectors in India

**Samit L. Mahore**
Assistant Professor
P.G. Department of Economics,
RTM Nagpur University, Nagpur

Post-independence era Agricultural sector had made huge contribution in economic growth of the Indian Economy. Industrial sector also played an important role in making this success. It is conventional path of transition from agrarian economy to industrial economy which is followed by some developed economies. Some developing economies also followed rapid industrialization model of development. Now, Industrial sector becomes more favourable in enhancing the economy than the so called traditional sector. The dual economy model of development of Lewis influenced by development economists, it explains the development strategy aiming at the development of industrial sector and subsequent development of subsistence sector (Agricultural sector) in developing economy where labour is abundant. But some subsequent dual economy theories of Jorgenson (1990) and Thirlwal (1986) followed a neoclassical framework.

Indian economy has believed on dual economy model because of abundant supply of labour. Some economist like Lewis (1954), Nurkse (1955) and Ranis and Fei (1961) have argued in support of the existence of the surplus labour in Indian economy. Still agricultural sector is providing more employment in India. During the planning era government focused on the growth of both sectors. But the percentage share of both the sectors in GDP is decreasing. It may be due to the inefficiencies in terms of the old methods of the production, labour participation, limited capital inputs etc. Recently government is focusing on the growth of these sectors with some innovative policies like, Make in India, Startup India. Indian government has emphasised on the promotion of the MSME industries as a part of the make in India policy.

Post globalization structural changes have been made in the Indian

economy,because of these changes.It is observed that agricultural share continuously decreasing and industrial share is constant between 25 to 30 percent of the GDP. In the post-independence era the contribution of agricultural sector was highest as compared to other sectors. But after new economic policy agricultural sector is contributing fewer shares and industrial sector was unable to come out from a particular range. Figure 1 shows a clear picture of this. Number of studies have been conducted which show that agriculture sector is an engine of growth.

**Figure 1.**

**Agricultural and Industrial sectors share in GDP**




Source- National Informatics Centre (NIC), Ministry of Electronics & Information Technology, Government of India

**Review of Literature :**

With respect to the relationship between agricultural and industrial sectors, Hye (2009) finds that the agricultural sector plays a significant role in promoting modern sector to achieve economic development. The study investigates the dynamic link between the two sectors in Pakistan by employing ARDL cointegration approach proposed by Pesaranet. al. (2001) for the period of 1971 to 2007. He revealed that the sectors have a bidirectional relationship both in the short and long run. On the other hand, the industrial output only can influence the agricultural sector in the long run.

An oft-repeated refrain in the

development literature has been the "neglect" of the agricultural sector vis-à-vis the industrial sector in the development process of the less developed economies. Because infrastructure is crucially linked to both agricultural and industrial development, poor infrastructure development may make it appear that the slow agricultural growth has caused slow industrial growth. Further, in estimating the relation between agriculture and industry, the former should not be assumed to be exogenous; rather, this should first be established. Moreover, given the presence of nonstationarity conventional regression techniques may yield spurious regressions and significance tests. To circumvent these various problems, we study the cointegration of the different sectors of the Indian economy in a multivariate vector autoregression framework. (Kanwar, 2000)

Rangarajan (1982) has analyzes the effects of agricultural development on industrial expansion in the form of a model which shows that Indian agriculture has great influence on the growth and development of industries. This is verified by making a comparative analysis of growth rates in agriculture and industry. Accordingly, 1% growth rate in agricultural sector results in 0.5% rate of growth in industrial sector. The study further shows the effects of agricultural development on demand for agricultural consumption goods as well as on the output of basic and capital goods through savings and investments. Argues that both agricultural production and terms of trade have a definite impact on industrial development; but the effect of an increase in the output of food grains in terms of trade of the country's economy is negligible.

Tiwari and Kg (2010) examines static and dynamic causality among sectoral incomes of agriculture,industry, services and the total GDP of India for the period 1950-51 to 2008-09,employing Engle-Granger and Impulse Response and Variance Decompositionframework, respectively. Static causality analysis indicates that the service sector Granger causes industry sector and GDP and, the agriculture sector Granger causes service sector. Dynamic causality results show that contribution to GDP forecast error by the industrial sector is the highest, followed by agriculture and service sectors, while the contribution to the industry sector forecast error by GDP is the highest, followed by service sector and agriculture sector. In the case of the service sector, the

explanation power of one standard deviation innovation in the industry and agriculture sectors to theforecast error variance is quite high.

Hylmee Matahir (2012)investigates the agricultural-industrial sectors relationship in Malaysia for period from 1970 to 2009. He adopted the Johansen and Juselius (1990) cointegration procedure to examine the existence of long-run relationship and employed Granger (1969) and Toda-Yamamoto (1996) causality tests to test the causality direction between the sectors in the short and long run. From the empirical evidence reveals agricultural and industrial sector are cointegrated in the long run. In addition, the causal relationship shows that there is a one-way causality direction from industrial to agricultural sectors both in the short run and long run. Therefore, it support the notion that industrial sector might improve the agricultural sectors output.

**Data and Methodology :**

**Data :**

Present paper uses annual time series data of Agriculture and Industrial sector with their value added contribution in Gross Domestic Product (GDP) in terms of rupees covering the period from 1991-92 to 2012-13 in India with 2004-05 as the base year price. The data collected from the website of National Informatics Centre (NIC), Ministry of Electronics & Information Technology, Government of India. Agricultural and Allied sector includes the value added in Agriculture, Forestry, fishing, mining and quarrying while industrial sector which includes Industry, Manufacturing, Construction, Electricity, Gas and Water Supply.

**Methodology :**

**Unit Root Test**

Prior to proceed the causality test, unit root test should employ to determine the order of co-integration, I(d). Unit root tests provide information about stationarity of the data. Non stationarity data would contain unit roots. If we use the data without checking stationarity properties of the data, the model would produce spurious results.

**Autoregressive Distributed Lag (ARDL )**

Basic purpose of the stationary process is to examine the existence of long run relationship among data. This paper will employ the Autoregressive Distributed Lag (ARDL) model with single cointegration. It is introduced originally by Pesaran and Shin (1999) and further extended by Pesaran et al. (2001). The ARDL approach has the advantage that it does not require all

variables to be I(1) as the Johansen framework and it is still applicable if data have stationary with more order. Following ARDL Model is estimated for the present study.

$$y_t = m + \alpha_1 y_{t-1} + \beta_0 x_t + \beta_1 x_{t-1} + \beta_2 x_{t-1} + u_t$$

**Bounds Test :**

The bounds test method of cointegration has certain econometric advantages in comparison to other methods of cointegration. Such as, all variables of the model are assumed to be endogenous. Bounds test method for cointegration is being applied irrespectively the order of integration of the variable. There may be either integrated first order ? (1) or more and both short-run and long-run coefficients of the model are estimated simultaneously.

**Granger Causality Test**

To determine the causality test, this paper employs Granger causality test for a short run causality direction. If there exists a causality direction between agriculture and industrial sector, the coefficient should be different from zero that is, by rejecting the null hypothesis.It is accepted that the agriculture sector has granger caused industrial sector. Similarly, if we reject null hypothesis of no causality, we can conclude that the industrial sector is Granger caused agriculture sector.

**Wald Test :**

The short-run causality is also tested using Wald test. The Wald test computes a test statistic based on the unrestricted regression. The Wald statistic measures how close the unrestricted estimates come to satisfy the restrictions under the null hypothesis. If the restrictions are in fact true, then the unrestricted estimates should come close to satisfy the restrictions.

**Data Analysis and Interpretation of Results**

**Result of Unit Root Test**

First of all unit root test has been carried out for both the variables. Therefore, to determine the number of unit roots in the data, Augmented Dickey-fuller (ADF) test statistic with 5% level of significance was used. Results of unit roots in table no. 1 indicate that the null hypothesis of presence of unit roots for all the time series are rejected. Agriculture is stationary in level with intercept and trend in the equation. Hypothesis of presence of unit root would be rejected at 5% level of significance. Industrial data is stationary at second difference and easily reject the null hypothesis that data has a unit root at 5% and 1% level of significance. Here, null hypothesis of stationary fails to reject and suggest that both the variables are not

cointegrated at same order. Based on table no 1 agriculture data is stationary at order I (0) and Industrial data is stationary at second difference with order I (2).

Overall data of both the unit root test are somewhat inconclusive, and this is precisely the situation of ARDL modeling and bound test. It is designed for the conintegration of different time series with different order of integration. Applying the unit root test to the first-differences of each series leads to a very clear rejection of the hypothesis that the data are I (2), which is important for the legitimate application of the bounds test.

**Table No. 1**

**Unit Root test for Stationary**

| | | Level | First Difference | Second Difference | Level | First Difference | Second Difference |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | LOGAGRI | LOGIND | | LOGIND | LOGIND | LOGIND |
| Intercept | Test Statistic | -0.124427 | -9.348393 | -6.776221 | 0.024301 | -2.802178 | -4.541685 |
| | P-Value | 0.9338 | 0.0000# | 0.0000# | 0.9509 | 0.0758 | 0.0025# |
| Intercept and Trend | Test Statistic | -4.421096 | -9.084427 | -6.641405 | -2.346177 | -2.607646 | -4.336808 |
| | P-Value | 0.0110* | 0.0000* | 0.0002# | 0.3931 | 0.2807 | 0.0145* |
| None | Test Statistic | 5.616338 | -0.943165 | -6999235 | 9.911718 | -0998063 | -4.690838 |
| | P-Value | 1.0000 | 0.2950 | 0.0000# | 1.0000 | 0.2745 | 0.0001# |

(Note : * 5% level of Significance and # shows 1% level of Significance)

Source: Author's Calculations

**Autoregressive Distributed Lag Model (ARDL)**

Here we discuss the specification and estimation of the basic ARDL model that explains long run relationship of past and current data of Agriculture with past and current data of industrial sector. These are the basic results of the ARDL model in table no. 2. It is evident from the table no. 2 that, I have chosen lag intervals (1, 3) and the joint test for cointegrating vector and model selection has been performed. Model selection method in this model is Akaike info criterion (AIC). It is important that the errors of this model are serially independent. Residual Diagnostic and Correlogram Q-statistic also performed in the model and it shows statistically significant result. The p-values are strongly suggested that there is no evidence of autocorrelation in the model's residuals. It is good about the model.

**Table No. 2**

**ARDL model for Cointegration**

| Variable | Coefficient | Std. Error | t-Statistic | Prob.* |
|---|---|---|---|---|
| LOGAGRI(-1) | -.0270562 | 0.199134 | -1.358688 | 0.1974 |
| LOGIND | -0.340321 | 0.159746 | -2.130382 | 0.0528 |
| LOGIND(-1) | 1.119843 | 0.289552 | 3.867502 | 0.0019 |
| LOGIND(-2) | -0.777590 | 0.331092 | -2.348560 | 0.0353 |
| LOGIND(-3) | -0.519342 | 0.179821 | 2.888110 | 0.0127 |
| C | -9.588918 | 1.542333 | 6.217152 | 0.000 |
| | | | | |
| R-squared | 0.990989 | Mean dependent var | | 13.25790 |
| Adjusted R-squared | 0.987523 | S.D. dependent var | | 0.161491 |
| S.E. of regression | 0.018038 | Akaike info criterion | | -4.940543 |
| Sum Squared residual | 0.004230 | Schwarz criterion | | -4.642300 |
| Log likelihood | 52.93516 | Hannan-Quinn criter. | | -4.890069 |
| F-statistic | 285.9393 | Durbin Watson stat | | 1.847965 |
| Prob(F-statistic) | 0.00000 | | | |

*Note: p-values and any subsequent tests do not account for model selection

Source: Author's Calculations

Main purpose of estimating an ARDL model is to use it as the basis for applying the 'Bounds Test'. Mostly bounds test is used to see if long run relationship are present in the time series. The null hypothesis is that there is no long run relationship between the agricultural and industrial sectors. Estimated results of the Bounds test is explained in the following table no. 3. Result of the Bounds tests marked that the F-statistic for the Bounds Test is 16.37. This is clearly exceeds the 1% critical value for the lower and upper bound. Accordingly, null hypothesis of 'No long run relationship' can strongly be rejected. It is clear that both the variables i.e. Agricultural and Industrial sector strongly show the long run relationship in India.

**Table no. 3 : Bound Test**

| Significance levels | Critical Values | | F Statistics |
|---|---|---|---|
| | Lower Bound | Upper Bound | |
| 10% | 3.02 | 3.51 | 16.36884 |
| 5% | 3.62 | 4.16 | |
| 2.5% | 4.18 | 4.79 | |
| 1% | 4.94 | 5.58 | |

Source: Author's Calculations

Cointegration and long run form is also examined while estimating the result for our chosen ARDL model. Results are provided in the table no. 4. Analysis showed that the value of error correction coefficient is negative (-1.27), as required and it is very significant. P-value, t-statistic and standard errors of the model also reported the significant long run coefficients from the cointegrating equation.

**Table no. 4**

**Cointegration and Long Run form**

Cointegrating Form

| Variable | Coefficient | Std. Error | t-Statistic | Prob. |
|---|---|---|---|---|
| D(INDLOG) | -0.340321 | 0.122728 | -2.772976 | 0.0158 |
| D(INDLOG(-1)) | 0.258248 | 0.188956 | 1.366712 | 0.1949 |
| D(INDLOG(-2)) | -0.519342 | 0.117028 | -4.437778 | 0.0007 |
| CointEq(-1) | -1.270562 | 0.168792 | -7.527375 | 0.0000 |

Cointeq = AGRILOG - (0.4103*INDLOG + 7.5470 )

Source: Author's Calculations

This is not surprising that there is a long run equilibrium relationship between agricultural and industrial sector. There is a relatively slow adjustment in the industrial sector due to changes in the agricultural sector in India. 10percent change in industrial sector will result in a long run change of 4 percent in agriculture sector.

**Granger causality test :**

After determining the number of lags, Granger causality and Wald test was estimated. Result of these tests is presented in the following table no. 5. Here, it is concluded that the Granger causality test for short run that unable to reject null hypothesis at 5% significance level for causality of Agricultural sector does not granger causes industrial sectors. However, we reject null hypothesis for causality of industrial sector causes agricultural sectors at all the levels of significance. This result indicates that in the short run, there is a unidirectional causality running from industrial to agricultural sector.

**Table No. 5**

**Granger Causality and Modified Wald Test**

| Null Hypothesis | Granger causality | | MWald Test | |
|---|---|---|---|---|
| | F-Statistic | P-value | $X^2$ | P-value |
| LOGIND does not Granger Cause LOGAGRI | 7.77439 | 0.0038 | 17.72733 | 0.0014 |
| LOGAGRI does not Granger Cause LOGIND | 0.02300 | 0.9950 | 0.407510 | 0.9819 |

Modified Wald test also employed for the long run direction causality between the agricultural and industrial sectors. The direction from agricultural sector does not causes industrial sectors because we do not reject the null hypothesis, which suggest there is no reason that agricultural can influence industrial sectors. On the other hand, the granger modified Wald causality test indicates the rejection of null hypothesis that industrial sector does not granger causes agriculture sector at 5 percent significant level. It can be concluded that industrial sector can influence agricultural sector in the long run. Based on the result, therefore it is suggested that there is a unidirectional causality running from industrial to agriculture sectors for both in the short and long run.

**Conclusion :**

The main objective of the paper is to investigate a causal direction between agricultural and industrial sectors in India. In order to achieve a high growth rate and high income status, Indian economy has been focusing more on the industrial sector to boost up faster economic growth. However, recent policies under the start up and make in India whereby reinforcing the industrial sector as the important pillar of growth which show the commitment of the government of India to revitalize this sectors contribution. The existing literature still lacks on the bivariate causality between these two main sectors, particularly in Indian context. We employ two series of annual value-added output data range 1991-92 to 2012-13 from the government of India Data to examine the agriculture-industrial nexus and found these results; first, Unit root tests clearly show the variables are stationary at level and second differencing, and second Granger (1969) and Toda-Yamamoto (1995) type causality tests show a unidirectional causality from industrial to agricultural sectors both in the short and long run. The cointegration result shows a consistency with ARDL model which exist long term relationship between two variables during the study period. Granger causality analysis found that Industrial sector granger cause agriculture sector. In other case we could not find evidence for causality in agricultural sector to industrial sector particularly in India. Rangrajan (1992) found the opposite result that agricultural output influences the industrial output for the period 1961-1972. But the recent study by Kanwar (2000) and Tiwari(2010) also confirmed that agricultural output determines the output in industry for the different period including pre and post globalization. But we could not find any evidence for agriculture granger causes industry.

**References :**

1. Granger, C. (1969). Investigating Causal Relations by Econometric Models and Cross-spectral Methods. Econometrica, 424-438.

2. Hye, Q. M. (2009). Agriculture on the Road to Industrialisation and Sustainable Economic Growth : An Emperical Investigation for Pakistan. International Journal of Agricultural Economics & Rural Development, 1-6.
3. Jeselius, S. J. (1990). Maximum Likelihood Estimation and Inference on Cointegration-with Applications to the Demand for Money. Oxford Bulletin of Economics and Statistics, 169-210.
4. Juselius, S. J. (1990). Maximum Likelihood Estimation and Inference on Cointegration with appplications to Money Demand. Oxfor Bulletin of Economics and Statistics,, 169-210.
5. Kanwar, S. (2000). Does the Dog Wag the tail or the tails wags the dog? Cointegration of Indian Agriculture with Non-Agriculture. Journal of Policy Modelling, 533-556.
6. Lewis, W. A. (1954). Economic Development with Unlimited Supplies of Labour. The Manchester School,, 139-191.
7. Matahir, H. (2012). The Empirical Investigation of the Nexus between Agricultural and Industrial Sectors in Malaysia. International Journal of Business and Social Science, 225-231.
8. Nurkse, R. (1955). Problems of Capital Formation in Underdeveloped Countries. Oxford, 32-33.
9. Pesaran S. and Shin. (2001). Bounds testing approach to the analysis of level relationships. Journal of Applied Econometrics, 289-326.
10. Pesaran, M. a. (1999). An Autoregresssive Distributed Lag Modelling Approach to Cointegration Analysis. Cambridge: Cambridge University Press.
11. Rangarajan, C. (1982). Agricultural Growth and Industrial Performance in India. New Delhi: International Food Policy Research Institute.
12. Ranis, G. a. (1961). A Theory of Economic Development. The American Economic Review, 533-565.
13. Thirlwal, A. P. (1986). A General Model of Growth and Development on Kaldorian Lines. Oxford Economic Papers, 199-219.
14. Tiwari, A. a. (2010). Relationship Between Industry, Agriculture, Service Sectors and GDP: The Indian Experience. International Journal of Economics and Business.
15. Yamamoto, H. Y. (1995). Statistical Inference in Vector Autoregressive with Posssibly Integrated Processes. Journal of Econometrics, 225-250.


◆◆◆

# अनौपचारिक क्षेत्रातील व्यवसायांचे अध्ययन - संदर्भ अमरावती शहर

**जे.व्ही.गायकवाड**
अर्थशास्त्र विभाग,
या.द.व. देशमुख महाविद्यालय,
तिवसा.जि.अमरावती.

**१. प्रस्तावना :**

ज्यावेळी देशामध्ये नागरीकरणाची प्रक्रिया गतिमान होते त्यावेळी देशात अनेक वाद-प्रश्न (समस्या) निर्माण होतात. नागरीकरणाच्या प्रक्रियामुळे झोपडपट्टीमध्ये वाढ, आरोग्याचा प्रश्न, वाहतुक व्यवस्थेवरील वाढता ताण पर्यावरणाचा गंभीर प्रश्न, पिण्याचे पाणी आणि सांडपाणी व्यवस्थेवरील वाढणारा ताण, घाणीचे व कचऱ्याचे सार्वत्रीकरण, बालमजुरी, घनकचऱ्याची विल्हेवाट या समस्याबरोबरच अनौपचारिक क्षेत्र विस्तारित होत असल्याचे आढळते. नागरीकरणाच्या प्रक्रियामध्ये ग्रामीण भागातील लोक शहरांमध्ये रोजगारांसाठी आणि इतर विविध कारणामुळे मोठ्या प्रमाणावर येत असल्याने नागरी सुविधा पुरविण्याऱ्या स्थानिक नागरी संस्थेवरील ताण वाढत आहे. भारतामध्ये अनौपचारिक क्षेत्रामध्ये पाच कोटी पेक्षा जास्त लोकसंख्या गुंतलेली आहे. शहरामध्ये अनौचारिक क्षेत्रामधील व्यवसायामध्ये दिवसेंदिवस वाढ होतांना दिसून येते. मुंबई, कोलकत्ता, दिल्ली, हैद्राबाद, पुणे, बंगलोर, नागपूर यासारख्या मोठ्या शहरामध्ये अनौपाचारिक क्षेत्र वाढत असल्याचे प्रत्यक्षपणे दिसते वाढत्या नागरीकरणाचा प्रभाव अनौपचारिक क्षेत्रावर होत असून नागरीकरणाच्या समवेत अनौपचारिक क्षेत्र विस्तारित होतांना आढळतो. त्यामुळे नागरीकरणाचा अपरिहार्य परिणाम म्हणून शहरी भागातील अनौपचारिक क्षेत्राकडे बघितले जात असले तरी या क्षेत्राकडे सरकारचे आणि स्थानिक नागरी संस्थाचे विशेष लक्ष नाही.

अनौपचारिक क्षेत्रामधील व्यावसायिक दैनंदिन गरजेच्या वस्तूची विक्री करतात. यामध्ये शहरामधील मुख्य रस्त्यावर, चौकात, बसस्थानक अथवा रेल्वेस्थानक परिसरामध्ये, मुख्य बाजारपेठेच्या बाजुला अथवा रोडवर छोट्याशा सार्वजनिक जागेवर आपले दुकान मांडून ग्राहकांची गरज ओळखून वस्तूची विक्री करतात. अनौपचारिक क्षेत्रातील व्यवसायामध्ये छोटे दुकानदार, छोटे व्यावसायिक, फेरीवाले, हातगाडीवाले याचा समावेश होतो. प्रत्यक्षामध्ये ही सर्व मंडळी ज्या वस्तूची दैनंदिन व्यवहारामध्ये विक्री करतात. त्या सर्व वस्तू ग्राहक वर्ग मनात कोणतीही शंका निर्माण न करता खरेदी करतात. किरकोळ व्यापारी वस्तूची विक्री लहान लहान प्रमाणात म्हणजेच तुकड्यामध्ये अथवा छोट्या भागामध्ये करतात. वितरण साखळीमध्ये शेवटचा दूवा म्हणून किरकोळ व्यापारी मध्यस्थाची भूमिका बजवितात.

अनौपचारिक क्षेत्रामधील सर्व दूकानदारांचा प्रत्यक्ष संबंध ग्राहकांशी येत असल्याने आणि ग्राहकांची गरज लक्षात घेवून दैनंदिन गरजेच्या वस्तू ग्राहकापर्यंत पोहचविण्याचे काम करित असल्याने शहरामध्ये नागरिकांच्या दृष्टीने हे महत्त्वाचे क्षेत्र म्हणून पुढे येत आहे. अनौपचारिक क्षेत्रामधील किरकोळ व्यापारी हा महत्त्वाचा व्यापारी अथवा दुकानदार होय. प्रा. थॉमस यांच्या मते ' उपभोक्त्याच्या सर्व गरजा सहजरित्या व कार्यक्षमतेने भागविणारा वितरणाच्या मालिकेतील शेवटचा दूवा म्हणजे किरकोळ विक्रेता होय. ग्राहकांशी संपर्क प्रस्थापित करून त्यांना हव्या असलेल्या वस्तूची विक्री विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात करणारा विक्रेता म्हणजेच किरकोळ फिरता व्यापारी होय. फिरत विक्रेते हे वस्तू ग्राहकांना घरपोच उपलब्ध करून देत असल्याने ते लोकप्रिय असल्याचे दिसून येते. किरकोळ व्यापाऱ्याचे प्रमुख दोन प्रकार असून त्यामध्ये फिरते व्यपारी व स्थानिक व्यापारी यांचा समावेश होत असून यामध्ये खालील विक्रेते आणि दुकानदारांचा समावेश होतो.

**१) अनौपचारिक क्षेत्रामध्ये खालील विक्रेता अथवा दुकानदारांचा समावेश होतो :**

१) फेरीवाला
२) रस्त्यावर दुकान मांडून माल विकरणारे विक्रेते
३) आठवडी बाजारातील व्यापारी-विक्रेते
४) स्वस्त वस्तूचे (विक्री करणारे) दुकानदार
५) स्थायी जागेवरील दुकानदार
६) दुय्यम प्रतिच्या वस्तू विकणारे विक्रेते
७) वैशिष्ट्पूर्ण दुकाने जसे पुस्तकी दूकान, फर्निचरचे दुकान इत्यादी

**२) अनौपचारिक क्षेत्रामधील व्यावसायिकांची व व्यवसायांची वैशिष्ट्चे :**

१) ग्राहकांशी प्रत्यक्ष संबंध -
अनौपचारिक क्षेत्रामधील विक्रेत्यांचा संबंध ग्राहकांशी प्रत्यक्ष येतो. ग्राहकांची आवड, निवड रूची याविषयी परिपूर्ण ज्ञान विक्रेत्यांना असल्याने स्वस्त किंमतीस वस्तू ग्राहकांना मिळते.

२) घाऊक व्यापाऱ्याकडून खरेदी -
फेरीवाले, किरकोळ व्यापारी घाऊक व्यापाऱ्याकडून मालाची खरेदी करतात. खरेदी केलेला माल अतिशय अल्प मोबदला जास्तीचा आकारून माल विक्रीस काढतात.

३) मर्यादित भांडवल -
किरकोळ व्यापारी अथवा फेरीवाले यांच्याजवळ भांडवलाचा अभाव जाणवतो. बाजारपेठेमध्ये मर्यादित भांडवलामुळे त्यांची आर्थिक पत मर्यादित असते.

४) लहान जागा -
सामान्यपणे व्यवसायासाठी अतिशय लहान जागा त्यांना लागते सार्वजनिक जागेवर अथवा फुटपाथवर दूकान मांडून वस्तूची विक्री हा वर्ग करतो.

५) उधारीवर खरेदी -
घाऊक व्यापाऱ्याकडून अनेक फिरते व्यापारी उधारीवर माल खरेदी करतात. दोघामधील संबंध चांगले असल्याने सर्व व्यवहार सुलभपणे पार पाडले जातात.

६) विविध वस्तूची विक्री -
दुकानामध्ये अथवा फेरीवाले विविध वस्तू ग्राहकांना घरपोच पोहचवित असल्याने ग्राहकांना हव्या असलेल्या वस्तू मिळतात म्हणजेच विविध स्वरूपाच्या वस्तूची विक्री

हा वर्ग करीत आहे.

७) निवडीस वाव -
एकाच प्रकारच्या परंतू विविध उत्पादकांनी तयार केलेल्या वस्तू फेरीवाले अथवा किरकोळ व्यापारी ग्राहकांसाठी विक्रीस उपलब्ध करून देत असल्याने ग्राहकांना भरपूर निवडीस वाव मिळतो.

८) ग्राहकांना सल्ला -
ग्राहकांना योग्य सल्ला देवून चांगल्या दर्जाची वस्तू घेण्याचा सल्ला हा वर्ग देतो. विशेष म्हणजे त्याचा सल्ला ग्राहकांना पटतो. म्हणून फेरीवाले ग्राहकांना मित्रासारखे वाटतात.

९) अल्प कौशल्य -
अनौपचारिक क्षेत्रामधील विक्रेत्यामध्ये कौशल्य, कार्यक्षमता अल्प प्रमाणात आढळून येते. प्रशिक्षणाच्या अभावामुळे त्याच्याकडे कौशल्य कमी आढळते.

१०) आस्थापन खर्च -
उद्योगाची जागा निश्चित नसल्याने जागेचे भाडे, वीजबील खर्च, नोकरांचा पगार असे खर्च नसतात. म्हणजेच आस्थापन खर्च नसतो.

११) संरक्षणाचा अभाव -
या क्षेत्रामधील जे विविध व्यापारी अथवा विक्रेते आहेत त्यांच्या व्यवसायास कोणत्याही प्रकारचे संरक्षण नसते.

१२) विक्रीनंतरची सुविधा -
किरकोळ व्यापारी अथवा फेरीवाले केवळ वस्तूची विक्री करीत नाही तर ते ग्राहकांना वस्तूच्या विक्रीनंतरही सुविधा उपलब्ध करून देतात. उदा. वस्तू दुरूस्त करून देणे, बदलून देणे, घरपोच सेवा पुरविणे इत्यादी.

१३) दैनंदिन वस्तूची विक्री -
ताजा भाजीपाला, विविध फळे अन्नधान्य, दूध-पाव इत्यादी दैनंदिन वापरांच्या वस्तू ग्राहकांना पुरवितात.

१४) उधारीची सवलत -
ग्राहकांशी नेहमी संबंध येत असल्यामुळे ग्राहकांची आर्थिक स्थिती, प्रामाणिकपणा, आवड-निवड, स्वभाव इत्यादी माहिती असल्यामुळे ग्राहकांना उधारीवर माल दिला जातो. उधारीची सवलत देवून माल विकला जातो.

**३) अमरावती शहरातील अनौपचारिक क्षेत्रातील व्यावसायिक विक्रेत्यांचे सर्वेक्षणात्मक अध्ययन :**

अमरावती जिल्ह्यामधील सर्वात मोठे शहर अमरावती आहे. २०११ जनगणनेनुसार शहरांची लोकसंख्या ६ लाखापेक्षा जास्त आहे. या शहरात अनौपचारिक क्षेत्रातील व्यावसायिकाद्वारे विविध दैनंदिन वस्तूची विक्री होतांना आढळते. अमरावती महानगरपालिका क्षेत्रामधील विविध मार्गावरून हातगाडीवाले फेरीवाले व किरकोळ विक्रेते वस्तूची विक्री करीत आहेत. हातगाडीवाले, फेरीवाले यांना कोणत्याही प्रकारचा परवाना महानगरपालिकेद्वारा दिला जात नसल्यामुळे प्रत्यक्षामध्ये या अनौपचारिक क्षेत्रातील व्यावसायीकांची संख्या किती आहे याविषयी अंदाज बांधणे कठीण आहे. २००४-०५ या वर्षामधील नोंदीनुसार अमरावती महानगरपालिकेकडे ११३३ किरकोळ विक्रेते हातगाडीवाले व फेरीवाले यांची रजिस्टरमध्ये नोंद आहे. प्रत्यक्षामध्ये यांची संख्या खूप मोठी असून हे

विक्रेते शहराच्या अनेक भागात मध्यवर्ती ठिकाणी, चौकात आपला व्यवसाय थाटून वस्तूची विक्री करतांना आढळतात. अमरावती शहरामध्ये प्रामुख्याने जयस्तंभ चौक, इतवाराबाजार, इर्विन चौक, राजकमल चौक, चित्राटॉकीज चौक, अंबादेवी परिसर, राजापेठ, पंचवटी ते गाडगेनगर परिसर, जवाहर गेट ते गांधी चौक, जूना कॉटन मार्केट परिसर, रेल्वे व बसस्थानक परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात हे विक्रेते आढळून येतात या सर्व विक्रेत्यांना महानगरपालिकेद्वारे प्रतिदिन ५ रू. शुल्क आकारले जाते. शुल्कांची वसुली स्वत: महानगरपालिका करित नसून याचे कंत्राट एका विशिष्ट व्यक्तीला हर्रास पद्धतीने अथवा टेंडर मागवून दिले जाते. (बडनेरा ते अमरावती) फिरत्या व्यापाऱ्याकडून महानगरपालिकेला २००३-०४ मध्ये ४,२१,००० रू. २००६-०७ मध्ये ५,५४,९६६ रूपये आणि २००७-०८ मध्ये ६,५६,९९९ रू. उत्पन्न प्राप्त झालेले आढळते. दिवसेंदिवस उत्पन्नामध्ये वाढ होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत असल्याने विक्रेत्यांची संख्या झपाट्याने वाढती आहे. शहरामध्ये वाढत्या वस्तीचा, नागरीकरणाचा परिणाम म्हणून याकडे बघावे लागेल. थोडक्यात वाढत्या नागरीकरणामुळे अनौपचारिक क्षेत्रातील विक्रेत्यांची फेरीवाल्यांची संख्या वाढत आहे. फेरीवाले, हातगाडीवाले छोटे दुकानदार यांची संख्या वाढत असली तरी त्या दृष्टीने त्यांच्याकरिता सुविधा, कायदे, सोयी यांचा मोठ्या प्रमाणावर अभाव आहे. अमरावती शहरामधील अनौपचारिक क्षेत्रातील विक्रेत्यांचा, व्यवसायांचा जवळून अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षणात्मक अध्ययन केले आहे. अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील हातगाडीवाले, फेरीवाले व छोटे व्यावसायिक यांचा व्यवस्थीतपणे अभ्यास करता यावा यासाठी चार वर्ग तयार करून अध्ययन केले आहे. यामध्ये

१) भाजीपाला व फळे विकणारे विक्रेते

२) कटलरी व जनरल सामान,कपडे विक्रेते

३) भेलपूरी व चाट भांडार विक्रेते

४) आईस्क्रीम, ज्यूस व थंड पेय विक्रेते

वरील सर्व वर्गातील नमुना निवड करून अभ्यास केला आहे.

**तक्ता क्र. १**

**अनौपचारिक क्षेत्रातील व्यावसायिकांची नमुना निवड**

| अ.क्र. | व्यवसाय | नमुनानिवड |
|---|---|---|
| १. | भाजीपाला व फळ विक्रेते | ३१ |
| २. | कटलरी जनरल सामान व कपडे विक्रेते | २५ |
| ३. | भेलपूरी व चाट भांडार विक्रेते | ३१ |
| ४. | आईस्क्रीम ज्युस व थंडपेय विक्रेते | २७ |
| | एकूण | ११४ |

नमुना व्यावसायिक एकूण ११४ घेवून सर्वेक्षणात्मक अध्ययन केले असता खालील प्रमुख स्पष्टपणे आढळून आल्यात.

१) नमुना व्यावसायिकांचा वयोगट -

कोणत्या वयोगटातील व्यावसायिक/विक्रेते हा व्यवसाय करतात याविषयी माहिती मिळविली असता ११४ पैकी ७६ विक्रेते २६ ते ३५ या वयोगटामध्ये दिसून येत असल्यामुळे बहुसंख्य विक्रेते हे तरूण आहेत असे म्हणता येईल.

२) धार्मिक वर्गीकरण -

सर्वच धर्माचे व्यावसायिक या क्षेत्रामध्ये

व्यवसाय करीत असले तरी भाजीपाला व फळे विकणारे ३१ विक्रेत्यांमध्ये हिंदू व मुस्लिम धर्मीय विक्रेत्याचे वर्चस्व आहे. कटलरी व जनरल सामान विक्रेत्यामध्ये मुस्लीम वर्गाचे वर्चस्व असून २५ पैकी १५ विक्रेते आढळतात. भेलपूरी व चाट भांडार आणि आईस्क्रीम व थंडपेय विक्रेत्यामध्ये हिंदू धर्मातील विक्रेत्याचा जास्त भरणा आहे. एकूण ११४ विक्रेत्यापैकी ७२ हिंदूधर्मीय, ३८ मुस्लिम आणि ०४ बौद्ध धर्माचे विक्रेते आढळून आलीत. थोडक्यात अनौपचारिक क्षेत्रातील व्यावसायिकामध्ये हिंदू धर्मीय लोकांचे प्राबल्य असून सर्वात कमी म्हणजे ३.५१ प्रतिशत बौद्ध धर्मिय विक्रेते या व्यवसायामध्ये आहेत.

३) कुटुंबाचा आकार –
अनौपचारिक क्षेत्रामध्ये जे किरकोळ व्यापारी व्यवसाय करतात त्यांच्या कुटुंबाचा आकारा विषयी माहिती मिळविली असता १ ते ५ संख्येच्या आकारांची कुटुंब ११४ पैकी ६१ विक्रेत्यांचे आढळून आले. विशेष म्हणजेच थंडपेय व ज्युस विक्रेते यामध्ये १० पेक्षा जास्त व्यक्ती असलेली कुटुंब आढळून आलीत.

४) साक्षरतेविषयी माहिती –
अमरावती शहरामध्ये सरासरी ९० प्रतिशत साक्षरतेचे प्रमाण आहे. या क्षेत्रामधील ११४ विक्रेत्यांच्या ६३४ एकूण व्यक्तीपैकी ३४१ म्हणजेच ५३.७९ प्रतिशत साक्षर आणि २९३ म्हणजेच ४६.२१ प्रतिशत निरक्षर आढळून आलीत. भाजीपाला व फळ विक्रेता या गटामध्ये साक्षरतेचे प्रमाण ४० प्रतिशत असून सर्वात जास्त ६४.३३ प्रतिशत साक्षरता भेलपूरी व चाटभांडार विक्रेत्यामध्ये आहे. सरासरी ५३.७९ प्रतिशत नमुना व्यवसायिकामध्ये साक्षरतेचे प्रमाण आहे.

५) भांडवल उभारणीचे मार्ग –
नमुना व्यावसायिकांनी व्यवसायासाठी भांडवल उभारणी कोणत्या मार्गाने करून व्यवसाय उभा केला यामध्ये स्वत:जवळचे भांडवल ११४ पैकी ७८ विक्रेत्यांनी म्हणजेच ६८.४२ प्रतिशत व्यावसायिकांनी वापरून व्यवसाय उभा केला, २२ म्हणजेच १९.३० प्रतिशत व्यावसायिकांनी मित्रमंडळी व नातेवाईकाकडून पैसाची उचल करून भांडवल उभे केले तर १४ विक्रेत्यांनी म्हणजेच ११.२८ प्रतिशत व्यावसायिकांनी विविध बँकाकडून कर्जे घेतले. म्हणजेच बहुतांश छोट्या व्यावसायिकांनी स्वत:जवळचा पैसा वापरून व्यवसायांची उभारणी केली.

६) नमुना व्यावसायिकांना मिळणारे उत्पन्न :
अनौपचारिक क्षेत्रामधील व्यावसायीकांना निव्वळ उत्पन्न किती मिळते याविषयी माहिती प्राप्त केली असता वेगवेगळ्या गटातील विक्रेत्यांना वेगवेगळे उत्पन्न मिळत असल्याचे दिसून येते. ११४ नमुना व्यावसायीकांना प्रति मासिक उत्पन्न ४५०० रूपयांच्या आसपास मिळते आहे. सर्वात जास्त उत्पन्न भाजीपाला व फळविक्रेत्यांना मिळतांना आढळते.

**सारांश :**

भारतामध्ये वाढत्या नागरीकरणामुळे अनौपचारिक क्षेत्रातील व्यावसायिकामध्ये वाढ होत आहे. छोटे व्यावसायिक फेरीवाले, हातगाडीवाले

घरपोच वस्तू पोहचून देत असल्याने शहरामध्ये ही मंडळी लोकप्रिय असली तरी त्यांच्या समस्यांकडे मात्र स्थानिक प्रशासन व सरकार दुर्लक्ष करीत असल्याचे आढळून येते. अमरावती शहरामध्ये अनेक चौकात अथवा सार्वजनिक जागेवरील छोट्या दूकानदारांचे, फेरीवाल्याचे सामान महानगरपालिकेद्वारे जप्त केले जाते. त्यांच्या व्यवसायासाठी जागेची निश्चिती, भांडवल उभारणी मधील अडचणी, मोठ्या व्यावसायिकांशी स्पर्धा, प्रशिक्षणाचा अभाव, सरकारचे दुर्लक्ष अशा विविध समस्यांनी हे व्यावसायिक समस्याग्रस्त आहेत. असंघटितपणामुळे त्यांचे प्रश्न कायम चर्चेमध्ये असली तरी त्यांची सोडवणूक होत नाही. या दुर्लक्षित व्यावसायिकांकडे सरकारने कायदेशीर संरक्षण देवून त्यांचा विकास केला पाहिजे. भविष्यामध्ये स्थानिक प्रशासनाने पुढाकार घेवून त्यांच्यासाठी पर्यायी व्यवस्था उभी करून त्यांच्या व्यवसायाला संरक्षण दिले पाहिजे. अन्यथा वाढत्या नागरीकरणातून अनौपचारिक क्षेत्रामधील व्यावसायिकांच्या समस्यांमध्ये वाढ होईल.

**संदर्भसूची :**


१) अमरावती महानगरपालिकेचे अंदाजपत्रके – अमरावती महानगरपालिका.

२) शेजवलकर प्र.चि.(१९९४) : वाणिज्य संघटन, नरेंद्र प्रकाशन, पूणे.

३) कोपर्डेकर (२००६) : आधुनिक वाणिज्य, संघटन आणि व्यवस्थापन, हिमालया बुक्स प्रा.लि.मुंबई.

४) जहागिरदार दि.व्यं. (१९९२) : 'नागरीकरण स्वरूप आणि काही वादप्रश्न','अर्थसंवाद' खंड १६, अंक ३ मधील लेख.

५) गायकवाड जे.व्ही.(२००९) : 'अमरावती जिल्ह्यातील नागरीकरणाचे स्वरूप आणि समस्यांचे' अध्ययन पीएच.डी. अप्रकाशित ग्रंथ.


◆◆◆

ISSN 2320-0197

# जलयुक्त शिवार अभियान - सिंचन विकास व पाणी उपलब्धता

- मंगला भाटे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
भारतीय महाविद्यालय, अमरावती.

*जंगल कापली गंगा मळली*
*पाण्याची पातळी खोलखोल चालली*
*निसर्ग देतो आहे धोक्याची बेल*
*तरीही आपण म्हणतो 'ऑल इज वेल'*

कवियत्री डॉ. अलका गायकवाड यांनी पाणी समस्येला चार ओळीत गंभीरपणे मांडली आहे. मागील काही वर्षापासून पावसाच्या अनियमिततने पाणी टंचाईचा बिकट प्रश्न उभारला आहे. मनुष्य अन्नाशिवाय सात दिवस जिवंत राहू शकतो परंतु पाण्याशिवाय ३ दिवसात मृत्य होईल. पिण्याचे पाणी, शेतीकरिता सिंचन आणि औद्योगिक क्षेत्राकरिता लागणारा पाणीपुरवठा अत्याधिक महत्वाचा आहे. पिण्याच्या पाण्याकरिता असलेले स्त्रोत, नदी, नाले, तलाव, विहिरी कोरड्या झाल्याने काही गावांमध्ये लांब अंतरातून पाणी आणावे लागत आहे. मराठवाड्यातील पाणी टंचाई इतकी भीषण होती की लातुरला मिरजेवरून रेल्वेने पाणी पुरवठा केला. शेतीक्षेत्रात सिंचनाअभावी आधुनिक सुधारणा वाढविणे अशक्य आहे. पाणी या महत्त्वपूर्ण घटकाचे व्यवस्थापन आणि वापर याबाबत उदासीनता दिसून येते. 'जलसाक्षरता' ही मोहिम जनजागृती करिता राबविली जात आहे. महाराष्ट्रात एकात्मिक पद्धतीने व सर्व विभागाच्या समन्वयाने जलयुक्त शिवार योजना मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केली. या योजनेतंर्गत शाश्वत शेतीसाठी आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी हा निर्णय घेतला गेला. महाराष्ट्रात २०१९ पर्यंत पाण्याची समस्या पूर्णपणे सोडविण्याचा निर्धार आहे. तसे झाले तर तिला जलक्रान्तीच म्हणता येईल.

भारतातील पाण्याची उपलब्धता विचारात घेता, अनियमित पावसामुळे पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे. देशातील एकूण ५९३ जिल्हांपैकी २५६ जिल्ह्यात भूगर्भातील पाण्याची पातळी घटली आहे. पावसाचे प्रमाण १२० सेंमी. आहे. परंतु भारताच्या चेरापुंजी इर्थ ११००० मि.मि. इतकी प्रचंड जलवृष्टी होत असते. भारतातील काही भागात जवळ जवळ १०० जिल्ह्यात दुष्काळ तर इतर भागात अतिवृष्टी असते. भारतातील उपलब्ध पाणी साठ्यात दरवर्षी तफावत दिसून येते. त्यादृष्टीने पाण्याचे व्यवस्थापन महत्वाचे ठरते. उपलब्ध पाणीपुरवठ्यापैकी ७४ प्रतिशत पाणी शेती व उद्योगांसाठी १८ प्रतिशत पाणी धरणात साठवणूक करून वीज निर्मिती व ८ प्रतिशत घरगुती वापर व पिण्याकरिता वापरले जाते. भारतात ४००० अब्ज धनमीटर पाणी पावसाचे असते त्यापैकी ५० प्रतिशत पाणीचा अपव्यय होतो. ६९० अब्ज घनमीटर पाणी वापराकरिता उपलब्ध

असते. भविष्यकाळातील पाणी टंचाई व पाणी व्यवस्थापन ही आव्हाने महत्वाची ठरतात.

महाराष्ट्रातील पाण्याची स्थिती अभ्यासतांना असे दिसून येते की कृत्रिम पाण्याची उपलब्धता १८% असून निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असलेल्या पावसांमुळे पाणी साठा अत्यल्प दिसून येतो. कृषीक्षेत्रातील मोठे कोरडवाहू क्षेत्र, शेती उत्पादनावर प्रतिकूल परिणाम करते. २०१४-१५ मध्ये भूजल पातळीत २ मी. पेक्षा जास्त घट झालेल्या १८८ तालुक्यातील २३३४ गावे तसेच शासनाने पाणी टंचाई जाहीर केलेल्या २२ जिल्ह्यातील १९०५९ इतकी गावे आहेत. अशी परिस्थिती एकात्मिक पद्धतीने सर्व विभागाच्या मदतीने नियोजन करून जलसंधारणाचे कार्यक्रम राबविल्यास पिण्याचे पाणी व सिंचन व्यवस्था निर्माण करता येईल. मागील काळापासून पाणी नियोजन आणि 'पाणी अडवा पाणी जिरवा' अशी जलसंधारणाची कामे केली जात आहे आणि या उपाययोजनेचा पुढचा भाग म्हणून जलयुक्त शिवार योजना राज्यसरकारने राबविण्याचा निर्णय घेतला. कारण अपुऱ्या पावसामुळे महाराष्ट्रात २२३४ गावे पाणी टंचाईग्रस्त आहेत. महाराष्ट्र २०१९ या धोरणाअंतर्गत जलयुक्त शिवार अभियान २२ जिल्ह्यातील १९०५९ गावांमध्ये राबविण्यात येत आहे.

जमिनीतील पाण्याची पातळी वाढविणे, पाणी टंचाईवर मात करण्याच्या दृष्टीने सरकारने ही योजना आखली यामध्ये शाश्वत शेतीसाठी सिंचन आणि पिण्याचे पाणी उपलब्धतता यावर भर दिला जात आहे. २०१९ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्र पाणी टंचाईमुक्त करण्याचा निर्धार मानवाच्या दृष्टीने क्रान्तीकारी आहे. जलशिवार अभियानाला राज्यसरकारने प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील पाणी टंचाई असलेल्या गावाची निवड करण्यात आली आहे. जलयुक्त शिवार अभियानाचे काही प्रमुख उद्दिष्टे.

१) पावसाचे पाणी गावाच्या शिवारात अडविणे.
२) भुगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे.
३) सिंचनक्षेत्रात वाढ करून शेतीसाठी पाणी व पाण्याच्या कार्यक्षमतेत वाढ करणे.
४) पाणीसाठा निर्माण करण्याकरिता नवीन कामे हाती घेवून गावतलाव, पाझरतलाव, सिमेंट बंधारे आणि जलस्त्रोतांची निर्मिती करणे.
५) पाण्याच्या वापराबाबत जनजागृती आणि वृक्ष लागवडीस प्राधान्य देणे. हे उद्दीष्टे ठरविण्यात आली आहे.

अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणी करिता विभागीय आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली विभागीय स्तरावर समन्वय समितीचे गठन करण्यात आले आहे. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी समिती प्रमुख तर तालुकास्तरावर उपविभागीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कामे केली जात आहे.

जलशिवार अभियानांतर्गत केली जाणारे कामे साखळी नाले बांधणी आणि खोलीकरण केले जात आहे. जुन्या जलसंरचनांचे पुर्नजीवन, कोल्हापुरी बंधारे व पाझर तलाव दुरूस्ती व नुतनीकरण, ओढे-नाले जोडप्रकल्प राबविले जात आहे. तलावातील गाळ व माती काढणे, कालवा दुरूस्तीची कामे करण्यात येत आहे.

२०१५-१६ अखेर जलयुक्त शिवार योजनेतून एकूण कामांची संख्या ३०,७४४ इतकी होती. त्यापैकी ३०,७०३ कामे पूर्ण झाली म्हणजेच ९५ प्रतिशत पेक्षा जास्त कामे पूर्ण झाली असे

### तक्ता क्र.१
### जलशिवार अभियानांतर्गत कामांचे विवरण
### (२०१५-१६ अखेर)

| अ.क्र. | कामाचे नांव | एकूण कामांची संख्या (क्षेत्र हे.) | | पूर्ण झालेल्या कामांची संख्या | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | क्षेत्र हेक्टर | संख्या | क्षेत्र हेक्टर |
| १ | कपाटमेंट बंडींग | ३८९२ | १३१०१५ | ३८५४ | १२९२४९ |
| २ | सलग समपातळी चर | ६२ | ९१२ | ६२ | ६९१ |
| ३ | माती नाला बांध | ६९३ | - | ६९३ | - |
| ४ | शेततळे | ५६१ | - | ५६१ | - |
| ५ | साखळी सिमेंट बंधारा | ५६२ | - | ५६२ | - |
| ६ | नाली खोलीकरण व सरळीकरण | १०१ | - | १०१ | - |
| ७ | पाझर तलाव | १० | - | ०९ | - |
| ८ | कालवा दुरूस्ती | २ | - | ३४४ | - |
| ९ | विहीर पुनर्भरण | १६३४० | - | १६३४० | - |
| १० | गाळ काढणे | ६०१ | - | ६०१ | - |
| ११ | वृक्ष लागवड | ८७ | - | ८७ | - |
| १२ | ठिंबक सिंचन | ५५९० | - | ५५९० | - |
| १३ | तुषार सिंचन | ४१४ | - | ४१४ | - |
| १४ | रिचार्ज ट्रेंच | १२ | - | १२ | - |
| १५ | उपा दुरूस्ती प्रकल्प | ०३ | - | ०३ | - |
| १६ | सुक्ष्म सिंचन मल्चिंग | ४४४ | - | ४४४ | - |
| १७ | वनराई बंधारे | ४४५ | - | ४४५ | - |
| १८ | साठवण बंधारे | ०४ | - | ०४ | - |
| १९ | अनघड दगडाचे बांध | २३८ | - | २३८ | - |
| २० | अर्दन स्ट्रक्चर | ९१ | - | ९१ | - |
| २१ | इतर कामे | ५९२ | ६९१ | ५९२ | ९१२ |
| | **एकूण** | **३०७४४** | **१३२६१८** | **३०७०३** | **१३०८५२** |

म्हणता येईल. कपार्टमेंट बंडींग ३८५४ इतकी कामे पूर्ण होवून त्या अंतर्गत १,२९,२४९ हेक्टर क्षेत्र विकसित झाले. ५३१ इतकी शेततळे व १० पाझर तलावांनी जलयुक्त शिवारात भर पडली. या योजनेतील यावर्षी अखेर कामांची संख्या व पुर्ण झालेल्या कामांची संख्या यात तफावत कमी आहे. ठिंबक आणि तुषार सिंचनाचे ६०१० इतके प्रकल्प पूर्ण करण्यात आले आहे. २०१६-१७ अखेर सुधारित कामांची संख्या ३६,३७३ पैकी १८७१२ इतकी कामे पूर्ण झाली आहेत. आणि २०६४ कामे प्रगतीपथावर आहेत.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत आतापर्यंत

झालेला खर्च पाहता, २०१५-१६ मध्ये २९०९८ लक्ष रू. इतका खर्च झाला. २०१६-१७ मध्ये ८६८३ लक्ष रू. शासकीय खर्च झालेला दिसून येतो.

**तक्ता क्र. २**

**जलशिवार योजनेवरील सर्वाधिक शासकीय खर्च (लक्ष रू.)**

| अ.क्र. | कामाचे नांव | शासकीय खर्च २०१५-१६ | शासकीय खर्च २०१६-१७ |
|---|---|---|---|
| १. | कपार्टमेंट बंडींग | ७२२४.३० | २६७९.५ |
| २. | साखळी सिमेंट बंधारा | ६९८७.१६ | १००.३ |
| ३. | माती नाला बांध | १४४४.३४ | ०० |
| ४. | गाळ काढणे | ३५२७.६० | ३४७१.० |
| ५. | शेततळे व इतर सिंचन | ३१२१.०० | ३४९.० |

२०१६-१७ मधील कामे प्रगतीपथावर आहेत. अजून सत्र सुरू असल्याने आकडेवारीत तफावत दिसून येते. ठिंबक व तुषार सिंचनाचे एकूण १९७१.३१ लाखाची ६००४ कामे पूर्ण झालेली असून इतर २४६९९ कामे एकूण रू. २७१२७.५८ लाखाची आहेत व ४१ कामे प्रगतीपथावर आहेत.

'पाणीटंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९' जलयुक्त शिवार अभियान राज्यात राबविले जात आहे. या योजनेत शासनाबरोबरच लोकसहभाग आणि अशासकीय संस्था सुद्धा सक्रिय सहभागी आहेत. मराठवाड्यात या योजनेतंर्गत निवडलेल्या गावांची संख्या २८० असून २७५ इतक्या कामांमध्ये लोकसहभाग नोंदविला आहे. 'नाम' सारख्या अशासकीय संस्था लोकसहभागातून सर्वाधिक कामे करीत आहे.

गाव शिवारातून वाहून जाणारे पावसाचे पाणी गावातच साठवल्यामुळे लाखो लिटर पाणी जमा करता आले. त्यामुळे पाणी पातळीत वाढ झाली. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत २०१५-१६ मध्ये १३,००० कामे पूर्ण करण्यात आले त्यामध्ये १८९ कोटी रू. खर्च झाले आहे. मातीचे बांध २३६९, गाळ काढणे १११, शेततळे ६४१, साठवण तलाव १०६, नालाबांध ३५३, नाल्यांची दुरूस्ती ५३१, वनतळे २१४, वृक्ष लागवड ८७, विहीर पुर्नभरण ८८४, नाला खोलीकरण ४४४, सम पातळी चर ५०८, बांध बळकटीकरण १०५, शासकीय जागेत वनीकरण अशी विविध कामे झालेली दिसून येतात.

पाण्याच्या साठात प्रतिहेक्टर ०.२० टी.एम.सी.तर ४७० टी.एम.सी. वाढ होईल. सलग समतलचर १०० हेक्टर क्षेत्रावर २० टी.एम.सी. पाणीसाठा होईल. तालुक्यातील गावागावात नदी नाले खोलीकरणाची कामे १४१ कि.मी. इतकी पूर्ण झाली आहे. यात २१ लाख १५ हजार घनमीटर म्हणजेच २११५ टी.एम.सी. पाणी साचणार आहे. अहमदनगर, अकोला, अमरावती, सोलापूर, मराठवाड्यातील अक्कलकोट, करमाळा, बार्शी, माळशिरस यामधील २८० गावे दुष्काळ प्रवण

होती. त्या गावांची या योजनेतंर्गत पाणीटंचाई दुरू होण्यास मदत होईल.२०१७ या चालु वर्षात मराठवाडा १६८२ नागपूर विभागात १०७७ अमरावती विभागात १२००, पुणे विभागात ९००, नाशिक विभागात ९५१, कोकण विभागातील २०० गावांची या अभियानात निवड करून कार्याला सुरूवात झाली आहे. ६००० कोटी रू ची विशेष तरतुद जलयुक्त शिवाराकरिता करण्यात आली आहे. राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी कार्पोरेट सेक्टर आणि विविध अशासकीय संघटनांना या योजनेमध्ये आर्थिक आणि सामाजिक मदत व सहयोगाची अपेक्षा केली आहे.

**निष्कर्ष व सूचना :**

१) जलयुक्त शिवार अभियान हे कृषी क्षेत्राच्या आणि विकासाची नांदी आहे. निसर्गनिर्मित पाण्याचे संरक्षण ही जलक्षेत्रातील क्रान्तीच म्हणता येईल. पाण्याचा अपव्यय टाळून त्याचा महत्तम वापर यामधून होणार आहे.

२) मानवी जीवनाकरिता पाणी अनमोल असून पाणी टंचाई ही मुख्य समस्या आहे. त्यादृष्टीने हा प्रयत्न स्तुत्य आहे. परंतु या योजनेची अंमलबजावणी महत्त्वाची ठरेल.

३) जलयुक्त शिवार योजनेतील लोकसहभाग अधिक असला तरी जास्तीत जास्त लोकप्रतिनिधींनी जनजागृती व जलसाक्षरता अशी अभियाने राबविणे महत्त्वाचे ठरते.

४) वृक्ष लागवड या योजनेत ज्या प्रमाणात करण्याचे उद्दीष्ट होते त्या प्रमाणात साध्य झालेले दिसत नाही सामाजिक उपक्रम म्हणून वृक्ष लागवडी बरोबर वृक्ष संगोपनाची नोंद घेण्यात यावी.

५) सिमेंट बंधारा दुरूस्ती, वनराई बंधारे, माती नाला बांध दुरूस्ती, गार्बियन स्ट्रक्चर ही कामे अत्यल्प पूर्ण झाली असून कामांची संख्या व पूर्ण झालेल्या कामाची संख्या यामध्ये मोठी तफावत आहे.

६) मराठवाडा, विदर्भ याप्रदेशातील दुष्काळ ही गंभीर समस्या आहे. जलयुक्त शिवारांतर्गत सिंचन आणि पिण्याचे पाणी उपलब्धता वाढेल. परंतु काही गावांमध्ये या कामांचा वेग मंद आहे.

या योजनेचे स्वरूप पाहता, अमरावती जिल्ह्यातील गावांमध्ये जिल्हाधिकारी मा. श्री. किरण गिते, नाम संघटनेचे नेते नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे, अमीर खान, यासारख्या नामवंत व्यक्तींनी सक्रीय सहभाग नोंदविला आहे. मा. किरण गिते यांना उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले.

जलशिवार योजना हे अभियान २०१९ पर्यंत पाणीटंचाई दूर करण्याकरिता महाराष्ट्रातील या योजनेचे संपूर्ण देशात कौतुक होत आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**


१) अर्थसंवाद, ऑक्टोबर, डिसेंबर २०१५.
२) उद्योजक, मे २०१५
३) दैनिक अॅग्रोवन
४) www.mahgov.in
५) जलयुक्त शिवार योजनेचे अहवाल २०१५-१६, फेब्रु. २०१७.
६) डॉ. जहागिरदार दि.व्यं., 'आर्थिक जगत' लेख, दै.हिन्दूस्थान.


◆◆◆

# ब्रेक्झिट : २१ व्या शतकातील अर्थकारणाचे राजकारण

–श्रीनिवास खांदेवाले
नागपूर.

**विकासाच्या प्रक्रियेचे सामाजिक स्वरूप:**

विकास प्रक्रियेचे दोन मुख्य भाग पडतात: एक म्हणजे सतत बदलणाऱ्या (प्रगती करणाऱ्या ) तंत्रज्ञानाला भांडवलाची जोड देऊन वस्तू व सेवांचे उत्पादन वाढवून भौतिक संस्कृती बदलते. त्या सुविधा उपयोगात आणून नवी सामाजिक राजकीय मान्यता म्हणजे संस्कृती निर्माण होते. भौतिक प्रगतीमुळे महिला आता लाकडाच्या चुली किंवा कोळशाच्या शेगडया वापरणे मान्य करणार नाहीत, सदनिका संस्कृतीमुळे दोन परिवार एकत्र राहणे मान्य होत नाही, तसेच आता राजकीय एकाधिकारशाही मान्य केली जात नाही. बदलाच्या प्रत्येक टप्प्यात समाजाच्या मानसिकतेत किंवा मान्यतेत बदल होत जातात. हे सारेच बदल सर्वकाळ सुखकारकच असतील असेही नाही. म्हणून प्रत्येक बदल म्हणजे पुरोगामित्व किंवा प्रगती असे न मानता हया चर्चेपुरते त्यांना फक्त बदल असे म्हणून त्यांचे विश्लेषण करू.

एखाद्या देशाचा आर्थिक विकास काही कारणास्तव इतर देशांपेक्षा अधिक वेगाने झाल्यास त्याचा उपयोग राज्यविस्तारासाठी होत राहिला आहे आणि राज्यविस्तारातून पुन्हा आर्थिक विकास तीव्र करण्याची तजवीज करणे असे दुहेरी नाते आर्थिक व राजकीय बदलांमध्ये असते. ह्या आर्थिक व राजकीय बदलांचे आकारमान महत्वाचे नसून त्या बदलांमुळे त्या व्यवस्था स्वत:चा व इतर संबंधित संस्थांचा कार्यभार पेलण्यास समर्थ बनतात की नाही हा महत्वाचा निकष बनतो. आपल्या चालू उदाहरणात एखाद्या मोठया आर्थिक बदलामुळे अर्थव्यवस्था मोठी जरी होत असली तरी ती स्वत: कार्यदक्ष बनते का आणि वाढीव अर्थव्यवस्थेला सांभाळण्यासाठी राजकीय व्यवस्थेत जे बदल करावे लागतात ते करून राज्यव्यवस्था सक्षम राहते का असा प्रश्न उपस्थित होतो. त्यात हया दोन व्यवस्था (१) एकमेकींशी पूरक, (२) एकमेकींच्या विरोधी, किंवा काही वेळा (३) संबंध नसलेल्यासारख्या, असंबद्ध वागू शकतात. ज्या समाजात नागरिक आणि नेतृत्व हया दोन्ही व्यवस्थांमधील अंत:संबंध समजावून घेऊन भावनांच्या आहारी न जाता त्या क्षणी साकल्याने समाजाच्या हिताचे काय आहे ते धोरण ठरवितात, तो समाज प्रगत मानला जातो. ब्रिटनने युरोपीयन युनियनमधून बाहेर निघण्याचे जे धोरण ठरविले (ब्रेक्झिट= ब्रिटिश एक्झिट) आहे, ते आपण वर वर्णन केलेल्या पद्धतीने तपासणार आहोत.

ब्रिटनमध्ये वाफेवर चालणाऱ्या इंजिनांचा

शोध लागल्यानंतर व त्यांचा उपयोग वस्तू उत्पादनाच्या यंत्रांमध्ये, जहाजांमध्ये, वीज निर्मितीमध्ये झाल्याबरोबर औद्योगिक क्रांती झाली आणि वाढणारे कारखानी उत्पादन विकण्यासाठी ब्रिटनने जगभर वसाहती स्थापित करण्याचे राजकारण केले. साम्राज्यवादी अर्थव्यवस्थेसाठी साम्राज्यवादी प्रशासन निर्माण केले.राज्यव्यवस्थेला (क्राऊन=राजमुकुटाला) कोणत्याही हालतीत नुकसान पोचणार नाही हयाची करडया नजरेने काळजी घेतली जात असे. वसाहती स्वातंत्र्य मागू लागल्यानंतर ठिकठिकाणची आंदोलने आटोक्यात ठेवण्यासाठी प्रशासकीय खर्च वाढू लागला. स्वदेशीसारख्या आंदोलनामुळे ब्रिटिश मालाला मागणी कमी झाली. १९२९-३६ च्या महामंदीमुळे साम्राज्याचा महसूल कमी होऊन ते आर्थिकदृष्टया परवडेनासे झाले. १९३९ पासून सुरू झालेल्या द्वितीय महायुद्धात इंग्लंड-फ्रान्स-जर्मनी हे युद्धाचे भौगोलिक केंद्र होते. त्यामुळे ब्रिटनचा युद्धखर्च वाढून वसाहती परवडेनाश्या झाल्या. राजकीय परिपक्वतेचे लक्षण असे की ब्रिटनने लगेचच वसाहती देशांना स्वातंत्र्य देऊन जगातील सगळयात मोठे साम्राज्य गुंडाळले. त्या समाजाच्या राजकीय परिपक्वतेचे दुसरे वैशिष्टय असे की त्या समाजाने साम्राज्य कोणामुळे बुडले अशी चघळत राहणारी राजकीय चर्चा केली नाही.

ब्रिटिश साम्राज्य नष्ट झाल्यानंतर (द्वितीय महायुद्धाच्या समाप्तीनंतर) युरोप खंडातील सुमारे २८ देशांचा एक एकात्मिक संघ बनवावा, त्यात देशांच्या सीमा नाममात्र ठेवून युरोपचा एकच बाजार करावा, युरोपची संसद निर्माण करावी, कोळसा-लोखंडासारख्या मूलभूत नैसर्गिक संपत्तीचा उपयोग सामुहिकरीत्या करावा, सगळयांचे मिळून एकच चलन ठेवावे आणि सुसंस्कृत- समृद्ध-प्रगत युरोपचे चित्र पुन्हा निर्माण करावे असा विचार पुढे आला. त्यावेळी फ्रान्स, जर्मनी, स्पेन पोर्तुगाल, हॉलंड इत्यादी राष्ट्रे भूतपूर्व साम्राज्यवादी शक्ती होत्या. त्यांना स्वत:चा साम्राज्यवादी भूतकाळ विसरून युरोपीय संघात सामील व्हायचे का असा प्रश्न होता. त्यात अडसर असा होता की जर्मनी हे सर्वात प्रगत औद्योगिक राष्ट्र असल्यामुळे युरोपीय संघात वर्चस्व जर्मनीचे राहणार, हे स्पष्ट होते. जर्मनीमध्ये नाझीवाद विकसित होऊन जर्मन राष्ट्रवादाच्या भस्मासुराने जागतिक महायुद्ध भडकविले होते. तरी साम्राज्यवादी शोषणातून त्या देशांना जो आर्थिक लाभ मिळत होता तो एकदम कमी झाल्याबरोबर जी आर्थिक पोकळी निर्माण झाली होती, ती युरोपीय संघाच्या सामुहिक प्रयत्नांतून भरून काढता येईल म्हणून बऱ्याच देशांनी युरोपीय संघाच्या सर्व अटी मान्य करून सदस्यत्व घेतले. ब्रिटनने मात्र जगातील सर्वात मोठी साम्राज्यवादी शक्ती, लंडन हे तत्कालीन जगाच्या आर्थिक व्यवहारांचे (व त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाचे) मोठे केंद्र व जगातील महत्त्वाचे चलन स्टर्लिंग पौड असल्यामुळे युरोपीय संघाचे फक्त व्यापार विषयक सदस्यत्व घेतले. परंतु युरोपीय चलन (युरो) स्विकारले नाही. त्यामुळे सुमारे १९६० पासून आतापर्यंत युरोपीय संघ आणि ब्रिटन हयांचे संबंध धरसोडीचेच राहिलेत. त्यातही युरोपीय संघाचे अंतर्गत संघटनात्मक जे प्रश्न किंवा अडचणी निर्माण होतात त्या सोडविण्याऐवजी ब्रिटनने अलिप्ततेची किंवा टिकाकाराचीच भूमिका घेतली.

**ब्रिटनचे संगळलेले प्रश्न :**

युरोपीय संघाच्या करारात सदस्य राष्ट्रांमध्ये आपसात श्रमिकांना आवागमनाचे स्वातंष्य होते.

त्यातून युरोपातून श्रमिक येत राहिले, अरब राष्ट्रांमधून युरोपमध्ये येणारे निर्वासित येत राहिले आणि ब्रिटनच्या वसाहती देशांमधल्या नागरिकांना ब्रिटनमध्ये येण्याचा व स्थायिक होण्याचा जो अधिकार ब्रिटनने साम्राज्यवादी शक्ती म्हणून देऊन ठेवला होता, त्याचा उपयोग करून बरेचसे आशियाई आणि आफ्रिकन लोक ब्रिटनमध्ये स्थायिक झालेले आहेत. एकूण स्थलांतरित लोकांचे प्रमाण इतके वाढले आहे की मूळ ब्रिटिश लोकांना तो देश त्यांचा राहील की नाही अशी भिती (मुंबई, पुण्यासारखी) वाटू लागली आहे. हया स्थलांतरितांमध्ये रोजगारासाठी येणाऱ्या तरूणांचे प्रमाण जास्त आहे. त्यांना चांगली आरोग्य व्यवस्था, चांगल्या नोकऱ्या, समान अधिकार म्हणून मिळाव्या, हया मागण्यांचा दबाव राजकीय पक्षांवर होता आणि आहे.

युरोपीय संघात स्पेन, पोर्तुगाल, ग्रीस इत्यादी कमी विकसित देश आहेत ते अल्प विकास, विषमतांमुळे अल्प उत्पन्नाच्या लोकांचे प्रश्न आणि सरकारे कर्जावर चालणे, इत्यादी प्रश्नांनी ग्रस्त आणि त्रस्त असताना त्यांना आर्थिक मदत करण्याचेही ब्रिटनने टाळले आणि तो बोजा मुख्यत: जर्मनीवर येऊन पडला. त्यामुळे एकटया जर्मन नागरिकांनी किती कर द्यायचा हया मुद्द्यावरून जर्मनीत राजकीय मत राष्ट्राध्यक्ष मर्केल हयांच्या विरोधात जाऊ लागले. ब्रिटनला स्वत:चे आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी आर्थिक व राजकीय अंतर्गत धोरणांमध्ये जे बदल आवश्यक वाटत होते ते करणे युरोपीय संघाच्या निर्बधांमुळे शक्य होत नव्हते. त्यामुळे ब्रिटनने युरोपीय संघातून बाहेर पडावे असे मत ब्रिटनमध्ये अधिक लोकप्रिय होऊ लागले होते. ब्रिटनच्या संयुक्त राज्यामध्ये (युनायटेड किंग्डम =यु.के.) मध्ये मुख्य तीन प्रदेश आहेत, ते म्हणजे ब्रिटन, स्कॉटलंड आणि आयर्लंड. त्यापैकी स्कॉटिश लोकांना स्वत:वर सतत अन्याय होतो ही भावना असल्यामुळे त्यांचा सततचा प्रयत्न संयुक्त ब्रिटिश राज्यातून बाहेर पडून स्वतंत्र देश स्थापन करावा, असा आहे. २०१५ मध्ये त्याबाबत स्कॉटलंडमध्ये सार्वमत घेण्यात आले होते. त्यात संयुक्त राज्यात राहावे हया मताचा निसटता विजय झाला. तरी स्कॉटिश लोकांच्या मनातील अन्यायाची सल कायम आहे. ब्रिटनमध्ये अन्याय होतो, परंतु युरोपीय संघाचे समान नागरिक म्हणून युरोपीय देशांमध्ये सुलभतेने जात येते म्हणून स्कॉटलंड मधील लोक ब्रिटनने युरोपीय संघातून बाहेर पडू नये हया मताचे होते.

**जागतिकीकरणाचा राजकीय परिणाम :**

जागतिक व्यापार संघटनांमुळे(डब्लयू. टी. ओ.) ज्या निर्णयांनी लोकांचे भौतिक कल्याण निश्चित होते असे मजुरीचे दर, आरोग्यविमा असे बरेचसे आर्थिक निर्णय बाजारावर सोपविले गेले. त्यामुळे विविध देशांमधील संसदा आणि सरकारे राजकीयदृष्टया कमकुवत झाली. त्याचा परिणाम असा झाला की विशेषत: कष्टकरी जनतेत अशी भावना निर्माण झाली की हया राजकीय व्यवस्था, संसदा, सरकारे, राजकीय नेतृत्व हे सगळे फोल आहे आणि त्या सगळयांच्या विरूद्ध जनतेने आवाज उठविणे आवश्यक आहे. हया प्रक्रियेचा साकल्याने परिणाम असा झाला आहे की जगभर निवडणुका लढविणारे नेते आहेत, परंतु सर्व जगाचा दीर्घकालीन विचार करून धोरणे सुचविणारे मुत्सद्दी-विचारवंत नेते कुठेच उपलब्ध नाहीत. वैचारिक राजकारणाची पोकळी निर्माण झाली आहे. जगाला राज्यव्यवस्थेचा (सिटी स्टेट्स) विचार देणारा ग्रीस, जगाला संसदीय

लोकशाही देणारा ब्रिटन, गेली अडीचशे वर्षे आर्थिक सुबत्ता उपभोगून जगभराच्या राजकीय उलाढाली करणारा अमेरिका, हे सगळे आज वैचारिक राजकारणाच्या दृष्टीने प्रभावहीन झाले आहेत.

२०१६ च्या उन्हाळयात जेव्हा ब्रिटन मध्ये सार्वमत घेतले गेले तेव्हा व्यापाराच्या संधी, तांत्रिक प्रगतीत सहभाग, नॅटो हया संघटनेद्वारा रशिया विरूध्द युरोप बरोबर ब्रिटनलाही मिळणारे संरक्षण इत्यादी फायदे टाकून देऊ नयेत व युरोपीय संघ सोडू नये असे हुजूर (काँझर्व्हेटिव्ह) आणि मजूर (लेबर) हया दोन्ही पक्षांच्या नेत्यांचे मत होते. त्या मताचा त्यांनी प्रचारही केला. सर्वांना युरोपीय संघ सोडू नये असा कौल मिळेल असे वाटले होते. झाले उलटेच. ५२ टक्के मतदारांनी युरोपीय संघ सोडण्याच्या बाजूने मतदान केले. रागाच्या भरात लोकांनी चुकीचे मतदान केले असे म्हणत पुन्हा सार्वमत घ्यावे अशीही चळवळ २-४ दिवस चालली. परंतु हा जनतेचा कौल आहे, तो मान्य केलाच पाहिजे असे म्हणत सत्ताधारी प्रधानमंर्त्यांनी आणि विरोधी पक्ष नेत्यानेही आपापल्या पदाचे राजीनामे दिले. ब्रिटनने हा निर्णय युरोपीय संघाला कळविला.

महा-युरोपची (पॅन-युरोप) नवी प्रतिमा तयार करू पाहणाऱ्या युरोपीय नेत्यांना हा धक्का होता. युरोपीय संघाच्या ज्या देशांमध्ये आर्थिक व राजकीय परिस्थिती असमाधानकारक आहे तिथे अशा प्रकारच्या सार्वमताची मागणी सुरू झाली. त्यातून गळती वाढेल हया भितीने युरोपीय संघाच्या नेत्यांनी कणखर भूमिका घेऊन ब्रिटनला बाहेर घालविण्याच्या, त्यांच्या अखत्यारीतील, औपचारिकता पार पाडल्या.

**'ब्रेक्झिट इज ब्रेक्झिट'**

सार्वमताच्या वेळी असलेल्या प्रधानमंत्र्यांनी (डेव्हिड कॅमेरून) ज्या त्वरेने राजीनामा दिला तो, लोकांनी त्यांच्यावर विश्वास दाखविला नाही, म्हणून. पदाला चिकटून राहण्याच्या भारतातील राजकीय संस्द्धतीला त्याचे नाविन्य वाटले. त्या पक्षाजवळ बहुमत असल्यामुळे त्याच पक्षाच्या, त्याच मंत्रीमंडळातील एक मंत्री तेरीसा मे हयांना प्रधानमंत्री म्हणून निवडले गेले. वास्तविक पाहता तेरीसा मे हयासुध्दा व्यक्तीशः युरोपीय संघ सोडू नये हया मताच्या होत्या. परंतु स्वतःच्या मताला मुरड घालून प्रधानमंत्री झाल्याबरोबर त्यांनी जाहीर केले की सार्वमत आहे तर युरोपीय संघ सोडायचाच ('ब्रेक्झिट इज ब्रेक्झिट'). ती प्रक्रिया सुरू करण्यासाठी संबंधित विधेयक संसदेत पारित करून घ्या असे तेथील सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. फेब्रुवारी २०१७ मध्ये ती प्रक्रियाही पार पडली आहे(पहा : इंडियन एक्सप्रेस, दि. १४ फेब्रुवारी २०१७).

**समारोप :**

सार्वमतानुसार धोरण बदलाची प्रक्रिया सुरू झाल्याबरोबर ब्रिटनने आशिया- आफ्रिकेतील आपल्या (भारतासह) जुन्या वसाहती देशांशी व्यापार संबंध पुन्हा स्थापन करण्याचा प्रक्रिया सुरू केली आहे.

हया सर्व प्रकारणात महत्वाचा मुद्दा येतो तो मूळ ब्रेक्झिटचा. ब्रिटनची सध्याची राज्यव्यवस्था आर्थिक-सामाजिक आकांक्षा पूर्ण करू शकत नाही म्हणून जनतेने दोन्ही मुख्य राजकीय पक्षांचे मत झुगारून युरोपीय संघ सोडण्यास भाग पाडले. पण

पुढे काय? युरोपीय संघाबाहेर राहून त्या आकांक्षा पूर्ण करण्याची शक्यता व क्षमता निर्माण होण्याची प्रक्रिया कशी असेल?

ब्रिटनमध्ये सांसदीय लोकशाही विकसित झाली. परंतु पूर्वीच्या सरंजामशाहीतील विषमता, त्यावर साम्राज्यवादातील विषमतांचा थर आणि त्यावर जागतिकीकरणाच्या काळातील नव्या विषमतांचा थर, अशा साठलेल्या विषमता आणि दुसरीकडून वंचितांच्या नव्या पिढीचा आर्थिक-सामाजिक न्यायासाठी आक्रोश, अशी ही विसंगती निर्माण झाली आहे. त्या विसंगतीने प्रथम दोन्ही राजकीय पक्षांच्या नेत्यांना राजीनामे देण्यास भाग पाडले. ही घटना सध्याच्या राज्यव्यवस्थेला व सरकारला इशारा आहे. युरोपीय संघातून बाहेर पडणे हा पहिला टप्पा होता. केवळ व्यापार वाढणे व राष्ट्रांची संपत्ती वाढणे एवढे पुरेसे नाही. त्या संपत्तीमधून सगळयांना चांगले जीवन देणारी राज्यव्यवस्था निर्माण होणे हे ही महत्त्वाचे आहे. त्यामुळे ब्रिटनमध्ये पुढे काय घडते हे पाहणे प्रबोधनकारी राहील.

◆◆◆

# Brexit : Trade relations between India and United Kingdom

**- Sneha Deshpande**
Prof.& Head ,
Dept.of Economics
R.T.M.Nagpur Univeristy, Nagpur.

***"We are in the midst of an age of competitive devaluation and beggar-thy-neighbor policy. When elephants fight, the grass suffers."***

**- Mr. Raghuram Rajan**

Global recession has brought change in the system of world economy. It seems the world economy is moving from globalisation to protectionism .To strengthen the economy after recession of 2008 the people of Great Britain gave a referendum that they would like to be different form European Union . So BREXIT which in simple terms means Britain exiting from the membership of European Union. To be away from the European Union it conducted a voting system saying yes or no which is known as referendum to decide whether Britain wants to continue membership under EU or not. The referendum was held on 23rd June 2016 and 52% voted for BREXIT whereas 48% voted for remaining within the EU. Although the referendum is not binding on the Britain's parliament, the PM has announced that he has to respect the will of the people.

To give referendum in favour of exiting the European Union brings forth many discussions relating what will happen to countries which have such type of unions to run the show of the economy.

**How European Union came into existence :**

European countries came together because of destruction of Second World to establish their trade relations so that there should not be competitions amongst themselves. This step was taken by Germany and France . The result was that 6 member countries (France, Germany, Italy, Belgium, Luxemburg and Netherlands) signed a deal covering resources like coal and steel. In 1957 a treaty was signed in Rome ( Europe) European Economic Community ( EEC) or common market. The Great Britain became part of it in 1973 and through referendum in 1975 decided to stay in EU. There are

28 countries taking part in it.

There are four key institutions in the EU

1. **European Commission -** based at Brussels (Belgium), it consists of 28 commissioners (1 each from the member states,) it administers the money spent and also formulates new laws
2. **European Parliament**- based at Brussels (Belgium), there are 751 members in the parliament, their function is to discuss and vote all the laws that have been proposed by EC
3. **Council of European Union** - based at Brussels (Belgium), It is where the government of each member country will have their say and hold discussions as to in what political direction should the EU be moving. Usually the deals are signed at the end of the discussions
4. **European Court of Justice-** based at Luxembourg. The function is to make sure that all the member states abide by the rules and regulations; will also come into picture if there are any frictions between the above three institutions.

Today, Great Britain has exited itself from EU because it feels that it has lost its sovereignty. British Government had an influence in some form in selecting the members to the European Commission, the members are neither under the influence nor accountable to the British Parliament and some of the policy decisions such as competition policy, agriculture, copyright and patent law go against the interests of Britain (these laws override the domestic laws). Some of the regulations such as - limits on the power of vaccum cleaners , non recycling of tea bags etc have often been seen as a burden on some of the conservatives in Britain. These reforms are putting economic burden on the govt.

Although Euro is the common currency for EU but Britain still uses pound as its currency. Now if the euro had to be successful then it would have required greater fiscal and monetary policy. The problem of one currency has been observed in Greece and Spain's economic conditions. These two countries are facing problems of high debt, high rate of unemployment where as country like Germany is enjoying higher growth. There is problem of immigration also between Britain and other European Countries as Britain is not a signatory of Schengen Border free zone (allows easy travel across Europe), over the last ten years there has been a quite an opposition towards migration into the country from within the EU and its effects on wages and public services especially post 2008 recession

wherein the workers from Lithuania, Poland, Italy, Romania etc have moved to Britain. European Union does not have the powers to collect the taxes from the people directly; it mandates member countries to make payments. In case of Britain it comes around $19 bn per year or $300/person although the funds are again used on Britain. Thus, now the people gave the vote to be away from the union and maintain their country's individuality. This status of Great Britain has brought impact on the relationship with other counties also mainly related to trade and immigration policies.

**The Trade relationship between India and Great Britain Pre and Post Brexit :**

**Free trade agreement was the agenda**

India and EU have been negotiating the Bilateral Trade and Investment Agreement (BTIA) since 2007, covering trade in merchandise, services, and investment. This is yet to reach a conclusion. However, post-Brexit, UK will necessarily be excluded from BTIA.

The European Union (EU), including the United Kingdom (UK) is the most important trading partner of India. According to the European Commission (2016), the value of EU-India trade grew from 28.6 billion Euros in 2003 to 72.5 billion Euros in 2014 and EU investment stock in India was 34.7 billion Euros in 2013. At the same time, India is emerging as a global economic power and a growing market of more than 1 billion people. Because of the growing importance of each other as trade partners, India and the EU initiated negotiations for a Free Trade Agreement (FTA) in 2007. So far, most of India's trade negotiations have remained within Asia and, for the EU, trade negotiations have been conducted mostly with its neighbouring countries.

The free trade agreement between India and UK is different from other trade negotiations, especially for India, because of the considerable difference between these two economic units with respect to their economic developments. The decision of UK to exit from EU brought immediate effect on the trading economies especially in the stock market and foreign exchange currency market via the price of pound. There is uncertainty regarding the UK's new policies and regulations and the new international relations that will emerge.

Therefore, considering this situation the two trading partners will have direct impact on trade flows among and indirect impact on income growth and to their trading partners. Thus, now the cost of trade will change trade agreements and the result will be change in the amount of

trade between UK and India.

Before Brexit, EU (28 nation Bloc) was the largest trading partner in terms of total trade i.e .exports and imports with India. According to the European Commission the trade was the largest trading partner .European Union accounted for 12.9 percent of India's total trade in 2014. In terms of exports, the EU is the largest (16.2 percent) and in terms of imports the EU is the second largest (10.6 percent ) trading partner of India.

**Figure 1. EU exports and imports with India**

(2007~2015)




(Notes) i) The vertical axis represents trade values in billion US dollars and the horizontal axis represents the respective years. ii) Poly, (import) in Figure 1 indicates polynomial trend line (of order 2) of import data. (Source) COMTRADE (WITS online, accessed on May 18, 2016)

India is relatively less important as a trade partner in terms of total trade share of the EU. In 2015, India accounted for 2.2% of total trade of the EU. The United States of America (USA) and China account for the maximum share of total trade of EU and India ranks ninth in terms EU's trading partner.

**A. Trade composition**

Trade composition between the EU and India reveals that industrial products account for more than 90% of all traded commodities between them. Though agricultural products are important in terms of their share in total EU imports from India, industrial product defines almost all export

from EU to India.

**Table 1. Trade composition of European Union with India**

(% in total imports and exports)

| | Imports | | | | Exports | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Year | 2012 | 2013 | 2014 | 2015 | 2012 | 2013 | 2014 | 2015 |
| *Agricultural products* | 7.5 | 7.5 | 7.5 | 7.6 | 1.2 | 1.3 | 1.5 | 1.9 |
| *Fishery products* | 1.7 | 1.7 | 2.4 | 2.3 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| *Industrial products* | 90.8 | 90.8 | 90.2 | 90.1 | 98.8 | 98.7 | 98.4 | 98.0 |

(Source) Eurostat Comext (Statistical regime 4, 14.4.2016), from Directorate General for Trade May 19, 2016 (http://trade.ec.europa.eu/doclib/docs/2006/september/tradoc_113390.pdf).

The structure of exports and imports in 2014 shows that chemical and rubber products, textiles and wearing apparel, electrical machinery and apparatus, watches and clocks, and medical, precision, and optical instruments were the most important imported commodities from India. Electrical machinery and apparatus, medical, precision, and optical instruments, watches and clocks, mining of metal ores, uranium, gems, other mining and quarrying, and chemical and rubber products were the most important commodities imported to India from the EU.

Among EU countries, while Germany is India's largest trade partner , UK stands to be India's third largest trade partner and biggest importer of goods . Moreover, India has had a trade surplus with UK in the past three years. It is thus crucial for India to have a first mover advantage by executing a bilateral trade agreement with UK encompassing goods, services and technology. Among EU countries , Germany is India's largest trade partner and biggest importer of goods .

The current situation brings forth that UK has to establish itself as a single market. UK will need to independently navigate global trariffs and non tariff barriers including standards, regulations or rules of origin. Relying solely on world trade Organisation rules to enhance trade would not remove trade barriers. UK would therefore mainly depend on independent trade deals. Also, with 50 trade agreements between EU and other countries ceasing to apply to UK and after losing EU's Market, UK would want to develop trade relations with emerging markets like India.this strengthens India's position .For UK, India is an attractive trade partner ,with

high proportion of skilled working age group of population and high growth rate. This gives opportunity for India's financial and small and medium sized enterprises sector. Trade in services of Information Technology and banking would also benefit. UK was the biggest investor in India among the G-20 nations in 2015, while India represents the third largest source of foreign direct investment in Britain. Thus FTA can lead to greater trade and investment between the two countries.

**B. Impact On Different Sectors :**

Some sectors are going to be face a dip in their business like automobiles, auto components, pharmaceuticals, gems and jewellery, education and IT enabled services. Most of these will be vulnerable to changes in demand and currency values. The real impact will be seen when UK will impose any trade restrictions between the EU and UK which will be clear in near future. It is felt that IT sector will have negative impact of this step. A sustained depreciation of Pound might call for a renegotiation of the contract, as the profitability of these contracts might fall below the expected levels. The pharma companies do not really expecting a big hit following the Brexit and have indicated a limited impact of Pound depreciation. Thus, it appears that the exact change in trade pattern will be visible when there will be treaty with the specific conditions by both the countries. At present only change can be visualise with certain conditions only.

**Last word :**

Lot of uncertainty looms on the Businesses and trade relations between UK and India and between EU and India. Uncertainty undermines investor confidence and thus it is itself a threat to UK economy. This environment will have impact on GDP of UK. Brexit will dramatically alter the UK's relations with its biggest trading partner i.e. European Union. So it is necessary that there should be interim plans to reduce the shock .A transitional agreement will therefore almost necessary to judge the future road of trade relations with the trading countries. This transitional arrangement would allow negotiations to be conducted in a less pressured environment, benefiting all concerned.

**REFRENCES :**


1. Bromley, Mark (2016): "Brexit and Export Controls: Entering Uncharted Waters," Stockholm International Peace Research Institute (SIPRI), 1 July, https://www.sipri.org/commentary/topical-backgrounder/2016/brexit-and-export-controls-entering-uncharted-waters.
2. FICCI (2016): "BREXIT-Views and suggestions from India Inc," Federation

of Indian Chambers of Commerce and Industry, July, http://ficci.in/SEDocument/20369/BREXIT-July-2016.PDF.

3. http://cep.lse.ac.uk/pubs/download/brexit02.pdf
4. http://www.cer.org.uk/sites/default/files/publications/attachments/pdf/2014/pb_british trade_16jan14-8285.pdf
5. fhttp://ficci.in/SEDocument/20369/BREXIT-July-2016.PDF
6. https://www.global-counsel.co.uk/sites/default/files/special-reports/downloads/Global%20Counsel_Impact_of_Brexit.pdf
7. https://www.ijsr.net/archive/v5i7/ART2016623.pdf
8. https://www. publications. parliament.uk/pa/ld201617/ldselect/ldeucom/72/72.pdf
9. https://www.pwc.nl/nl/brexit/documents/pwc-brexit-monitor-trade.pdf
10. Indian Express (2016): "Britain Decides to Leave EU: RBI Prepared for Any Eventuality, Says Raghuram Rajan," 24 June, online edition, viewed on 21 August, http://indianexpress.com/article/business/market/britain-decides-to-leave-eu-rbi-prepared-for-any-eventuality-says-raghuram-rajan-2872957/ -
11. Mathur and Roy (2016),Brexit and India - EU Free Trade Agreement , Journal of Economic Integration Vol 31 No.4 pp. pp. 740-773
12. Persaud Avinash (2016) Brexit and other Harbingers of A Return to the Dangers of the 1930s,Economic and political weekly vol. 51 Issue No. 33, 13 Aug.,2016
13. UK Trade and Investment (2016): "UK-India Explore Opportunities and Collaborations in Creative Industries," Government of the UK, https://www.gov.uk/government/world-location-news/uk-india-explore-oppor...-collaborations-in-creative-industries, accessed on 1 July 2016.

◆◆◆

# ब्रेग्झिट : कारण परिणाम मीमांसा

**सोनल जनबंधू**
अर्थशास्त्र विभाग,
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,
अमरावती.

**वैशाली देशमुख**
अर्थशास्त्र विभाग,
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,
अमरावती.

## १. प्रस्तावना :

पिछले कुछ दिनों से आपने Rexit शब्द को कई बार अखबार में पढ़ा होगा । उसका अर्थ भी जानते होगें कि रघुराम राजन की RBI के कार्यकाल को दूसरी बार जारी न करने का फैसला किया इसके पश्चात ही यह शब्द आया जो रघुराम के R और अंग्रेजी शब्द Exit को मिलाकर बनाया गया । यह शब्द वास्तव मे Brexit से प्रेरीत है जिसको लेकर ब्रिटेन की जनता ने एक अह्म फैसला लिया है । Brexit से भी पहले एक शब्द गक्जिट (Grexit ) जो ग्रीस के युरोजोन छोडने की उहापोह के दौरान लाया गया है।

Brexit का फैसला यह ब्रिटेन की जनता द्वारा लिया गया । ब्रिटेन की जनता ने रेफ्रडम की सहायता से Brexit का फैसला लिया । Brexit का अर्थ है कि ब्रिटेन अब ईयू का हिस्सा नही रहेगा। रेफ्रडम यह वोट करने का युरोपियन युनियन का एक तरीका है जिसमें किसी भी अह्म सवाल का जवाब 'हा' या 'ना' में देने के लिए वोंटिग की जाती है । वोंटिग के लिए पात्र सभी लोग इसमें अपना मत दे सकते है और जिसके पक्ष में आधे से ज्यादा वोट मिलते है फैसला उसके पक्ष में आता है। युरोपियन युनियन (ईयू) क्या है ? यह २८ युरोपियन देशों का एक समूह है। जिनकी राजनैतिक और आर्थिक रूप से साझेदारी है । इसकी शुरूआत द्वितीय विश्वयुद्ध के बाद आर्थिक सहयोग के रूप में की गई थी । ऐसा देशों का मानना था कि जो देश व्यवसायिक रूप में जुडे होते है वे आपस में युद्ध नहीं करते है । इस समूह के बनने के बाद सदस्य देशों की जनता और सामान का आदान-प्रदान बिना रोकटोक के होता है । यही वजह है कि जब आप युरोप घुमने जाते है तो ट्रेन पकड़कर एक देश से दूसरे देश जा सकते है । इस समूह मे १९ देशों के बीच व्यापार के लिए युरो मुद्रा चलती है। इसके अलावा पर्यावरण, परिवहन, ग्राहक अधिकारों से संबंधित एक ही नियम लागू रहते ।

## २. युरोपियन युनियन से ब्रिटेन का अलग होना

अब प्रश्न यह उठता है कि इतनी पुरानी युरोपियन से ब्रिटेन क्यो अलग होना चाहता है ? वोंटिग से जो फैसला सामने आया है उससे यही कहा जा सकता है कि ५२ प्रतिशत जनता चाहती थी कि ब्रिटेन को युरोपियन युनियन से अलग हो जाना चाहिए । इसकी कई वजह है । बीबीसी द्वारा दी गई जानकारी के अनुसार माना जाता रहा है कि ईयू के नियमों से खुद को बांधे जाने की वजह से ब्रिटेन कई मामलो में पिछे रह गया था। ब्रिटेन का

आरोप है कि ईयू ने व्यापार से जुडे कई सख्त नियम खडे कर दिए थे और कई करोड पाऊंड की सालाना सदस्यता फीस देने के बदले ब्रिटेन को कुछ खास प्राप्ती नही हो रही थी ।

ब्रिटेन के लिए युरोपियन युनियन को छोडने की कई वजह में से एक यह थी कि वह अपनी सीमाओं पर पूरी तरह अपना अधिकार काम करने वाले लोगो की भी संख्या कम करना चाहता था । ईयू का सदस्य होने के कारण सदस्य देशों की जनता के आने जाने पर कोई रोक टोक नही थी जिससे ब्रिटेन की जनता खुश नही थी । साथ ही, वर्तमान में युरोप के कई देशो से शरणाथियों के आगमन की समस्या भी एक चिंता का विषय है । २०१५ मे सीरिया, अफगानिस्तान और इराक जैसे देशों के कई लाख शरणाथियों ने युरोप से बचे हुए नही है वैसे भी काम और अच्छी जिन्दगी के लिए एशियाई युरोप में ब्रिटेन को ही अच्छी जगह मानते है । शरणार्थियो के आवेदनो के कारण भी ब्रिटेन की जनता के मन में डर बैठ गया है कि उनके हिस्से की नौकरीयों और कई लाभ बाहर से आनेवाले लोगो को प्राप्त होंगे । ऐसे मे वह ईयू से अलग होकर प्रवासियो से संबंधित नियम स्वयं से तैयार करने के पक्ष में है ।

**३. व्यापार के संबंध में विशेषज्ञो के मत :**

व्यापार के संबंध में कहा जाए तो विशषज्ञो का मानना है कि ईयू के साथ रह कर ब्रिटेन को व्यवसाय मे अधिक लाभ प्राप्त होता है क्योकि ऐंसे में पैसे के साथ-साथ लोगों और सामान को एक देश से दूसरे देश तक पहुचाने में आसानी होती है । वही कुछ विशेषज्ञो का मानना है कि अलग होने के बाद ब्रिटेन उन २८ देशो का हिस्सा नही रहेगे और अपने दम पर व्यापार कर पायेगा । वही पाऊंड को लेकर अधिकारिक तौर पर साफ नही हो पाया है लेकिन प्रधानमंत्री कॅमरून ने यह साफ किया की ब्रिटेन कभी भी युरो को नही अपनायेगा ।

**४. ब्रेग्झिट के क्यो थे पक्ष मे और क्यो थे विपक्ष में :**

इंग्लंड का ईयू में बने रहने का समर्थन करने वालो का मानना था कि ब्रिटेन की अर्थव्यवस्था ईयू के निर्णयो से ही चलती है । युरोपियन युनियन के साथ रहकर ही ब्रिटेन का लोकतंत्र सुरक्षित है । युरोपिय अर्थव्यवस्था को भी बल प्राप्त होता है । जब कि विरोध करनेवालो का मानना था कि युरोपियन संघ अपनी वर्तमान राजनैतिक क्षमताओं और सीमाओं से बाहर जा रहा है जो किसी भी देश के हित में नही। ब्रिटेन की प्रगति शायद रूक गई है । मैन्यूफैक्चरिंग इडंस्ट्री काफी दिनो से सूस्त पडी थी। इसलिए लोगो को लग रहा था कि ईयू से ब्रिटेन का अलग होना ही ठीक है ।

**५. ब्रेग्झिट के परिणाम -**

१) कॅमरून का इस्तीफा - इस रेफरैडम के बाद युके के लिए सबसे बडा झटका पीएम डेविड केमरून का इस्तीफा होगा । इसका एलान खुद कॅमरून भी कर चुके है । इस फैसले पर उनका पुरा पोलिटिकल करियर टिका हुआ था, जो खत्म होने की दिशा में है ।

२) बट सकता है यूके - युके के ५२ प्रतिशत लोगों ने भले ही ईयू से अलग होने के लिए वोट किया, लेकिन नॉर्दन आयरलैंड और स्कॉटलँड इस फैसले से खुश नहीं है । नॉर्दन आयरलैंड से ७८.३ प्रतिशत वोट इयू मे बने रहने के लिए पड़े, जबकी स्काटलँण्ड से ६२

प्रतिशत वोट ईयू मे बने रहने के लिए पडे ।

३) आर्थिक स्थति मे परिवर्तन – लॉबी ग्रुप ने लंदन को बँकिंग इन्श्योरन्स ओर एसेटस मॅनेजमेंट के सेक्टर में एक बडे एम्पालरर के तौर पर डेव्लप किया । युनियन में मेंबरशिप के चलते उस शहर को फाइनेंशियल विंडो के तौर पर इस्तमाल किया जाता रहा है । हालाकि अब ब्रेग्जिट के बाद फाइनेशियल इंस्टीट्यूशन ईयू के दुसरे बडे शहर की ओर रूख करेगा ।

४) नौकरी पर संकट – कई बैंको ने पहले ही चेतावनी दे दी थी कि ब्रेग्झिट के बाद युके मे ज्यादा स्टाफ रखने का कोई मतलब नही रह जाएगा । जेपी मॉर्गन ने कहा था इसके चलते युके में कम्पनी के ४००० नौकरिया कम होगी । वही एचएसबीसी १००० पोस्ट कम कर उसे पेरिस में शिफ्ट कर सकता है । बाकी दुसरे सेक्टर्स मे थी इसका असर पडेगा।

५) अर्थव्यवस्थापर असर – नतीजो के बाद ही ब्रिटेन की मुद्रा पाऊंड मे ३१ साल मे सबसे बड़ी गिरावट देखी गई । वही ईयू के अंदर अब युके को ईजी बिजनेस की सुविधा भी नही मिलेंगी । युके की इकोनॉमी को अब नये बाजार खोलने होगे ।

**६. भारत पर ब्रेग्झिट का परिणाम :**

युरोपियन युनियन से ब्रिटेन का बाहर निकला यह ब्रिटेन का अपना निर्णय है । इसका विश्व और भारत पर कुछ प्रभाव अवश्य होगा । ब्रिटेन एक बहुत बडी अर्थव्यवस्था भी है और पावरफुल देश भी है ।

१) भारत में यदि ब्रेग्झिट का असर देखे तो इसका सबसे अधिक असर टाटा मोटर्स, टाटा स्टील व आई.टी. कम्पनियो पर पडेगा । ब्रिटेन में भारत का जिन कम्पनियों का सबसे ज्यादा निवेश है उसमे टाटा मोटर्स के स्वामित्व वाले जगुमार लैड-रोवर्स व टाटा स्टील का ब्रिटेन के बाजार मे मजबूत हिस्सेदारी है । ये कम्पनिया बडा पौंड मे कमाती है किंतु ब्रेग्झिट के बाद पौंड की वेल्यू कम हो रही है जिसके कारण इन कम्पनियो के मुनाफे पर भी असर पडेगा ।

२) भारत पर ब्रेग्झिट का दूसरा असर यह पड़ सकता है कि मारिशस और सिंगापूर के बाद ब्रिटेन का भारत मे तीसरा सबसे बडा निवेश है । के बाद ब्रिटेन की अर्थव्यवस्था कमजोर होती है तो इसका निवेश पर भी परिणाम होगा हो सकता है कि निवेश कम हो जाए । क्योकि कोई भी देश कमजोर देश मे निवेश नही करना चाहेगा ।

३) पौंड के कमजोर होने से डालर मजबूत होगा ऐसी स्थिति मे रूपया डालर के मूकाबले कमजोर होने की सम्भावना है ।

४) यह सब सिर्फ शोर्ट-टर्म के लिए होगा । लॉंग टर्म मे भारत कोई नुकसान नही होगा ।

वर्तमान मे अभी अभी एक खबर आयी कि लंदन ब्रिटेन की संसद ने विधेयक को भारी बहुमत से समर्थन किया है जो प्रधानमंत्री टेरीजा मे को ३१ मार्च तक ब्रेग्झिट को लेकर प्रक्रिया शुरू करने के लिए पूरा अधिकार देता है । यूरोपियन संघ (वापसी की अधिसूचना) विधेयक पर हाऊस ऑफ कामन्स मे अंतिम चर्चा और बुधवार का मतदान हुआ ताकि ब्रिटेन की प्रधानमंत्री को लिस्बन संधि के अनुच्छेद ५० का लागू कराने की अनूमति मिल सके जिससे वर्ष २०१९ तक यूरोपीय संघ के गैर

सदस्य के तौर पर ब्रिटेन के नये समझौतो के लिए वार्ता का दो वर्षीय अवधि सुरू हो सके । इस मसौदा विधेयक को १२२ मतो की आवश्यकता थी किन्तु इसे ४९४ मतो से पारित किया गया और इसे हाऊस ऑफ लार्ड्स मे पारित किया गया ।

इसके पहले हाऊस ऑफ कामन्स के सदस्यां ने विधेयक के अंतिम संशोधनो पर चर्चा की जिनमे वार्ता प्रक्रिया के लिए अहम सिद्धांत भी शामिल है। इसके बाद विधेयक को मतदान के लिए अंतिम बार पढ़ा गया । विपक्ष की नेता जेरेमी कोरबिन ने उनके सांसदो को पहले ही निर्देश दिया था कि वे विधेयक के पक्ष में मतदान करे ।

पिछले महिने के मतदान के समय ४९ से अधिक सांसदों ने व्हिप का उल्लंघन किया था । छाया व्यापार मंत्री क्लाईव लुईस विपक्षा लेबर पार्टी ५२ सांसदों में शामिल थे । क्लाइव ने विधेयक को समर्थन देने के पार्टी के आदेशों की अवहेलना की और फिर उन्होने शेडो केबिनेट से इस्तीफा दे दिया। इसके पश्चात के मतदान में वे शामिल नही हुई । छाया गृहमंत्री डी.एन.एबॉट ने विधेयक को समर्थन दिया ।

उन्होंने बीबीसी को बताया कि उन्होने ब्रेग्झिट के बारे में कुछ आशकांए है और उनका अनुमान है कि ब्रिटेन इसको लेकर अफसोस भी करेगा, उन्होने यह भी कहा कि मै छाया केबिनट की एक वफादार सदस्य हूँ, मै जेरेमी कोरबिन के प्रति वफादार हूँ । मेरे को खुद विद्रोह का सामना करना पड़ा । जब उनके एक दर्जन से अधिक कंजरवेटिव सांसदो ने अलग रूख अख्तियार किया लेकिन उन्होने यह वाद करके बार्टी की बगावत को कम कर दिया कि ब्रेग्झिट को अंतिम रूप देने से पहले इस पर हाऊस ऑफ कॉमन्स मे मतदान कराया जाएगा ।

सुप्रीम कोर्ट ने फैसला सुनाया था कि लिस्बन संधि के अनुच्छेद ५० को लागू किए जाने के पहले सांसदो और पीअर्स का समर्थन प्राप्त करना आवश्यक होगा जिसके बाद इस विधेयक को पेश किया गया था ।

**समारोप :**

ब्रिटेन का ईयू से निकलना यह ब्रिटेन के लिए वर्तमान मे कठीन परिस्थिति है जिसका सामना ब्रिटेन को करना होगा किन्तु शायद इसके दीर्घकालीन परिणाम ब्रिटेन के पक्ष मे हो । विश्व के लिए भी लाभदायक हो । सम्पूर्ण विश्व एक गांव होने के कारण ब्रिटेन के फैसले का अन्य देशों पर भी परिणाम होगा ।

**संदर्भ :**


1. BREXIT : View and Suggestions from India July 2016, FICCI.
2. The consequences of Brexit for UK trade and living standards - Centre for Economic Performance - The London School of Economic and Political Science.
3. 3 Reasons Brits Voted for Brexit - John Mauldin - Forbes.com
4. newsweek.com
5. amp.timeine.net
6. Khabar.ndtv.com-Feb.10/2017


◆◆◆

# ब्रेग्झिट : कारणे व परिणाम

– महादेव आसाराम रिठे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
राजे छत्रपती कला महाविद्यालय, बुलडाणा.

**प्रस्तावना :**

ब्रिटेनचे युरोपीय संघातून बाहेर पडण्याच्या प्रक्रियेला 'ब्रेग्झिट' असे नाव देण्यात आले आहे. ब्रिटनच्या स्पेलिंगमधील 'बी' आणि 'आर' ही अक्षरे 'एग्झिट' यांना जोडून 'ब्रेग्झिट' हा शब्द तयार केला आहे.

२३ जून २०१६ रोजी ब्रिटनमध्ये झालेल्या युरोपियन संघातून बाहेर पडण्याच्या सार्वमतात निर्गमनाच्या बाजूने ५२% मते मिळाल्याने ब्रिटीश नागरिकात मोठ्या प्रमाणात विभागणी झाली आहे. ब्रिटनचे युरोपियन युनियनमधून बाहेर पडण्यासाठी किमान दोन वर्ष तरी लागतील असे दिसून येत आहे. ब्रिटनच्या युरोपियन युनियनमधून बाहेर पडल्याने जागतिकीकरण प्रक्रियेला अडथळा निर्माण होऊ शकतो. तसेच ब्रिटनचे विघटन, युरोपियन संघाचे विघटन यासारखी संकटे निर्माण होऊ शकतात. भारतावरही त्याचे परिणाम दिसून येणार आहेत. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये उपरोक्त बाबींचा उहापोह करण्यात आला आहे.

**युरोपिय संघाची निर्मिती :**

दुसऱ्या महायुद्धातील भीषण संहारानंतर युरोपमध्ये पुन्हा युद्धाचा प्रसंग उद्भवू नये आणि अधिकाधिक देशांमध्ये दृढ व्यापारी संबंध असतील तर तशी वेळ येण्याची शक्यता कमी असेल या विचाराने युरोपीय संघाची स्थापना झाली होती. सुरूवातीला जर्मनी आणि फ्रान्सच्या पुढाकाराने १९५० मध्ये सहा देशांनी कोळसा आणि पोलादाचा वाटा एकत्रित केला. त्यानंतर सात वर्षांनी रोम येथे झालेल्या करारानुसार 'युरोपियन इकानॉमिक कम्युनिटींची' (EEC) स्थापना झाली. या संघटनेचे नाव पुढे युरोपियन युनियन असे बदलले आणि सध्या युरोपातील ब्रिटनसह २८ देश त्याचे सदस्य आहेत. सदस्य देशांची संयुक्त बाजारपेठ स्थापन करणे, वस्तू, सेवा आणि कामगारांची मुक्त वाहतुक करणे असे त्याचे उद्देश होते. ब्रिटन त्यामध्ये १९७३ साली सामील झाला. आता त्यात पर्यावरण आणि मानवी हक्कांचे संरक्षण, विभागीय असमतोल दूर करणे, शिक्षण व संशोधन या क्षेतातील सहकार्य याची भर पडली आहे. युरोपियन कमीशन, युरोपियन कौन्सील, युरोपीयन पार्लमेंट आणि कोर्ट ऑफ जस्टीस या चार उपसंस्थांच्या माध्यमातून युरोपियन युनियनचे काम चालते. त्याचे मुख्यालय ब्रुसेल्स येथे आहे.

**सदस्य :**

युरोपिय संघामध्ये पुढील २८ राष्ट्रे समाविष्ट आहेत.

१) संस्थापक सदस्य (६) :

बेल्जियम, फ्रान्स, इटली, लॅक्झमबर्ग, नेदरलॅण्ड, प. जर्मनी

२) इतर सदस्य व त्यांच्या सहभागाचे वर्ष :

१९७३ : डेन्मार्क, आर्यलंड आणि ब्रिटन

१९८१ : ग्रीस

१९८६ : स्पेन, पोर्तुगाल

१९९५ : ऑस्ट्रिया, फिनलँड, स्वीडन

२००४ : झेक प्रजासत्ताक, सायप्रस, इस्टोनिया, हंगेरी, लॅटविया, लिथुनिया, माल्टा, पोलंड, स्लोव्हाकिया, स्लोव्हेनिया

२००७ : बल्गेरिया, रोमानिया

२०१३ : क्रोएशिया

**ब्रेग्झिटची कारणे :**

'आत' आणि 'बाहेर' अशा दोन्ही मतांच्या समर्थनार्थ ब्रिटनमध्ये जोदार प्रचार आणि खर्च केला गेला. समुदायात राहण्याच्या बाजूने युक्तीवाद करतांना 'एकीचे बळ' हे सूत्र केंद्रस्थानी होते. युरोपियन संघामुळे ब्रिटनला काही तोटे सहन करावे लागत असले तरी बाहेर पडणे हा योग्य पर्याय नसल्याचे समर्थन केले जात होते. परंतु प्रबळ ठरलेल्या ब्रेग्झिटच्या मतामागे साधारणपणे पुढील गोष्टी असू शकतात असे म्हटले जाते.

**१) स्थानिय मजूरांचा प्रश्न :**

युरोपियन समुदायातील सदस्य देशांना परस्परांकडील वस्तू, भांडवल आणि कामकरी यांच्या हालचालीवरील बंधने रद्द करावी लागतात. त्यामुळे कमी प्रगत युरोपियन देशातील कामगार ब्रिटन, जर्मनी आणि फ्रान्ससारख्या प्रगत युरोपिय देशात स्थलांतर करतात. असे स्थलांतरीत मजूर कमी वेतनावर काम करण्यास तयार असतात. स्थलांतरीत कामगार अकुशल असतात आणि अनेकदा ते जी कामे करतात ते करण्यास ब्रिटीश लोक तयार नसतात, कारण त्यांना कमी मजुरी मान्य नसते. स्थलांतरीत लोकांना प्रवेश दिल्याने स्थानिक मजूरांच्या संधी कमी होतात व या अतिरिक्त मजुरांमुळे वेतनवाढीचा वेग कमी होतो अशी सामान्य समजूत बनते.

**२) उद्योगांवर जाचक निर्बंध :**

युरोपियन समुदायाचे ब्रिटनमधील उद्योगांवर जाचक निर्बंध आहेत. त्यामुळे देशाचा विकास कमी प्रमाणात होतो आहे.

**३) युरोंची वर्गणी आणि इंग्लंडचा वाटा :**

ब्रिटनला युरोपिय संघाकडे अब्जावधी युरोची वर्गणी द्यावी लागते, मात्र त्याचा परतावा तुलनेने कमी मिळतो. जसे २०१५ मध्ये ब्रिटनने युरोपियन संघाच्या अर्थसंकल्पात १७.८ अब्ज पौंडाचे योगदान दिले. थोडी सवलत मिळून प्रत्यक्षात हे शुल्क १२.९ अब्ज पौंडाचे होते अशी युरोपियन संघाकडे नोंद आहे. तुलनेने ब्रिटनला संघाकडून मिळालेले अनुदान मात्र ६ अब्ज पौंड इतके कमी होते, ही बाब अन्यायकारक असल्याचे मत काही तज्ञांचे होते.

**४) सांस्कृतिक व सामाजिक आक्रमणाची भिती :**

युरोपियन संघाच्या सदस्य देशातील नागरिकांना व्हिसाशिवाय स्थलांतर करता येत असल्याने रोजगार गमावण्याच्या हानीबरोबरच परकियांच्या सांस्कृतिक व सामाजिक आक्रमणाची भिती त्यांच्या मनात आहे.

**५) सीमा सुरक्षित नसल्याची भिती :**

इतर युरोपिय देशांमधून ब्रिटनमध्ये कामाच्या आणि अधिक चांगल्या जीवनाच्या शोधात नागरिक व्हिसाशिवाय प्रवेश करू शकतात. यावर ब्रिटनचे कोणतेही नियंत्रण नाही. आपल्या देशाच्या सीमा संरक्षित नसल्याची भावना ब्रिटीश नागरिकांना वाटते.

**६) प्रबल देशांच्या आवाहनाचा उलट परिणाम:**

जागतिकीकरणाच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील दिग्गजांनी युरोपियन संघात राहण्यासाठी केलेले आवाहन हा त्यांच्या स्वार्थी, मतलबाचा भाग असावा, ही भावना प्रबळ ठरली असावी. आपला इतरांनी वापर करून अन्याय करू नये या निकराच्या विचाराने बाहेर पडण्यास बहुमत मिळालेले असू शकते.

**बेग्झिटचे परिणाम :**

२३ जून २०१६ च्या सार्वमताचे परिणाम ब्रिटनपुरते मर्यादीत राहणार नसून वेगवेगळ्या देशांच्या अर्थव्यवस्थांवर त्यांचा परिणाम होणार असल्याचे मत अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

**१) युरोपियन संघातील इतर देशांवर प्रभाव :**

ग्रिस किंवा पोर्तूगालसारख्या देशांनी युरोचा वापर सुरू करतांना आर्थिक शिस्तीचे जे नियम मान्य केले होते, त्यांचे पालन या देशांनी न करण्यातून समस्या निर्माण झाल्या असल्याने या देशांच्या समस्या सोडविण्याची जबाबदारी फ्रान्स किंवा जर्मनी या देशांनी किती व का उचलायची? असा प्रश्न निर्माण करतांना, या देशांनी आता युरोप गटातून बाहेर पडावे असा दबाव युरोच्या बलवान सदस्य राष्ट्रांच्या सरकारांवरही येतो. तरीदेखील युरोगट आजवर कायम राहिला. मात्र ब्रिटनच्या बहिर्गमनाचा परिणाम म्हणून इतर सदस्य देशही असाच मार्ग अवलंबू शकतात अशी भिती व्यक्त करण्यात येत आहे.

**२) युरोपियन संघाचे अस्तित्व धोक्यात :**

बेग्झिटमुळे युरोपियन संघाचे अस्तित्व धोक्यात येणार आहे. युरोपियन संघातील इतर देशांना बेग्झिटमुळे बाहेर पडण्याची प्रेरणा मिळणार आहे. युरोपिय संघात प्राधान्याने वापरल्या जाणाऱ्या इंग्रजी भाषेला फ्रेंच व जर्मनीसारख्या भाषांशी स्पर्धा करावी लागेल. तसेच समुहाच्या अस्तित्वावरच प्रश्न निर्माण होणार आहे.

**३) भारतीय कंपन्यांना नव्याने योजना तयार करावी लागेल :**

ब्रिटनमधील परकीय थेट गुंतवणूकीत भारत तिसऱ्या क्रमांकावर आहे. सुमारे ८०० भारतीय कंपन्या ब्रिटनमध्ये आपला व्यवसाय करीत आहेत. त्यातून लाखो कामगारांना रोजगार मिळाला आहे. बेग्झिटनंतर या कंपन्यांना नव्याने योजना तयार करून दिशा ठरवावी लागणार आहे.

**४) माहिती तंत्रज्ञान कंपन्यांना धोरणे बदलावी लागतील :**

भारतातील माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांना विचारपूर्वक योजना आखाव्या लागतील. भारत आणि ब्रिटन यांच्यातील व्यापर रचनेत अनेक आमुलाग्र बदल होऊ शकतील.

**५) जागतिकीकरण प्रक्रियेत अडथळा :**

बेग्झिटमुळे प्रबळ राष्ट्रवादाची भूमिका निर्माण होऊन जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतात. बेग्झिटचा निकाल पुढे आल्यानंतर ज्या प्रकारचे राजकारण इंग्लंडमध्ये पुढे आले, अशाच प्रकारचे वातावरण इतर देशांमध्ये सुद्धा निर्माण होऊन राष्ट्रवादाकडे जग वळेल अशी

मते मते तज्ञांनी व्यक्त केली आहेत.

**६) इंग्लंडमध्ये तात्काळ रोजगार निर्मिती होणार नाही :**

बेग्झिटच्या निर्णयामुळे पुढे काय याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. युरो समुदायातून बाहेर पडण्याची प्रक्रिया नविन पंतप्रधान सत्तेवर आल्यावर काही महिन्यांनी सुरू होईल. पण नंतर ब्रिटनचे युरोपियन संघाबरोबर असणारे आर्थिक संबंध कसे राहतील हे निश्चित करण्यास व त्याबाबत वाटाघाटी करण्यास काही वर्षे लागतील याचा परिणाम अनिश्चितता वाढण्यात होईल आणि त्यामुळे खाजगी गुंतवणूकीचे कार्यक्रम लांबणीवर पडल्याने रोजगार निर्मितीला चालना मिळणे शक्य होणार नाही.

**७) ब्रिटनचा विकासदर कमी होईल :**

ब्रेग्झिटच्या निर्णयामुळे देशासमोर आर्थिक धोरणाबाबत अनिश्चितता निर्माण होऊन खाजगी गुंतवणूकीचे कार्यक्रम लांबणीवर पडल्याने रोजगार निर्मितीला अडथळा निर्माण होईल. त्याचा परिणाम उत्पादनावर होऊन ब्रिटनचा विकासदर कमी होईल. ब्रिटनचे राष्ट्रीय उत्पन्न १.५ ते ४.५ टक्क्यांनी कमी होईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

**८) ब्रिटनवरील इतर आर्थिक परिणाम :**

ब्रिटनच्या औद्योगिक उत्पादनावर, रोजगारावर प्रतिकुल परिणाम होणार आहे. आयात-निर्यात व्यापार प्रतिकुल होईल. आंतरराष्ट्रीय पत व मूल्यांकन घसरेल. युरोपिय संघातील इतर २७ देशांसोबत स्वतंत्र व्यापारी धोरण जोपासवे लागतील. ही अनिश्चिततेची परिस्थिती किती काळ राहणार हे सांगता येणार नाही. या काळात ब्रिटनला अर्थव्यवस्थेची पुर्नमांडणी करून स्वत:च्या विकासाचा नवा मार्ग शोधून स्थैर्य साधण्याचे अवघड कार्य करावे लागणार आहे.

**९) ब्रिटनचे ऐक्य धोक्यात येऊ शकते :**

युरोपियन संघाबाहेर राहून ब्रिटनच्या आर्थिक समस्या सुटतील का? हा प्रश्न बाजूला ठेवला तरी उत्तर आर्यलंड आणि स्कॉटलंड या भागात Remain चा स्पष्ट कौल असल्याने दिड दोन वर्षापूर्वी सार्वमताद्वारे ब्रिटनमध्ये कायम राहण्याच्या बाजुने कौल देण्याचा स्कॉटिश जनतने पुन्हा एकदा सार्वमताची मागणी करीत युरोपीय संघातून बाहेर पडू पाहण्याचा ब्रिटनमध्ये राहण्याऐवजी ब्रिटनपासून फारकत घेत युरोपिय संघात राहण्याचे ठरविले तर ब्रिटनचे ऐक्य धोक्यात येईल. उत्तर आर्यलंडमध्येही अशी मागणी झाली तर ब्रिटनच्या समस्या अधिक गंभीर बनतील यात शंका नाही.

**१०) शेअर बाजारावर परिणाम :**

२४ जून २०१६ रोजी 'बेग्झिट'चा निर्णय जाहीर झाल्यानंतर भारतासह जगभरातील शेअर बाजार कोसळले. इतर देशांच्या चलनाच्या तुलनेत ब्रिटीश पौंडाचे मूल्य घटले. कच्च्या तेलाच्या भावातही घसरण झाली. मात्र सोने-चांदीत तेजी झाली.

**११) पतमानांकनावर परिणाम :**

ब्रिटनला 'युरोपचे प्रवेशद्वार' समजले जात होते. मात्र ब्रेग्झिटमुळे तेथील थेट परकिय गुंतवणूक (FDI) कमी होऊ शकते. 'मूडीज', 'स्टँडर्ट ॲण्ड पुअर्स' या पतमानांकन संस्थांनी ब्रेग्झिट निर्णयानंतर ब्रिटनचे पतमानांकन घटवले आहे. त्यामुळे ब्रिटनमधील गुंतवणूकीत घट होऊ शकते. तसेच आंतरराष्ट्रीय बाजारातून कर्जे उचलण्यासाठी ब्रिटनला जास्त पैसे मोजावे लागतील.

**निष्कर्ष :**

१. ब्रेग्झिटमुळे जागतिकीकरणाला अडथळा निर्माण होऊन राष्ट्रवादाची संकल्पना जोर धरू लागेल. संरक्षणवाद प्रबळ ठरेल.

२. भारतीय कंपन्यांना ब्रिटनबाबत नव्याने योजना तयार करून उत्पादनाबाबत उपाययोजना तयार कराव्या लागतील.

३. युरोपियन युनियनमधील इतर २७ देशांमध्ये विघटन होईल.

४. भारताला आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत ब्रिटन व युरोपियन संघातील इतर सदस्य राष्ट्रांबाबत नविन व्यापारनिती तयार करावी लागेल.

५. ब्रिटनला देशाच्या विकासासाठी नविन औद्योगिक निती, रोजगार धोरण, आयात निर्यात धोरणे आखावी लागतील.

**समारोप :**

ब्रेग्झिटमुळे निश्चितपणे जागतिक अर्थकारणांमध्ये अनेक बदल होणार आहेत. प्रबळ राष्ट्रवादाची भूमिका समोर येणार आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला राष्ट्रवादाच्या जोरकस पाठींब्यामुळे अनेक अडथळे निर्माण होतील अशी तज्ञांची मते खरी वाटत आहेत. भारतावरही त्याचे परिणाम होतील, मात्र त्याची फार जास्त झळ भारतीय उद्योगाला पोहोचणार नाही, असा आशावादही व्यक्त करण्यात येत आहे.

**संदर्भ :**


१. प्रा. डॉ. रारावीकर यशवंत, प्रा. गोडबोले वि.ज., प्रा.जॉन्सन बोर्जेस (२००८), डायमंड अर्थशास्त्रकोश, डायमंड पब्लिकेशन, पुणे ४११०३०.

२. मा. परिवर्तनाचा वाटसरू (१६ ते ३१ जुलै २०१६); द युनिक ॲकॅडमी, शिवाजी नगर, पुणे-४११००५

३. मा. यशाची परिक्रमा (ऑगस्ट २०१६), पृथ्वी पब्लिकेशन, पुणे.

४. www.loksatta.com (२५ जुन २०१६), दृष्टीक्षेपात ब्रेग्झिट

५. marathi.yourstory.com (२८ जुन २०१६), ब्रेग्झिट : वैश्विक धर्मवाद आणि स्थलांतराच्या वादातून....


◆◆◆

# युरोपियन महासंघातून इंग्लंड बाहेर जाण्याची कारणे व परिणाम

**मोरेश्वर के. नन्नावरे**
सहा. प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, आकोट

**एस. एन. ताडे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री. नरसिंग कला व वाणिज्य
महाविद्यालय, आकोट

**प्रस्तावना :**

अमेरिकेतील १९२९ मधील मंदीमुळे साऱ्या जगाला हादरा बसला. त्यानंतर जगात आमूलाग्र बदल झाले आणि जीवनाचे अर्थही बदलले. अनेक नवीन कल्पना अंमलात आल्या आणि अनेक संज्ञा रूढ झाल्या. ब्रेक्झिट ही त्यानंतरची दुसऱ्या क्रमांकाची परिणामकारक घटना म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण ही घटना आर्थिकच नव्हे तर जगाच्या दृष्टीनेही अत्यंत दूरगामी बदल घडवणारी आहे. एकविसाव्या शतकातील सर्वाधिक महत्त्वाची अशी ही घटना. जागतिक अर्थकारण बदलण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. युरोपीय संघाची कार्यपध्दती, ब्रिटनचे सार्वभौमत्व, आशिया - आफ्रिका - आखाती देशांमधून युरोपमध्ये स्थलांतर, बेरोजगारी आणि आर्थिक संकट, इस्लामिक दहशतवादाची शक्यता इ. कारणांचा समावेश आहे. अल कायदा, तालिबान आणि आयसिस यांसारख्या दहशतवादी संघटना युरोपमध्ये विस्तारत आहेत. यामुळे ब्रिटनबरोबरच इतर युरोपीय देशांमध्ये असंतोष पसरला आहे. हा असंतोष ब्रिटिश राष्ट्रवादाच्या चौकटीत व्यक्त केला जात आहे, असे मानले जाते. यातून विभागीय पातळीवरील महासंघाचा विचार मागे पडत आहे. ब्रेक्झिटमुळे विसाव्या शतकातील आर्थिक एकीकरणाच्या सिध्दांताला धक्का बसल्याचे मानले जाते.

युरोपियन संघाच्या राजकीय चौकटीतून निर्माण झालेल्या व्यापारी निर्बंधामुळे ब्रिटनला भारत व चीनसारख्या देशांशी स्वतंत्र व्यापारी संबंध प्रस्थापित करता येत नाहीत, अशी भावना ब्रिटनमध्ये पसरल्याने ब्रिटन - युरोपीय संघ संबंधावर काही प्रमाणात परिणाम झाल्याचे दिसून येते. युरोपीय संघाचा सदस्य या नात्याने ब्रिटन जे शुल्क युरोपीय संघात जमा करते, त्या प्रमाणात ब्रिटनला लाभ होत नसल्याची भावनाही निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर ब्रेक्झिटचा ब्रिटन, युरोपीय संघ, जागतिक व भारतावर होणारा परिणाम याविषयी प्रस्तुत शोध निबंधामध्ये ऊहापोह करण्याचा प्रयत्न आहे. सर्वप्रथम ब्रिटनमध्ये घेण्यात आलेले जनमत, युरोपीय संघाची पार्श्वभूमी, ब्रिटनच्या विरूद्धार्थ व समर्थनार्थ मुद्दे व संघातून बाहेर पडल्यावर त्याचे अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम याचा अभ्यास करणे उचित ठरेल.

**ब्रिटनमधील जनमत चाचणी (Referendum):**

१९७५ साली झालेल्या जनमत चाचणीत ब्रिटनने युरोपियन इकॉनोमिक कम्युनिटीत राहण्याच्या बाजूनं कौल दिला होता. पण त्यानंतरच्या काळात युरापियन राष्ट्रसंघटनेचं रूप बरंच बदललं आहे. हे बदल आजच्या ब्रिटनला मान्य आहेत का, हे पडताळून पाहण्यासाठी ही जनमत चाचणी.

जगभरातून याबाबत उलट सूलट चर्चेला सुरूवात झाली. ब्रिटनने युरोपीयन महासंघातून बाहेर पडू नये अशी जर्मनी, फ्रान्स सारख्या अनेक युरोपीयन समुहातील सदस्य देशांची इच्छा होती. युरोपीयन संघातुन बाहेर पडण्यासाठी २३ जून २०१६ ला ब्रिटनमध्ये सार्वमत घेण्यात आले आणि त्यात ७२ टक्के मतदान झाले. त्यापैकी ५२ टक्के लोकांनी ब्रिटनने युरोपियन महासंघातून बाहेर पडावे असा कौल दिला तर ४८ टक्के जनतेने युरोपियन समुहातून ब्रिटनने बाहेर पडू नये अशी इच्छा व्यक्त करत मतदान केले. जर्मनमधील वृत्तपत्र 'देयर श्पीगेल' या वृत्तपत्रात 'ब्रिटनने बाहेर पडू नये' या आशयाच्या मथळयाने मोठी बातमी प्रसिद्ध केली गेली होती. ब्रिटीश पंतप्रधान डेव्हीड कॅमरून यांनी गेल्या निवडणूकीत आपण युरोपियन युनियनमध्ये कायम राहण्यासाठी प्रयत्न करू आणि कॅम्पेनिंग चालू ठेवू असे आश्वासन दिले होते. पण यात ते यशस्वी होऊ शकले नाहीत याची जबाबदारी घेत त्यांनी पद सोडण्याची घोषणा केली.

**ब्रेक्झिटचा अर्थ :**

ब्रिटनने युरोपीय संघातून (युरोपियन युनियनमधून) बाहेर पडण्याच्या प्रक्रियेला 'ब्रेग्झिट' असे नाव देण्यात आले आहे. ब्रिटनच्या स्पेलिंगमधील 'बी' आणि 'आर' ही अक्षरे आणि 'एग्झिट' (बाहेर पडणे) यांना जोडून 'ब्रेग्झिट' शब्द तयार केला आहे. अशाच प्रकारे पूर्वी युरोपीय संघातून ग्रीस हा देश बाहेर पडण्याची शक्यता होती तेव्हा 'ग्रेग्झिट' असा शब्द वापरण्यात आला होता. हा निकाल जगाच्या राजकारण आणि अर्थकारणावर दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो. याआधी १९८५ साली मच्छीमारीच्या अधिकारावरून डेनमार्क आणि ग्रीनलँड यांचा युरोपियन महासंघाशी वाद झाला होता आणि हे देश युरोपियन महासंघातून बाहेर पडले होते. २०१४ साली स्कॉटलंडने ब्रिटनमध्ये रहावे की नाही, यासाठी जनमत चाचणी झाली होती. यामुळे युरोपियन महसंघाला काही फरक पडला नव्हता. पण ब्रिटन बाहेर पडल्यामुळे मात्र युरोपियन महासंघाच्या आर्थिक व्यवस्थेला मोठा फरक पडणार आहे. आता युरोपमधील अन्य देशांतही एक्झिटची चर्चा सुरू झाली आहे. किमान फ्रान्स, ऑस्ट्रिया आणि नेदरलँड्स या देशांमधील जनतेला सार्वमत घेऊन महासंघातून बाहेर पडावे, असे वाटते. असे वृत्त युरोपमधील प्रसारमाध्यमां मध्ये दिसत आहे. 'ब्रेक्झिट' या सार्वमतासाठी प्रचलित झालेल्या शब्दाने ब्रिटनचे आर्थिक, राजकीय, सामाजिक वातावरण पुरते ढवळून काढले आहे.

**युरोपीय संघाची पार्श्वभूमी :**

दुसऱ्या महायुद्धातील भीषण संहारानंतर युरोपमध्ये पुन्हा युद्धाचा प्रसंग उदभवू नये आणि अधिकाधिक देशांमध्ये दृढ व्यापारी संबंध असतील तर तशी वेळ येण्याची शक्यता कमी असेल, या विचाराने युरोपीय संघाची स्थापना झाली होती. सुरूवातीला जर्मनी आणि फ्रान्सच्या पुढाकाराने १९५० मध्ये बेल्जियम, फ्रान्स, पश्चिम जर्मनी, इटली, लक्झेमबर्ग, नेदरलँड या सहा देशांनी कोळसा आणि पोलादाचा वाटा एकत्रित केला. त्यानंतर १९५७ वर्षांनी रोम (ट्रीट ऑफ रोम) करारानुसार 'युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटी'ची (EEC) स्थापना झाली. ब्रिटन त्यामध्ये १९७३ साली सामील झाला. सदस्य देशांची संयुक्त बाजारपेठ स्थापन करणे, वस्तू सेवा आणि कामगारांची मुक्त वाहतूक करणे असे त्याचे उद्देश होते. आता त्यात विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण आणि मानवी हक्कांचे संरक्षण,

विभागीय असमतोल दूर करणे, शिक्षण व संशोधन या क्षेत्रातील सहकार्य याची भर पडली आहे. युरोपियन कमिशन, युरोपियन काऊन्सिल, युरोपियन पार्लमेंट आणि कोर्ट ऑफ जस्टिस या ४ उपसंस्थांच्या माध्यमातून युरोपियन युनियनचे काम चालते. त्याचे मुख्यालय ब्रेसल्स येथे आहे.

युरोपियन महासंघाने १९८६ मध्ये 'सिंगल युरोपियन अॅक्ट' हा कायदा अंमलात आला आणि पुढील सहा वर्षात या संघटनेच्या सदस्य राष्ट्रांत व्यापार खुला झाला आणि त्यांची 'एक बाजारपेठ' (कॉमन मार्केट) जन्माला आली. १९९३ मध्ये या संघटनेमध्ये उत्पादने, सेवा, जनता, पैसे या चार गोष्टींची खुली आवक - जावक सुरू करण्यात आली. १ नोव्हेंबर १९९३ रोजी 'मॅश्ट्रीच करार' (Mastricht Treaty) झाला. या करारानूसार तीन ऐतिहासिक बदलांवर सहमती झाली. पहिला 'युरोपियन कम्यूनिटी'चे नामांतर 'युरोपियन यूनियन कम्यूनिटी' असे करण्यात आले. दुसरा EU सदस्यांची संख्या वाढवण्याचे ठरले. तिसरा आणि महत्त्वपुर्ण बदल म्हणजे युरोपियन सेंट्रल बँक व युरो झोन (चलनव्यवस्था) निर्माण करण्यात आला, ज्यात १२ सदस्य देशांनी २००२ पर्यंत युरोला चलन म्हणून स्विकारण्याची सीमा निश्चित करण्यात आली. पण ब्रिटन सदस्य असुनही चलन स्विकारण्यास तयार नव्हता त्यामुळे ब्रिटन युरो झोनमधून बाहेर होता. हा प्रकार म्हणजे युरो चलनासाठी अडथळयाची शर्यत होती. २८ पैकी १९ देशांनी याचा कॉमन करन्सी म्हणून स्विकार केला होता. ब्रिटन आपले स्टर्लिंग पौंड हे चलन सोडण्यास तयार नव्हते. २००४ साली युरोपियन महासंघाचे १० सदस्य बनले होते आणि २०१३ साली क्रोएशिया युरोपियन महासंघाचा २८ वा सदस्य झाला होता. २८ देश आणि ५० कोटी लोकसंख्येच्या ईयुची अर्थव्यवस्था १६ खर्व डॉलर्सची असून तिचा जागतिक दरडोई उत्पन्नातला वाटा १/४ इतका आहे. 'शेन्झेन करारा'नंतर ईयुमधील नागरीक सदस्य देशात व्हिसाशिवाय मुक्तपणे प्रवास, व्यापार, नोकरी करू शकतात आणि युरो हे एकच चलन वापरले जाते.

**युरोपीयन संघातून बाहेर पडण्याच्या बाजूने समर्थन :**

**※ स्थलांतरितांचा प्रश्न :**

बेफाट स्थलांतर हेच ब्रिटनच्या बाहेर पडण्याच्या निर्णयामागील मुख्य कारण आहे. परदेशातून येऊन ब्रिटनमध्ये नोकरीधंद्यासाठी गेल्या वर्षी आलेल्या ३,३६,००० स्थलांतरितांपैकी निम्म्याहून जास्त (१,१८,०००) लोक युरोपीय महासंघातून आले होते. ब्रिटिश नागरिकांच्या रोजगाराच्या संधी हिरावल्या जातात. इतकेच नव्हे तर घरे, आरोग्य सेवा, शिक्षण संस्थेत देखील ते आपला वाटा मागतात. त्यात भर पडली आहे.

**※ निर्वासितांचा प्रश्न :**

सध्या ब्रिटनमध्ये १.२ दशलक्ष नागरिक युरोपीय संघाच्या सदस्य देशांत राहतात. तर अन्य सदस्य देशांचे ३ दशलक्ष नागरिक ब्रिटनमध्ये राहतात. युरोपीय संघाच्या नियमांमुळे सदस्य देशांच्या नागरिकांना सामूहिक पारपत्रावर मुक्तपणे फिरता येत होते. आफ्रिका व मध्यपूर्वेतून युरोपात बरेच निर्वासित येत आहेत. प्रत्येक सभासद राष्ट्राने किती निर्वासितांना आसरा द्यायचा याचा कोटा महासंघामार्फत वाटला जातो. गत व चालू वर्षात महासंघ जवळपास १५ लाख निर्वासितांना आसरा देणार आहे. याच्या प्रतिक्रिया ब्रिटनसकट महासंघातील सर्वच राष्ट्रांमध्ये उमटत आहेत. 'आपल्या सीमा आपल्याच ताब्यात' ही घोषणा

अनेक देशांतील आंदोलकांमध्ये लोकप्रिय झाली आहे.

**※ अर्थसंकल्पातील वाटा :**

महासंघाचा वार्षिक खर्च सभासद राष्ट्रेच उचलतात; २०१५ मध्ये ब्रिटनचा वाटा १३ बिलियन पौंडचा होता. महासंघाकडून त्यांना मदत देखील मिळते. २०१३ मध्ये ब्रिटनला ७ बिलियन पौंड मिळाले. महासंघात राहणे म्हणजे ब्रिटनसाठी आतबट्ट्याचा व्यवहार आहे. एकूण या व्यवहारात मोठा तोटा होत आहे. ब्रिटनला मिळणारा परतावा अन्य देशांच्या तुलनेत कमी होता.

**※ महासंघाची नोकरशाही :**

महासंघाची नोकरशाही अलीकडे हाताबाहेर गेली आहे. फक्त गेल्या पाच वर्षांत महासंघाच्या नोकरशहांनी सभासद राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांना निर्देशित करणारे ३५०० छोटे – मोठे कायदे, नियम, परिपत्रके प्रसृत केली. कायदे – नियमांचा अतिरेक झाला की त्यांचे पालन करण्याचा खर्च (कम्प्लायन्स कॉस्ट) अवाच्या सवा वाढतो. सर्वच उत्पादकांचा हा खर्च वाढला आहे.

**※ मांडलिकत्वाची भावना :**

युरोपियन महासंघात राहिल्यास स्थलांतरित, निर्वासितांचा प्रश्न, व्यापार, सुरक्षा धोरण, दहशतवाद विरोधी लढा यावर महासंघाचाचे नियंत्रण राहील. इंग्लंडकडे कोणताही अधिकार नसेल अशी सर्वसामान्य नागरिकांची भावना आहे.

**※ बिनकामांचा खर्च :**

संघाचे सदस्य एकत्र खर्चासाठी काही निधी गोळा करतात आणि त्यांनाही संघातून विकासकामांसाठी काही निधी परत मिळतो. महासंघाच्या वार्षिक खर्चात २०१५ मध्ये ब्रिटनचा वाटा १२.५७ टक्के म्हणजे १३ अब्ज पौडांचा होता. युरोपीयन संघामुळे इंग्लंडच्या व्यापारावर अनेक बंधने आले आहेत. संघाला वर्षाला जेवढी रक्कम दिली जाते त्या तुलनेत फार कमी फायदा मिळतो. दर आठवडयाला ३५० दशलक्ष पौंड महासंघाला दिले जातात असा दावा केला जातो. त्यामुळे सुरक्षा व्यवस्था आणि एन.एच.एस. सारख्या आरोग्याच्या सेवा कोलमडल्याचा राग ब्रिट्रीश नागरिकांमध्ये आहे. त्यातूनच युरोपियन संघातून बाहेर पडण्याची मानसिकता बळावली आहे.

**※ राजकीय पातळीवर दुफळी :**

युरोपियन महासंघाच्या प्रश्नावर इंग्लंडच्या राजकीय पक्षांमध्ये देखील दोन गट (सत्ताधारी हुजूर पक्ष व मजूर पक्ष) पडले आहे. १९७३ मध्ये ब्रिटन युरोपी महासंघाचा सदस्य झाल्यापासूनच 'ब्रेक्झिट' च्या बाजूने चळवळ सुरू झाली आहे. २०१२ मध्ये प्रचलित झालेला 'ब्रेक्झिट' हा शब्द आणि ही चळवळ काही नेत्यांपुरती एका 'कोपऱ्या'तील चळवळ होती, ती एकाएकी मोठी राजकीय चळवळ झाली आणि राजकीय मुख्य विचारप्रवाहात आली. याचा अर्थ ब्रिटनने चार दशकांपासून युरोपीय महासंघाचे सदस्यत्व घेतल्याबद्दलची ती नाराजी होती.

**※ महासंघाचे अधिपत्य :**

युरोपीय महासंघात सामील होऊ इच्छिणाऱ्या सभासद देशांना या महासंघाचे कायदे, बंधने, न्यायालये आणि ब्रुसेल्स येथील प्रचंड मोठी नोकरशाही या सर्वांचे अधिपत्य मानलेच पाहिजे. अशी अट आहे. या अटीमुळे अनेक ब्रिटिश नागरिकांना आपल्याला लगाम घातल्यासारखे वाटते.

**※ सरकारचे दुर्लक्ष :**

युरोपमधील घरांची अनुपलब्धता, गोऱ्या कर्मचारी वर्गाची खराब शैक्षणिक कामगिरी आणि

सार्वजनिक सेवांचा वित्तपुरवठा ही कारणे मूळ आहेत. त्यांच्याकडे कुणीच लक्ष देत नाही. सरकार या मूळ प्रश्नाकडे लक्ष देण्यात अपयशी का ठरली, याची कारणे शोधणे अवघड नाही.

**ब्रिटनने युरोपीय महासंघात राहावे यासाठीचे समर्थन :**

* ब्रिटन बाहेर पडल्याने येथील अर्थव्यवस्थेवर कसा दुष्परिणाम होईल आणि ब्रिटिश कुटुंबे कशी कायमची आता आहेत, त्यापेक्षा जास्त गरीब होतील यावर समर्थक भर देतील. मतदानाच्या पृथ:करणावरून तरूण मतदारांना ब्रिटनने युरोपीय महासंघात राहावे, असे वाटत होते, तर वृद्ध मतदारांना ब्रिटनने बाहेर पडावे असे वाटत होते, हे स्पष्ट दिसून येते.

* लंडन हे महत्त्वाचे जागतिक आर्थिक केंद्र आहे. हे प्रस्थापित करण्यासाठी महासंघाचे सदस्यत्व असणे महत्त्वाचे आहे. यावर बहुसंख्य अर्थतज्ज्ञांचे मतैक्य आहे. त्यातून ब्रिटनने बाहेर पडणे म्हणजे हा दर्जा व त्याबरोबर लठ्ठ पगार देणारे जॉब्स गमावून बसण्याचा धोका आहे.

* ब्रिटनमधील गुंतवणूक फक्त ब्रिटिश बाजारपेठेपुरती मर्यादित नसते. महासंघाच्या बाजारपेठेचे प्रवेशद्वार म्हणून त्याकडे पाहिजे जाते. हे सारे बंद झाल्याने या देशातील गुंतवणूक तितकीशी आकर्षक राहणे शक्य नाही. नवीन भांडवल येणे अवघड होईल; पण गुंतवलेले भांडवलही बाहेर जाण्याचा धोका आहे. हयुंदाई, फोर्ड, नेसले आपापले कारखाने बंद करण्याच्या मनस्थितीत आहेत, हेही गंभीर वास्तव आहे. त्याचा प्रतिकूल परिणाम रोजगार निर्मिती, शेअर मार्केट व ब्रिटिश पौडांवर होणे शक्य आहे.

* १८ ट्रिलियन डॉलरची जीडीपी आज जगात सर्वात मोठी मानली जाते. जागतिक अर्थव्यवस्थेवर महासंघाचा त्यामुळे दबदबा आहे. व्यापारात आपल्याला अनुकूल अटी पदरात पडून घेण्यासाठी त्याचा वापर महासंघ करून घेत असतो. बाहेर पडल्यानंतर महासंघाच्या या एकत्रित ताकदीतून मिळणाऱ्या फायद्यापासून ब्रिटन वंचित राहील. ब्रिटनची बाजारपेठ आक्रसण्याचाही मोठा धोका आहे.

* ब्रिटनची लोकसंख्या ६.५ कोटी तर महसंघाची ५० कोटी आहे. महासंघाचा सभासद म्हणून ब्रिटनला स्वत:च्या लोकसंख्येच्या आठपट मोठी बाजारपेठ आयती मिळते. महासंघाच्या ५० कोटी लोकसंख्येच्या या बाजारपेठेवर पाणी सोडणे व्यवहार्य ठरणार नाही. बाजारपेठा युरोपच्या बाहेरही आहेत; पण त्यासाठी प्रारंभापासून सुरूवात करावी लागेल व त्याचा खर्चही वाढेल.

**ब्रेक्झिटचे परिणाम :**

'ब्रेक्झिट' ही एक क्लिष्ट आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. युरोपियन महासंघातून बाहेर पडण्याच्या ब्रिटनमधील जनतेच्या निर्णयाचे दूरगामी परिणाम अर्थकारण, समाजकारण आणि राजकारणावर होणार आहे.

**युरोपीय महासंघावरील परिणाम :**

* १९९३ मध्ये जागतिक जीडीपीत महासंघाचा वाटा ३६ टक्के होता तो २०१५ मध्ये २२ टक्क्यांवर आला आहे. यात घसरण झाल्याचे दिसते.

* ब्रेक्झिटच्या निर्णयामुळे ब्रिटनमधील स्कॉटलंड आणि उत्तर आर्यलड या प्रांतांमध्ये ब्रिटनमधून बाहेर पडत युरोपीय संघाबरोबर राहण्याची मागणी पुढे येत आहे. असे झाल्यास ग्रेट ब्रिटनच्या ऐक्याबाबत गंभीर प्रश्नचिन्हे उपस्थित होतील. इंग्लंडपाठोपाठ फ्रान्स व नेदरलँड यांसारखे तुल्यबळ आणि ग्रीससारखे कमकुवत देश युरोपीय संघातून

बाहेर पडल्यास या संघटनेवर जर्मनीचे प्रभुत्व निर्माण होऊ शकते.

✲ ब्रेक्झिटच्या माध्यमातून युरोपियन संघाचा युरोपवरील प्रभाव कमी झाल्यास विशेषत: पूर्व युरोपवर रशियाचा प्रभाव वाढू शकतो.

✲ इंग्लंडमधील ब्रेक्झिट मागणीच्या पार्श्वभूमीवर फ्रान्समध्ये सुध्दा फ्रेक्झिटच्या मागणीने डोके वर काढले आहे. तसेच आणखी काही देश यातून बाहेर पडण्याच्या किंवा निर्वासिताना रोखण्याच्या मागणीवर अडले आहे. असे झाले तर हा जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा हादरा बसेल.

✲ ब्रिटनशिवाय युरोपियन युनियनचा आकार तर कमी होईलच, पण आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या या संघटनेचा जगावरील प्रभावही कमी होईल. नजीकच्या काळात त्यामुळं आर्थिक उलथापालथ पाहायला मिळू शकते.

**इंग्लंडवर होणारे परिणाम :**

✲ इंग्लंड बाहेर पडल्यावर त्याचे नेमके परिणाम काय होतील. याबद्दल कसलेही भाकीत करणे आज तरी कठीण आहे. पण त्याचे अर्थव्यवस्थेवरील दुष्परिणाम खूपच गंभीर होतील, असे ब्रिटिश अर्थ मंत्रालय, IMF व आर्थिक सहकार आणि विकास संघटना या आंतरराष्ट्रीय संघटना ठासून सांगत आहेत. या सार्वमतानंतर पौंड स्टर्लिंग घसरू ही लागला आहे.

✲ इंग्लंडमधील कंपन्यांना युरोपीय समुदायातील अन्य राष्ट्रांबरोबर केलेले करार नव्याने करावे लागतील. या प्रक्रियेत नव्या अटी, शर्ती, कर, पुनर्वसन, नागरिकत्व, स्थलांतर, गुंतवणूक या संदर्भातील सवलतीतील बदल, इ. घटकांमध्ये फेरबदल होणार आहेत. युरोपीय संघाच्या संयुक्त बाजारपेठेतून बाहेर पडल्यास ब्रिटनला प्रादेशिक ऐक्याचे लाभ यापुढे प्राप्त होणार नाहीत. परिणामी इतर युरोपीय देश ब्रिटनच्या मालावर आणि कंपन्यांवर विविध अटी, नियम, शर्ती लागू करतील. ब्रेक्झिटच्या निर्णयामुळे इतर जागतिक संघटनांच्या स्पर्धेमध्ये युरोपियन संघाचा प्रभाव कमी होईल, अशी शक्यता वर्तवती जात आहे.

✲ महासंघातून ब्रिटन बाहेर पडल्यास अल्प काळापुरतेही का होईना या देशाला त्याची आर्थिक झळ बसेल.महासंघाची खुली बाजारपेठ गमावली तर व्यापार व गुंतवणुकीवर (एफडीआय) त्याचा प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. स्थलांतरित नसतील तर उत्पादकता घटेल, आर्थिक विकासाचा वेग मंदावेल व नोकऱ्यांच्या संधीही कमी होतील. रिअल इस्टेटच्या (स्थावर मालमत्ता) किमती घसरणे, आयात महाग झाल्यामुळे चलनवाढ, डॉलरच्या तुलनेत ब्रिटीश पौंड आणि युरो या चलनांची घसरण होईल. परंतु याचा दोन वस्तूंना फायदा होतो आहे, त्या म्हणजे कोको आणि युके नैसर्गिक गॅस कारण या दोन वस्तू ब्रिटीश पौंडामध्ये विकल्या जातात, सेवा क्षेत्रावर होणारा परिणाम मोठा असेल. उद्योगधंदे ब्रिटनच्या बाहेर जाऊन रोजगार कमी होण्याची शक्यता आहे. परंतु काहींच्या मते, ब्रिटन ही युरोपची आर्थिक राजधानी असून, उद्योगधंदे बाहेर जाणार नाहीत.

✲ युरोपियन महासंघामधील उद्योगांनी तंत्रज्ञान व संशोधनावर आधारित अनेक उद्योगांना विशेष निधी पुरवला होता. २०१३ – १५ च्या दशकात हा निधी सुमारे सात लाख कोटी एवढा होता. आता हा निधी मिळवणे अवघड होणार आहे.

✲ गेल्या काही वर्षांमध्ये लंडनच्या पूर्व भागात मोठ्या प्रमाणावर स्टार्ट अप उद्योग स्थापन झाले होते. आता अशा उद्योगांना इतर युरोपिअन देशातून

भांडवल मिळवणे अवघड होईल. त्याचबरोबर आंतरयुरोपियन व्यापार जो आयात करमुक्त होता तो आता करपात्र होणार आहे.

* सध्या ब्रिटनमधून होणाऱ्या निर्यातीपैकी ४५ टक्के निर्यात युरोपीय महासंघाला जाते. या व्यापारात निर्यात होणाऱ्या कुठल्याही मालावर आज आयात कर भरावा लागत नाही. पण 'ब्रेक्झिट'नंतर मात्र प्रत्येक मालावरील उत्पादकाचा ब्रिटिश पत्ता ही एक धोंडच बनेल. सिटी बँक ग्रुप आणि जेपी मॉर्गन वेस कंपनी यांनी आताच ताकीद देऊन ठेवली आहे, की 'ब्रेक्झिट'नंतर त्यांनाही आपल्या आर्थिक व्यवहारातील काही भाग ब्रिटनबाहेर युरोप खंडात हलवावा लागेल.

**भारतावरील परिणाम :**

* भारतीय कंपन्यासाठी ब्रिटन हे युरोपचे प्रवेशद्वार बनले आहे. ब्रिटनमध्ये ८०० भारतीय कंपन्या असून यामध्ये १ लाख भारतीय कामगार काम करतात परंतु या कंपन्याचे ९५ टक्के कामगार ब्रिटीश असल्याने भारताला आर्थिक तोटा होणार नाही.

* स्टर्लिंग पौंड दर घसरल्याने भारतीय विद्यार्थ्यांना ब्रिटनमध्ये शिक्षण घेणे स्वस्त होणार आहे.

* आयटी क्षेत्रातील भारतीय कंपन्यांची ६ ते १८ टक्के कमाई ब्रिटनमधून होते. त्यामुळे आयटी उद्योगांच्या १०८ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीवर परिणाम होणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. या कंपन्यांना ब्रिटनमुळे युरोपमध्ये सवलत मिळत होती. ती आता बंद होणार असल्यामुळे त्याचा फटका या कंपन्यांना बसणार आहे. इंग्लंडमध्येच नव्हे तर भारतातही आता बेकारी वाढण्याची शक्यता जास्त आहे. कारण अनेक कंपन्यांना ब्रिटनमधील आपला कारभार गुंडाळावा लागणार आहे. नव्याने करार करावे लागतील.

* भारतस्थित ज्या कंपन्या व क्षेत्रांचा ब्रिटनमधील गुंतवणुकीशी संबंध आहे. त्यांच्यावर जो नकारात्मक परिणाम होईल. कमी जोखमीच्या सोन्यासारख्या ॲसेटसमध्ये अधिक गुंतवणूक होऊन देशातील इक्विटी बाजारपेठेतील गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर बाहेर जाण्याचा धोका आहे. एकूण बाजारपेठ अनिश्चिततेच्या भोवऱ्यात राहील. त्यांचा परिणाम देशात येणाऱ्या भांडवलाच्या ओघावर होईल. इतर युरोपीय देशांच्या तुलनेत भारताची इंग्लंडमध्ये मोठी गुंतवणूक आहे. एफडीआयबाबत आपण ब्रिटनचा तिसरा मोठा गुंतवणूकदार देश आहेत. त्यामुळे युरोपियन बाजारपेठेत प्रवेशाची संधी ही 'युके'मध्ये येणाऱ्या भारतीय कंपन्यांच्या दृष्टीने मोठी असते. ही संधी उरली नाही तर भावी गुंतवणुकीवर त्याचा परिणाम होणे अपरिहार्य आहे.

* ईयु (ब्रिटनसहित) हा भारताचा प्रमुख व्यापारी भागीदार आहे. यामध्ये ४८ बिलियन निर्यात व ६५ बिलियन डॉलर्सच्या आयातीचा समावेश आहे. फक्त ब्रिटनशी भारताचा व्यापार ९ बिलियन डॉलर्सचा आहे.

* ब्रिटन ही भारतीय आयटी कंपन्याची दुसऱ्या क्रमांकाची बाजारपेठ आहे. टाटा मोटर्स, टाटा स्टील, भारत फोर्ज, हिंदाल्को, टीसीएस, इम्फोसीस, टेक महिंद्रा, एचसीएल, माईडट्री या भारतीय कंपन्यांचा प्रमुख वाटा या व्यापारात आहे.

**जागतिक परिणाम :**

* जगभरातील शेअर बाजारांवरही या निर्णयाचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. सार्वमतातून घेण्यात आलेल्या या निर्णयाचा सर्वांत मोठा परिणाम युकेमध्ये काम करणाऱ्या कौशल्यपूर्ण नोकरदारांवर होणार आहे. यात अनेक युरोपियन महासंघाचे नागरिक आहेत. ज्यांना आजवर वेगळा

व्हिसा घ्यायला लागत नव्हता.

✼ युरोपिय महासंघाच्या अर्थव्यवस्थेपैकी १/६ भाग ब्रिटनचा आहे. 'ब्रेक्झिट' म्हणजे कॅलिफोर्निया फ्लोरिडा यांना अमेरिकन अर्थव्यवस्थेपासून तोडण्यासारखे आहे. या अस्थैर्याचा परिणाम अमेरिकन अर्थव्यवस्थेवरही होऊ शकतो.

✼ जगात सोने - चांदीचे भाव वाढायला लागले आहेत व ते अजून वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. अमेरिकेवर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा विचार केला, तर शेअर बाजार युरोपच्या तुलनेमध्ये वाढेल, अमेरिकी डॉलर मजबूत होईल आणि स्विस फ्रँक आणि येन हे चलन मजबूत होतील. तसेच आशियाई देशांचा विचार केला तर कंबोडिया, व्हिएतनाम आणि हाँगकाँग यांची ब्रिटनला निर्यात जास्त असल्यामुळे हे देश सोडले तर अन्य आशियाई देशांवर फारसा परिणाम व्हायला नको. इतर युरोपीय देशांवर परिणाम झाल्याने त्याचा आशियाई देशांच्या निर्यातीवर परिणाम होऊ शकतो. इतर देशांच्या मध्यवर्ती बँका त्यांच्या देशाची चलने स्थिर ठेवण्याच्या हेतूने, त्यांची पतधोरणे तात्पुरती 'जैसे थे' ठेवतील.

**इतर राष्ट्रावरील परिणाम :**

✼ आता ब्रिटनने काडीमोड घेतल्यामुळे अनेक युरोपियन महासंघातील देश अडचणीत येणार आहेत. कारण युरोपियन महासंघाकडून सदस्य देशांची सदस्य देशांना मदत मिळत असते. यात आयर्लंडमधील शेतकऱ्यांना महासंघाकडून मिळणारी सबसीडी बंद होईल. पोलंड, रूमानिया, लिथआनिया, ग्रीस देश अशा सबसीडींवरच जगत आहेत, त्यांचा बोजा आता उर्वरित देश कसा उचलणार आहे? ब्रिटनच्या युरोपियन युनियन सोडण्याचे दूरगामी परिणाम होणार आहेत. अनेक युरोपियन प्रोजेक्ट गोत्यात येणार आहेत.

**मूल्यांकन :**

युरोपियन युनियनमध्ये ब्रिटन भौगोलिक आणि आर्थिकदृष्टया तुलनेनं तगडा देश आहे. ब्रेक्झिट हा वित्तीय धोरणाचा आफ्टरशॉक आहे. ब्रेक्झिट हा प्रामुख्याने आर्थिक आघाडीवर जास्त चर्चिला गेल्याचे जाणवते. परंतु ब्रेक्झिट ही घटना आर्थिकपेक्षा राजकीय दृष्टीकोनातून पाहणे जास्त आवश्यक आहे. एकमेकांशी गळेकापू शस्त्रास्त्र स्पर्धा करणाऱ्या राष्ट्रांना एक पंक्तीत बसवण्याची किमया महासंघाने केली. ब्रेक्झिटमुळे महासंघाच्या परिणामकारक कार्यकाळावर व भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ब्रिटनचे साम्राज्यवादी पंतप्रधान सर विन्स्टन चर्चिल यांचे "If Britain must choose between Europe & the open sea, She must always choose the open sea" हे वाक्य पुरेसे आहे.

**संदर्भसूची :**


१) बुलेटीन ऑफ युनिक अकॅडेमी, पुणे ऑगस्ट, २०१६.
२) लोकमत : जून १७, २०१६, जून २२, २०१६
३) सकाळ : जून २१, २०१६, ऑगस्ट ५, २०१६
४) पुढारी : जून २२, २०१६
५) प्रहार : जून २४, २०१६ जून २९, २०१६
६) प्रभात : जुलै ०३, २०१६
७) लोकसत्ता: जून २५,२०१६, डिसेंबर ६, २०१६


◆◆◆

# ब्रिटनचे युरोपियन संघातून बहिर्गमन – एक धावता दृष्टीक्षेप

– अंजली कुलकर्णी
नागपूर.

**१. प्रस्तावना :**

२३ जुन, २०१६ रोजी युरोपियन महासंघातून (EU) बहिर्गमन करण्याचा ब्रिटनचा (UK) निर्णय, ज्यास ब्रेक्झिट (Brexit) असे संबोधिले जाते, हा जगाच्या इतिहासातील एक महत्वपूर्ण निर्णय समजला जाईल. एकीकडे भारत व चीनसारखे देश जागतिक स्तरावर अधिकाधिक व्यापक भूमिका घेण्याच्या पाविष्यात असतांना, ब्रिटनसारखे देश स्वत:च्या कोशाकडे जाण्यास आतूर झालेले दिसावेत, हे जगाच्या इतिहासाचे एक सिमीत करणारे आवर्तन म्हणावे लागेल. २८ देशांना समाविष्ट करणारा युरोपियन महासंघ हा आर्थिक व राजकीय हेतूने प्रेरित होऊन १९७३ मध्ये निर्माण झाला. युरोपियन युनियन करारानुसार त्यांचा मूळ उद्देश युरोपियन संघाच्या क्षेत्रात व्यापार, वित्तीय व्यवहार सुलभ करुन सदस्य देशांचे स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व शाबूत ठेवणे हा होता. युरोपियन युनियनची 'एकात्म' बाजारपेठ (single market) सदस्य देशांतील वस्तू, भांडवल, सेवा व लोकांना युरोपियन महासंघाच्या परिक्षेत्रात मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य देऊन त्यांच्या विकासास हातभार लावेल व त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारास प्रोत्साहन मिळेल असा त्यामागील हेतू होता.

युरोपियन आर्थिक क्षेत्रात (European Economic Area (EEA)) युरोपियन महासंघातील २८ सदस्य देशांचा समावेश असून ह्या व्यतिरिक्त आयलँड (Iceland), लीचेस्टेन (Liechten Stein) व नॉर्वे (Norway) चा देखील समावेश केलेला आहे. त्यांना युरोपियन महासंघाच्या 'एकल'(Single) बाजारपेठेचे लाभ मिळू शकतात. युरोपियन महासंघाची लोकसंख्या ५०७.४ मिलीयन (२०१४) असून त्यांचे सकल देशांतर्गत उत्पाद (GDP, Nominal) १४.३०३ ट्रीलीयन पौंड (२०१४) अनुमानित करण्यात आले आहे. (IMF च्या अंदाजानुसार). २३ जून २०१६ रोजी ब्रिटनच्या युरोपियन महासंघातून झालेल्या बहिर्गमनाचे पडसाद दूरवर पसरलेले दिसतात. विविध व्यासपीठांवर Brexit मुळे होणाऱ्या अल्पकालीन व दूरगामी संभाव्य परिणामांची चर्चा होत असलेली आढळते. ब्रिटनच्या अर्थव्यवस्थे – वरील म्हणजे त्यांच्या व्यापार, गुंतवण, परकीय भांडवल, रोजगार, सकल राष्ट्रीय उत्पन्न यावरील संभाव्य परिणामांबरोबरच इतर युरोपियन महासंघ सदस्यांबरोबर वा घटक देशांबरोबर तसेच भारताबरोबर असलेले व्यापार, व्यवहार, गुंतवण, रोजगार, स्थलांतरण यावर होणाऱ्या परिणामांचा देखील बराच ऊहपोह झालेला दिसून येतो. प्रस्तुत लेखात ह्यावर संक्षिप्त रुपाने दृष्टिक्षेप टाकण्याचा प्रयत्न केला आहे. प्रथमत: युरोपियन महासंघ व

ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेवरील संभाव्य परिणामांची चर्चा केली असून नंतरच्या परिच्छेदात भारताच्या व्यापार व्यवहारावरील परिणामांचा विचार करण्यात आला आहे.

'एकात्म बाजारपेठेतील सहभागातून निर्माण होणाऱ्या आर्थिक लाभांच्या' आधारावर ब्रिटनच्या युरोपियन महासंघ सदस्यत्वाचे समर्थन केले जाते. १ जानेवारी १९७३ रोजी ब्रिटनने युरोपियन महासंघाचे सदस्यत्व स्वीकारले. परंतु युरोपियन महासंघ नोकरशाहीचा वाढत चाललेला खर्च, युरोपियन महासंघातील सदस्य देशांच्या स्थलांतरणामुळे निर्माण झालेले प्रश्न व इतर काही आर्थिक समस्यांनी धारण कलेले उग्र स्वरुप यामुळे ब्रिटनला युरोपियन महासंघातून बर्हिगमनाचा निर्णय घ्यावा लागला असे 'ब्रेक्झिट समर्थक' म्हणतात. ब्रिटनचे तत्कालीन पंतप्रधान डेव्हीड कॅमेरून हयांनी २०१३ त त्यांची 'Renegotiation and Referendum Strategy' जाहीर केल्यानंतर जवळजवळ ३ वर्षांनी म्हणजे २३ जून २०१६ ला UK ने बहिर्गमनाचा निर्णय घेतला. त्यासुमारास विविध संशोधन संस्थांनी, ब्रिटनच्या बहिर्गमनाचा ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेवरील संभाव्य परीणामांचे विश्लेषणात्मक लेख व अहवाल प्रकाशित केले. त्यात मार्च २०१६ च्या सुमारास थोडया कालावधिच्या अंतराने प्रकाशित लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या Centre for Economic Performance, Oxford Economics व PWC या तीन अभ्यासपूर्ण अहवालांचा समावेश करावा लागेल.

**२. परामर्ष अहवालांचा :**

London School of Economics च्या संशोधन अहवालानुसार युरोपियन महासंघाची गैरसदस्य देशांवर प्रशुल्केतर व्यापार विषयक बंधने (non tariff barriers) ब्रिटनला अधिक जाचक ठरु शकतील. प्रशुल्क रुपाने युरोपियन महासंघाने ब्रिटनच्या निर्यातीवर लावलेली बंधने जाचक असल्यामुळे ब्रिटनने युरोपियन महासंघातून बहिर्गमनाचा निर्णय घेतला असे ब्रेक्झिटचे समर्थक म्हणतात. परंतु युरोपियन महासंघाच्या एकल बाजारपेठेच्या रुपाने निर्यातदारांना मिळणारे अदृ:श्य संरक्षण अधिक लाभप्रद ठरु शकते असे ब्रिटनने युरोपियन महासंघामध्ये रहावेचे समर्थक म्हणतात.

Oxford अर्थशास्त्रज्ञ तसेच PWC नुसार ब्रिटनने आपल्या व्यापार व्यवहारात व्यापार भागीदाराकडून अन्योन्य प्रशुल्क कमी करण्यासंबंधी कोणतीही मागणी न करता एकपक्षीय मुक्त व्यापाराचे स्वीकालेले धोरण ब्रिटनला फारसे लाभदायक राहणार नाही. तसेच इतर देशांशी केलेल्या मुक्त व्यापार करारांचा देखील उत्पादन वाढीच्या दृष्टीने फारसा फायदा होणार नाही.

Oxford अर्थशास्त्रज्ञांच्या अभ्यासानुसार ब्रेक्झिटमुळे ब्रिटनवरील व्यापारविषयक बंधने जरी संपुष्टात आली तरी त्याचा उत्पादनाची मात्रा वाढण्याच्या दृष्टीने फारसा अनुकुल परिणाम होणार नाही. GDP केवळ ०.१३ प्रतिशतने वाढेल PWC च्या अनुमानानुसार GDP मध्ये ०.३ प्रतिशतने वाढ होईल. या संशोधन संस्थांनी ब्रिटन व युरोपियन महासंघाच्या वर्तमान परिस्थितीवर काही गृहितकांच्या आधारे दोन पर्यायी प्रारुपे सादर करुन त्यात सर्वात लाभदायक व सर्वात हानिकारक अशा संभाव्य परिणामांचे वर्णन केले आहे. त्यांनी ब्रिटनकडे युरोपियन महासंघाकडून येणाऱ्या स्थलांतरणावरील परिणामांचे वर्णन करतांना स्थलांतरितांचा ओघ कमी झाल्याने ब्रिटनच्या एकूण स्थूल राष्ट्रीय

उत्पादातील (GDP) घट अधिक राहून दरडोई उत्पन्नाची घट त्यांच्या तुलनेत कमी राहील असे प्रतिपादन केले आहे. हा परिणाम २०३०पर्यंत दिसून येईल. परंतु 'मुक्त व्यापार' व अनिर्बंधित स्थलांतरण पूर्वीप्रमाणे चालू राहील्यास ब्रिटनच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादातील ०.२% वाढीचे अनुमान केले आले.

'Brexit in Seven Charts, 'The Economic Impact' ह्या क्रिस गिल्सच्या लेखात त्यांनी ब्रिटनच्या युरोपियन महासंघातील सदस्यत्वाबद्दल काही मुद्यांचा परामर्श घेतला आहे. त्यात त्यांनी ब्रेक्झिटपूर्वी व ब्रेक्झिटनंतरच्या ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेसंबधी काही विधाने केली आहेत. त्याचा थोडक्यात परामर्ष घेणे उचित होईल.

युरोपियन महासंघाचे सदस्यत्व स्वीकारण्यापूर्वी G7 देशातील ब्रिटनचा विकासाचा दर मंद होता. परंतु युरोपियन महासंघ सदस्यत्व स्वीकारल्यानंतर मात्र GDP वाढीचा दर जलद झाला. क्रमवारीतेनुसार वार्षिक सरासरीGDP वाढीचा दर युरोपियन महासंघाच्या सदस्यत्वापुर्वी निम्नस्तरावर म्हणजे जपान, जर्मनी, इटली, फ्रान्स, कॅनडा, अमेरिका व ब्रिटन असा होता. म्हणजे ब्रिटनचा क्रमांक सर्वात खालच्या स्तरावर होता. परंतु सदस्यत्व स्वीकारल्यानंतर GDP चा वार्षिक सरासरी दर जलद गतीने वाढून G7 देशांच्या विकास वृद्धीच्या क्रमवारीतेत ब्रिटनचा पहिला क्रमांक आला त्यांच्या खालोखाल जर्मनी, जपान, अमेरिका, कॅनडा, फ्रांस व इटलीचा क्रमांक लागतो. पूर्वी ब्रिटनला 'युरोपचा आजारी मानव'(Sick man of Europe) असे संबोधित केले जात होते. जी ७ देशांमध्ये ब्रिटनचे सर्वात खालच्या क्रमांकावरून सर्वात वरच्या क्रमांकावर जाणे हा युरोपियन संघाच्या सदस्यत्वाचा परिणाम आहे असे ब्रेक्झिटचे विरोधक वा ब्रिटनने युरोपियन युनियनमध्ये रहावे या बाजूच्या समर्थकांचे म्हणणे आहे. परंतु 'ब्रेक्झिटच्या समर्थकांच्या' म्हणण्यानुसार ब्रिटनचा १९७३ नंतरचा निरपेक्ष वृद्धीदर, हा १९७३ पूर्वीपेक्षा कमी होता. ब्रिटनचा वृद्धीदर व वृद्धीदरातील क्रमवारीतेत झालेला बदल हा तत्कालीन पंतप्रधान थॅचर यांच्या आर्थिक सुधारणांचा परिणाम आहे.

ब्रिटनच्या आर्थिक घडामोडींचे अभ्यासक, वॉरविक विद्यापीठाचे नीक क्रॅटस् (Nick Crafts) यांच्या मतानुसार दुसऱ्या महायुद्धांनतर जरी सर्व देशांचा वृद्धीदर कमी झाला असला तरी युरोपियन महासंघ हा ब्रिटनच्या प्रगतीच्या वाटेतील अडथळा कधीच झाला नाही. त्यांच्या अनुमानानुसार युरोपियन महासंघाच्या सदस्यत्वामुळे ब्रिटनच्या समृद्धीत १० प्रतिशतने प्रत्यक्षात वाढ झाली. ही समृद्धी ब्रिटनला युरोपियन महासंघाच्या एकल बाजारपेठेतील सुलभ प्रवेशामुळे प्राप्त झाली असे त्यांना वाटते.

ब्रिटनचे बहिर्गमन झाल्यावर त्यास कोणत्या देशांशी व्यापारविषयक करार करावे लागतील व त्याचे स्वरुप कसे असावे याबद्दल बरीच चर्चा केली जाते. त्यासाठी बरेच पर्याय आहेत. एका पर्यायानुसार ब्रिटनलायुरोपियन महासंघातील उरलेल्या २७ सदस्यांशी व्यापार विषयक करार स्वतंत्रपणे करावे लागतील किंवा ज्या देशांशी युरोपियन महासंघाचे अधिमान्य व्यापार करार आहेत (Preferential deal ) ह्या सर्वाशी व्यापार विषयक पसंती करार नव्याने करणे किंवा WTO च्या सदस्यांशी व्यापार विषयक नवीन करार करणे ह्या सर्व पर्यायांचा विचार करावा लागेल. परंतु द्विपक्षी करार प्रत्यक्षात येण्यासाठी वाटाघाटीत बरीच वर्षे निघून जातील असे अनुभवी देशांचे म्हणणे आहे. ब्रेक्झिटच्या समर्थकांनुसार ब्रिटनला व्यापार विषयक कराराची

गरज पडणार नाही. जर्मनी व इतर देशांचे ब्रिटनशी व्यापार आधिक्य आहे व ते ब्रिटनशी नक्कीच अधिमान्य व्यापार करण्यास प्रवृत्त होतील.

चर्चेतील तिसरा मुद्दा आस्थलांतरणाच्या (Immigration) संदर्भात आहे. ब्रिटनचे निव्वळ आस्थलांतरण २०१५ त ३,३३,००० इतके अनुमानित करण्यात आले आहे. २००४ नंतर बल्गेरिया व रुमानियाला ब्रिटनमध्ये राहाण्याचा व काम करण्याचा हक्क प्राप्त झाल्यावर हया आस्थलांतरणाचा वेग अधिकच वाढला. ब्रिटनचे बहिर्गमन झाल्यानंतर युरोपियन देशांचा आस्थलांतरणाचा ब्रिटनकडील ओघ कमी होईल का? आस्थलांतरण व त्याचा अकुशल कामगारांच्या वेतनावर होणाऱ्या विपरीत परीणामांबद्दल बरेच अभ्यास झाले असून बँक ऑफ इंग्लडच्या अभ्यासानुसार त्याचा निम्न मजुरी गटातील ब्रिटनमधील स्थानिक कामगारांच्या मजूरीवर विपरीत परीणाम होऊन २००८ ते २०१५ दरम्यान मजूरीतील त्यांना मिळणाऱ्या मजूरीतील वाटयात २ प्रतिशतने घट होऊन आस्थलांतरित श्रमिकांच्या मजूरीच्या वाटयात, या कालावधीत १० प्रतिशतने वाढ झाली. याच सुमारास Centre for European Reforms (CER) च्या अभ्यासानुसार (The Economic Consequences of Leaving Europe on Brexit, 2016) २००४ ते २०१५ दरम्यान ब्रिटनमधील अकुशल श्रमिकांच्या मजूरीत ०.८ प्रतिशतने घट झाली. त्यामुळे पूर्व व मध्य युरोपातून येणाऱ्या ब्रिटनमधील आस्थलांतरणामुळे अकुशल कामगारांचे भवितव्य धोक्यात आले असे जे म्हटले जाते त्यात थोडेफार तथ्य आहे. तथापि हे परिणाम फारसे लक्षणीय नाहीत असे ब्रेक्झिट विरोधकांना वाटते. कारण युरोपियन महासंघातून ब्रिटनकडे अतिकुशल लोकसंख्येच्या झालेल्या स्थलांतरांचे ब्रिटनला फायदे झाले आहेत.

युरोपातील कौशल्यप्राप्त लोकसंख्येच्या ब्रिटनमधील आस्थलांतरणामुळे ब्रिटीश श्रमिकांच्या उत्पादकतेत व पर्यायाने मजूरी उत्पन्नात वाढ झाली हयाची ब्रिटीशांना जाणीव नाही असे पण म्हटले जाते. CER च्या अभ्यासानुसार त्यामुळे होणारा लाभ हा अप्रत्यक्ष असला तरी त्याचे अनुकुल परिणाम लक्षात घेतले पाहिजे.

ब्रेक्झिट नंतर होणाऱ्या कर वाढीचा व इतर लाभांचा निम्न उत्पन्न गटांवर विपरीत परिणाम होऊन त्यांचे उत्पन्न १०.६ प्रतिशतने कमी होण्याची शक्यता ब्रिटनच्या Institute for Fiscal Studies ने वर्तविली आहे. (CER अहवाल)

स्थलांतरित लोकसंख्येची घनता जास्त असलेले ब्रिटनमधील प्रदेश व स्थानिक लोकसंख्येची दाटी असलेले ब्रिटनमधील प्रदेश हयांचा मजूरीबाबत व त्यांच्या मजूरीतील वृद्धीचा तुलनात्मक अभ्यास केला असता आस्थलांतरित प्रधान प्रदेशातील श्रमिकांच्या मजूरीतील वाढ कमी असल्याचे दाखवित नाही. स्थलांतरित व स्थानिक लोकसंख्येतील अकुशल कामगारांच्या मजूरीतील वाढ किंवा घट याबाबत फारसे अर्थपूर्ण निष्कर्ष निघू शकत नाही असे म्हटले जाते.

ब्रिटनकडे होणारे आस्थलांतरण राजकीय दृष्टीकोनातून देखील महत्वपूर्ण आहे, आस्थलांतरितांचे करांच्या रुपाने ब्रिटनच्या महसूलातील योगदान हे त्यांच्यावरील होणाऱ्या सार्वजनिक सेवांच्या स्वरुपातील वाढीव खर्च व गृहसुविधांच्या मागणीमुळे वाढलेल्या खर्चापेक्षा जास्त असून त्यामुळे ब्रिटन लोकसंख्येच्या वयोवृद्धत्वाची (Ageing of Population) समस्या सोडविण्यास

मदत होते. तसेच आस्थलांतरितांच्या योगदानातून वृद्ध लोकसंख्येच्या पेन्शनसाठी व आरोग्यावरील खर्चासाठी निधी उभारण्यास मदत होते. ब्रेक्झिटमुळे युरोपियन महासंघातून येणाऱ्या अस्थलांतरावर निर्बंध येऊन त्याचा ब्रिटनच्या कार्यकारी लोकसंख्येवर विपरीत परिणाम होऊन ब्रिटनच्या लोकसंख्येच्या वयोवृद्धत्वाची समस्या अधिक गहन होण्याची शक्यता असल्याचे CER च्या अहवालात निदर्शनास येते.

त्याचवेळी ब्रिटनची १.८ मिलीयन लोकसंख्या युरोपियन महासंघात मुक्तसंचार करते व युरोपियन महासंघाची श्रमिक बाजारपेठ ब्रिटनमधील श्रमिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देते हे देखील दृष्टीआड करुन चालणार नाही.

ब्रेक्झिटचा निर्णय जाहीर झाला त्याच सुमारास 'Economic Consequences of Leaving European Union The Final Report of the CER Commission on Brexit 2016' अहवाल प्रसिध्द झाला. सेंटर फॉर युरोपियन रिफॉर्म (CER) ही संस्था युरोपियन महासंघाचे कामकाज कसे सुसंगत चालेल यासाठी सतत प्रयत्नशील असते. त्या दृष्टीकोनातून पाहता हा अहवाल युरोपियन संघाच्या बाजूने आहे असे मत देखील व्यक्त केले जाते. परंतु हे वास्तव लक्षात घेऊनही त्यातील काही मुद्दयांचा येथे परामर्ष घेणे उचित होईल.

**ब्रिटनची युरोपियन महासंघाशी एकात्मकता:**

CER च्या अहवालात ग्रोनिंनजेन विद्यापीठ (Groningen University) च्या जागतिक आदान-प्रदान (World Input Output Data Base) माहितीच्या आधारे ब्रिटन आणि युरोपियन महासंघातील तादात्म्याचे अनुमान केले आहे. त्यानुसार ब्रिटनची युरोपियन महासंघाला केलेली निर्यात व स्थानिक उत्पादकांकडून निर्यातदारांना पुरविण्यात येणारी अर्धसिध्द उत्पादने व पुरवठयातील अंतर्गत दूवे (supply chain) याचे अनुमान त्यांनी केले त्या अनुमानानुसार ब्रिटनने युरोपियन महासंघाला केलेले स्वउत्पादनाच्या विक्रीचा वाटा ९.८ प्रतिशत होता(२०११). त्यात लंडनचा वाटा २२ प्रतिशत तर दक्षिण पूर्वेचा (लंडन सोडून) वाटा १५ प्रतिशत अनुमानित करण्यात आला. ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेचे अमेरिका व चीनशी केलेल्या व्यापारातील योगदान युरोपियन महासंघाच्या तुलनेत बरेच कमी दिसून येते. अमेरिका ब्रिटनकडून ३.४ टक्के मालाची खरेदी करते तर चीनचा वाटा केवळ १ प्रतिशत अनुमानित करण्यात आला आहे (२०११) (EER अहवालानुसार २०१६).

Groningen Database नुसार ब्रिटनला वित्तीय सेवाच्या पुरवठया संदर्भात तुलनात्मक लाभ आहे. त्यामुळे वित्तिय सेवांच्या बाबतीत ब्रिटनने युरोपियन महासंघाला केलेली निर्यात लक्षणीय आढळते. ब्रिटन कडून पुरविण्यात येणाऱ्या सेवांच्या संदर्भात युरोपियन महासंघाच्या मागणीचा वाटा सिंहाचा असून अंदाजे २/५ मागणी युरोपियन महासंघाकडून केली जाते. अमेरिकेचा वाटा १७ प्रतिशत असून BRIC या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांचा वाटा १० प्रतिशत अनुमानित करण्यात आला आहे.

परंतु वाणिज्य व सेवांच्या संदर्भातील वरील व्यवहारात युरोपियन महासंघाशी असलेली एकात्मकता कितपत जबाबदार आहे हा कळीचा मुद्दा आहे. युरोपियन महासंघाशी असलेली भौगोलिक जवळीक या वाढत्या वित्तीय व वाणिज्य व्यवहारांसाठी कारणीभूत आहे की युरोपियन महासंघाची एकात्म बाजारपेठ यास कारणीभूत आहे?

याचे अनुमान करण्याच्या दृष्टीने CER ने गुरुत्वीय प्रारुपाचे (Gravity Model) प्रायोजन करुन काही निष्कर्ष काढले. त्यानुसार ब्रिटनच्या सदस्यत्वामुळे ब्रिटन व युरोपियन महासंघाच्या घटक देशांशी असलेल्या वस्तु व्यापारात ५५ टक्के वाढ झाली. २०१५ ब्रिटनचे युरोपियन महासंघाशी असलेल्या वस्तू व्यापाराचे मूल्य ३६४ बिलीयन पौंड होते. त्यात युरोपियन महासंघाच्या सदस्यत्वामुळे निर्माण झालेले व्यापारमूल्य, १३० बिलीयन पौंड अनुमानित करण्यात आले आहे. या उलट ब्रिटनचे चीनशी असलेले द्विपक्षीय व्यापारमूल्य केवळ ४३ बिलीयन पौंड अनुमानित करण्यात आले आहे. तसेच ब्रिटन हा युरोपियन महासंघाच्या अर्थव्यवस्थेशी इतर बाबतींतही तादात्म पावलेला आहे. युरोपियन महासंघाच्या घटक देशांचा ब्रिटनच्या परकीय गुंतवणूकीतील वाटा केवळ ३० प्रतिशत होता. परंतु २०१४ ला हा वाटा ५० प्रतिशत पर्यंत वाढला.

२०१५ मध्ये ब्रिटनमधील बॅकांच्या मत्तांचा (Asset) युरो झोन मधील वाटा ४५ प्रतिशत होता. हा वाटा अमेरिकेतील बँकापेक्षा जास्त आहे. लंडनला झालेला लाभ देखील लक्षणीय आहे. लंडन हे वित्तिय सेवांचे मध्यवर्ती केन्द्र असून युरोपियन महासंघाच्या एकात्म बाजारपेठेचा त्यास बराच लाभ झाला आहे.

**ब्रेक्झिटमुळे ब्रिटनला स्वायत्तता मिळेल का?**

युरोपियन महासंघाकडून युरोपियन महासंघ सदस्य देशांवर व्यापार व्यवहार विषयक बरीच बंधने लादली गेली असून त्यामुळे ब्रिटनची स्वायत्तता धोक्यात आली होती असे ब्रेक्झिट समर्थकांचे म्हणणे आहे. परंतु OECD च्या अभ्यासानुसार कमीत कमी नियंत्रण असणाऱ्या विकसित देशातील वस्तू बाजारपेठेत नेदरलँडनंतर ब्रिटनचा दूसरा क्रमांक लागतो.

तसेच ब्रिटनच्या श्रमिक बाजारपेठ संरक्षण निर्देशांकानुसार ब्रिटनने युएस, कॅनडा, ऑस्ट्रेलिया या देशांच्या श्रमिक बाजारपेठांवर जवळ जवळ सारखीच बंधने लादलेली आहेत.

तसेच ब्रिटनच्या लवाचिक श्रमिक बाजारपेठेवर युरोपियन महासंघाच्या रोजगारा संबंधित नियमांचा व नियंत्रणाचा फारसा विपरीत परीणाम झालेला दिसत नाही. त्यामुळे युरोपियन महासंघा पासून विलग होऊन ब्रिटीश अर्थव्यवस्थेचे वियुरोपियनीकरण (de-Europeanisation) होऊन ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेस स्वायत्तता मिळेल असे ब्रेक्झिट समर्थकांना वाटते त्यात फारसा अर्थ नाही.

युरोपियन महासंघातून बहिर्गमन केल्यानंतर एकल बाजारपेठेचे लाभ मिळण्यासाठी दूसरा पर्याय म्हणजे ब्रिटनने EEA चे सदस्वत्व स्वीकारणे हा होय. युरोपियन एकॉनॉमिक एरीया (EEA) सदस्यत्व स्वीकारलेले नॉर्वे, आइसलॅड व लेवेनस्टीन सारख्या देशांनी देखिल 'एकात्म' बाजारपेठेचे लाभ प्राप्त करण्याच्या दृष्टीने युरोपियन महासंघाची व्यापारविषयक नियंत्रणे स्वीकारलेली आहेत. त्यामुळे ब्रिटनला पूर्णपणे स्वातंत्र्य मिळेल अशी आशा करणे योग्य नाही.

तसेच युरोझोनचे सर्वात मोठे वित्तीय केन्द्र हे लंडन असून त्याला देखील ब्रिटनने युरोपियन महासंघातून बहिर्गमन केल्यानंतर युरोझोनच्या वित्तीय बाजारात अनिर्बंध प्रवेश मिळेल असे वाटत नाही. कारण युरोपियन महासंघाच्या व्यापार गुंतवणूक नियमांनुसार युरोपियन महासंघ सदस्य देशांवरील व सदस्यत्व नसलेल्या देशांवरील बंधने यात भेद असावा असे आहे.

**ब्रेक्झिट पासून राजकोषीय लाभ (Fiscal gains) :**

युरोपियन महासंघाच्या सदस्य देशांना युरोपियन महासंघाच्या पूर्वेकडील घटक देशांच्या विकासासाठी, त्यांना काही मूलभूत सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी अर्थसंकल्पीय योगदान करावे लागते हा निधी ब्रिटनच्या युरोपियन महासंघातील अनिर्बंधित एकात्म बाजारपेठतील मुक्त प्रवेश व त्या अनुषंगाने मिळणारे व्यापार वित्तीय सेवांच्या व्यवहारांसाठी मोजलेली किंमत आहे. युरोपियन महासंघातून बहिर्गमन केल्यानंतर ब्रिटनच्या घरगुती स्थूल राष्ट्रीय उत्पादाच्या ०.५ प्रतिशत निधीची बचत होऊ शकते असे अनुमान CER ने केले आहे.

परंतु वास्तवात EEA चे सदस्य देश व स्विझर्लंड सुध्दा या निधीत वित्तिय योगदान करतात ब्रिटनला देखिल बहिर्गमनानंतर या योगदानात कपात करता येणार नाही असे अंदाजित केले आहे.

**युरोपियन महासंघाचे सामान्य कृषिधोरण Common Agricultural Policy व ब्रेक्झिट:**

युरोपियन महासंघातून बहिर्गमन केल्यानंतर ब्रिटनला युरोपियन महासंघाच्या सदस्य देशांना मिळणाऱ्या सामान्य कृषिधोरणाच्या लाभांपासून वंचित व्हावे लागेल. त्यामुळे ब्रिटनमधील अन्न धान्य महाग होऊन उपभोक्त्यांचा अन्नधान्या वरील खर्च वाढेल. युरोपियन महासंघाच्या प्रशुल्क व अंशदानाचा परीणाम स्वरूप युरोपियन महासंघातील घटक देशांची कृषी लॉबी प्रबल असून ती अन्नधान्यावरील अंशदानास कपात करण्यावर बंधने लादेल व त्याचा प्रतिकूल परिणाम ब्रिटनच्या उपभोक्तांवर होईल असे अनुमान CER ने केले आहे.

ब्रिटनमधील वॉलर व आयर्लंड च्या ग्रामीण भागास या अंशदानाचा तसेंच युरोपियन महासंघाच्या सदस्य देशांनी केलेल्या विभागीय विकास निधीचा (Regional Development Fund) बराच लाभ होतो. ब्रिटनच्या बहिर्गमनामुळे त्यांना यापासून वंचित व्हावे लागेल. ब्रिटनला त्यांच्या विकासासाठी निदान अंशत: वित्तीय तरतूद करावी लागेल. तसेच ब्रिटनमधील कॉर्नवॉल व इतर गरीब विभांगासाठी देखील वरील निधीची तरतूद करणे अपरिहार्य ठरेल अन्यथा ते देखील या लाभांपासून वंचित होतील.

**४. भारत, युरोपियन महासंघ व ब्रेक्झिट :**

युरोपियन महासंघाच्या तुलनेत ब्रिटनचे भारताशी असलेले वाणिज्य व्यापार व गुंतवण संबंध फाटसे लक्षणीय नाहीत. भारताच्या वस्तू व्यापारात व प्रत्यक्ष परकीय गुंतवणुकीत त्याचा केवल २ प्रतिशत वाटा असून भारताच्या सेवांच्या व्यापारात त्याचा वाटा ३ प्रतिशत आढळतो (२०१५). मात्र २००० पासून भारताच्या ब्रिटनशी असलेल्या व्यापारात जवळपास तिप्पट वाढ झालेली आढळते. ५.३ बिलीयन डॉलर पासून १४.२ बिलीयन डॉलर. २००० ते २०१५ त्यात ब्रिटनच्या निर्यातीतील वाढ २.२ बिलियन डॉलर पासून ८.८ बिलियन डॉलरपर्यंत तर ब्रिटनच्या आयातीतील वाढ ३.४ बिलियन पासून ५.३ बिलीयन डॉलर पर्यंत झालेली दिसते.

ब्रेक्झिट नंतरचे भारताचे ब्रिटनशी असलेले व्यापार विषयक संबंध भारताचे युरोपियन महासंघाशी अस्तित्वात असलेल्या वर्तमान व्यापार व्यवहार संबंधाशी तपासून ब्रिटनच्या बहिर्गमनाचा परीणाम या व्यापार, वित्तीय संबंधावर कसा होईल हयाचा विचार करावा लागेल. भारत व युरोपियन महासंघ हयांच्यात २००७ पासून व्यापक स्वरुपाच्या व्यापार गुंतवण विषयक वाटाघाटी चालू आहेत. या

वाटाघाटींचा रोख वस्तू व सेवांच्या बाजारातील पोहोच तसेच शासकीय प्रापणावर (Govt. Procurement) आहे. त्यातील कळीचे मुददे खालील प्रमाणे आहेत.

युरोपीयन महासंघाने सेवांच्या संदर्भात Mode 4 services तसेंच औषधीवस्तू क्षेत्रांच्या संदर्भात भारतास अधिक प्रमाणात प्रवेश द्यावा असे वाटते. तसेच सुरक्षित समंक राष्ट्र दर्जा (Data secure nation status) द्यावा (त्याचा लाभ भारताच्या IT क्षेत्रास मिळेल) या व्यतिरिक्त भारतीय व्यावसायिकांच्या बाबतीत VISA संबधित अटी (norms) शिथिल कराव्यात अशी भारताची भूमिका आहे.

दुसऱ्या बाजूस भारताने आपल्या वित्तीय क्षेत्राचे पुनर्गठन करावे, मद्य व स्पिरीट वरील करात कपात करावी, दुग्धव्यवसायावरील प्रशुल्क कमी करावे तसेच ऑटोमोबाईल वरील डयूटी कमी करावी व सदृढ बौध्दिक संपदा स्वामित्व व्यवस्था निर्माण करावी अशी युरोपियन महासंघाची भूमिका आहे.

वित्तीय क्षेत्राच्या पुनर्गठन संबंधात भारताने बॅकेच्या शाखा, सांखिकीय कोटा, (numerical quota) परकीय समभागावरील मालकी वरील मर्यादा, मताधिकार व गुंतवणुक या बाबतीत नियमन करण्याच्या दृष्टीने अधिक उदार (liberal) धोरण ठेवावे व्हावे असे युरोपियन महासंघाचे म्हणणे आहे.

भारत व युरोपियन महासंघामधील वाटाघाटी सध्या युरोपियन महासंघ भारतीय व्यावसायिकांच्याा संबंधात व्हिसा नियम शिथिल करेल कां या बाबतीतील अनिश्चिततेमुळे ठप्प झाल्या आहेत. भारताच्या लोकसंख्यात्मक लाभामुळे (demographic advantage) युरोपियन महासंघास कुशल, स्पर्धेत टिकेल असा व इंग्लीश भाषेची जाण असणारा श्रमिक वर्ग मिळाला. व्हिसा नियमांचे शिथिलीकरण न केल्यास नजिकच्या काळात युरोपियन महासंघात कुशल अशा आस्थलांतरीत श्रमिकांचा तसेच अतिकुशल मनुष्यबळचा अभाव दिसून येईल. त्यासाठी Mode 4 च्या संदर्भातील शिथिलीकरणास भारताने अधिक महत्व दिले आहे. (Mode 4 refers to delivery of a service within the territory of a member with the service provider being present as a natural person) परंतु युरोपीयन महासंघाने याबाबतीत सर्व घटक देशांसाठी सामान्य स्वरुपाचे धोरण न स्वीकारता युरोपीयन महासंघ सदस्य देशांना वैयक्तिक पातळीवर व्यावसायिकांच्या आस्थलांतरणाचे धोरण राबविण्याचे स्वातंष्य दिले आहे. जोपर्यंत या वाटाघाटीस अंतिम स्वरुप येत नाही तोपर्यंत युरोपीयन महासंघ, भारत तसेच ब्रिटनमधील व्यापार व्यवहार व आस्थलांतरितांपासून मिळणारे लाभ या बाबतीतील संभाव्य परीणामांची चर्चा करता येणार नाही किंवा त्या चर्चेवर मर्यादा येतील.

युरोपियन उत्पादनांवर, प्रामुख्याने ऑटोमोबाईल व अल्कोहोलवरील आयात कर (custom duty) मुक्त व्यापार करारानुसार कमी करावा असे युरोपियन महासंघाचे म्हणणे आहे. परंतु भारताच्या दृष्टीकोनातून आदानांवरील वाढीव खर्चाचा ऑटोमोबाईल उद्योगांच्या स्पर्धात्मक क्षमतेवरील प्रतिकुल परिणाम तसेच विविध करांच्या परिणाम स्वरूप वाढलेला उत्पादन खर्च यामुळे भारताच्या ऑटोमोबाईल उद्योगास युरोपियन महासंघाशी स्पर्धा करणे कठीण जाते. त्यामुळे त्यावरील आयात कर कमी करण्याची शक्यता कमी आहे.

भारताच्या शासकीय प्रापणाच्या संदर्भातील

वाटाघाटी देखील फारशा पुढे सरकल्या नाहीत. कारण भारताच्या दृष्टीने ही संवेदनात्मक बाब असून त्यात धोरणात्मक बदल करण्यास भारत फारसा उत्सुक नाही.

एकूणच युरोपियन महासंघ व भारत यातील व्यापार व्यवहार व वित्तीय सेवांची आयात-निर्यात अप्रत्यक्षपणे मुक्त व्यापार अटींवर अवलंबून आहे.

**४. बहिर्गमन पश्चात भारत-ब्रिटन व्यापार संबंध :**

भारताचा ब्रिटन व युरोपियन महासंघातील इतर २७ देश ह्यांच्यातील व्यापार व्यवहार (२००० ते २०१५) तपासून पाहिल्यास ब्रिटन व भारताचा व्यापार ताळेबंद हा २००४ पासून आधिक्याचा असून इतर २७ युरोपियन महासंघ सदस्य देशांशी असलेला त्याचा व्यापार ताळेबंद ऋणात्मक दिसून येतो. २०१५ ला भारतातील ब्रिटनला केलेल्या प्रथम १० निर्यात उत्पादनांचा वाटा भारताच्या एकूण निर्यातीत ६३ प्रतिशत होता. ब्रिटन वगळून भारताची युरोपियन महासंघास केलेली निर्यात ८ बिलियन डॉलर पासून ३५ बिलीयन डॉलर (२००० ते २०१५) पर्यंत वाढलेली दिसते तर आयात ७.८ बिलीयन डॉलर पासून ३८.५ बिलीयन डॉलर पर्यंत (२००० ते २०१५, ब्रिटन वगळून) वाढलेली दिसते. व्यापार तूट २.७ बिलीयन डॉलर अनुमानित करण्यात आली आहे. परंतु ब्रिटनच्या संदर्भात मात्र व्यापारी तुटीचे रुपांतर व्यापार आधिक्यात झाले. २००४ पासून २०१५ पर्यंत हे आधिक्य ३.५ बिलीयन डॉलरपर्यंत पोहचले.

२०१५ मध्ये ब्रिटनमधून निर्यात होणाऱ्या प्रथम १० निर्यात उत्पादनांचा भारतात केल्या जाणाऱ्या एकूण निर्यातीत ८३ प्रतिशत वाटा होता. तर ब्रिटनला केलेल्या प्रथम १० निर्यात उत्पादनांचा वाटा भारताच्या एकूण निर्यातात ६३टक्के होता (२०१५).

भारत व युरोपियन महासंघ यांच्यात २००७ पासून मुक्त व्यापार करारा संबंधी वाटाघाटी चालू असून ब्रिटनचे बहिर्गमन झाल्यावर त्याचे पुर्नरावलोकन करण्याची आवश्यकता भासेल. ब्रिटनने भारतात केलेल्या निर्यातीवर सरासरी १४.८ प्रतिशत प्रशुल्क आहे तर भारतातून होणाऱ्या निर्यातीवर हे प्रशुल्क ८.४ प्रतिशत अनुमानित करण्यात आहे. ब्रिटनमधून निर्यात होणाऱ्या उत्पादनात पेयांवर ( Beverages) व स्पिरीट वरील प्रशुल्क ११३ टक्के अनुमानित करण्यात आले आहे. चहा व कॉफी वरील हे प्रशुल्क ८२.५ टक्के असून वाहनांवरील प्रशुल्क ३१ टक्के अनुमानित केले आहे. भारतातुन युकेला निर्यात होणाऱ्या उत्पादनात दुग्ध उत्पादनांवर ३६.६% तर तंबाखू व तंबाखू उत्पादनांवर सुध्दा हे प्रशुल्क अंदाजे ३६ टक्के होतो.

एका अभ्यासानुसार (Rashmi Banga, Opportunities for India, The Common-wealth) ज्यात WITS Simulation model चा वापर करुन काही निष्कर्ष काढण्यात आले. त्यानुसार ब्रिटनच्या बहिर्गमनानंतर ब्रिटन व भारत दरम्यान मुक्त व्यापार करार होऊन प्रशुल्क शुन्यावर आल्यास भारताची ब्रिटनमधून केलेली आयात दरवर्षी ५० प्रतिशतने वाढेल. २०१५ नंतर ब्रिटनने भारतातून केलेली आयातीची वार्षिक वाढ १२ प्रतिशत अनुमानित करण्यात आली आहे. त्यात प्रमुख्याने तयार कपडे व कापडाच्या निर्यातीचा वाटा महत्वाचा आहे. ब्रिटन मध्ये निर्यात होऊ शकणाऱ्या नवीन उत्पादनात प्रामुख्याने हीरे, लिक्विड डायलेक्ट्रीक ट्रांसफॉर्मर, स्त्रीयांचे ब्लाऊज्, हँडबॅग, शर्ट इ.चा समावेश असेल अर्थात त्यासाठी युके व भारत

दरम्यान कराराची आवश्यकता आहे.

ब्रिटनच्या राष्ट्रीय सांख्यिकीय अंदाजानुसार भारताची ब्रिटनमधील परकीय प्रत्यक्ष गुतवण १६४ मिलीयन पौंड (२००४) पासून १.८ बिलीयन पौंड पर्यंत वाढलेली आढळते. माहिती व प्रसारण सुविधांचा वाटा वरील गुंतवणूकीत महत्वपूर्ण आढळतो. अमेरिका व फ्रांस नंतर ब्रिटनमधे गुंतवणूक करणाऱ्या देशात भारताचा तिसरा क्रमांक लागतो (ग्रांट थोरटॉंं २०१६). भारताची ब्रिटनमधील गुंतवण २०१५ मध्ये ६५ प्रतिशतने वाढली. ब्रिटनमधील कंपन्याची संख्या देखील ३६ वरुन ६२ पर्यंत वाढलेला आढळते, भारताने युकेत एकूण १२२ विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीचे (FDI) प्रकल्प राबविलेले आढळतात (२०१४-१५ दरम्यान)

भारत व ब्रिटन ह्यांच्यातील २००७ पासून व्यापार गुंतवणूक संबधी चाललेल्या वाटाघाटींवर दृष्टीक्षेप टाकल्यास ब्रिटनच्या बाजारपेठेत व युरोपियन महासंघात मोड-१ सेवांच्या अर्थात माहिती व तंत्रज्ञानावर आधारीत सेवा, उद्योग व ज्ञानावर आधारित प्रक्रियांचे संबधित सेवांचे ousourcing च्या बद्दल तसेच मोड-४ सेवासंबधित म्हणजे (कुशल व्यावसायिक, सॉटवेअर इंजिनियर्स) याबाबत भारताला अधिक सुलभ प्रवेश मिळावा यासाठी प्रयत्न चालू आहे. तसेच भारताने त्यास data secure nation status द्यावा असा युरोपियन महासंघापाशी आग्रह धरला आहे. त्याचवेळी ब्रिटनने पण विमा व किरकोळ व्यापार या बाबतीत भारताने ब्रिटनला प्रवेश द्यावा व ऑटोमोबाईल, वाईन व स्पिरीट वरील प्रशुल्क कमी करावे असा आग्रह धरला आहे.

**ब्रिटन-भारत दरम्यान सेवांचा व्यापार :**

जागतिक पातळीवर ब्रिटनचा २०१५ मध्ये सेवांच्या निर्यात संदर्भात दुसरा क्रमांक अनुमानित करण्यात आला आहे. परंतु भारताचा ब्रिटनमधील सेवाच्या आयात व निर्याती संदर्भातील वाटा अनुक्रमे १.८ टक्के व १.१ टक्के च्या आसपास आढळतो. (२००५ ते २०१४) २०१४ मध्ये भारताची सेवांची आयात ब्रिटनला केलेल्या सेवांच्या निर्यातीपेक्षा जास्त होती. भारतातून केलेल्या सेवांच्या आयातीचे २०१४ तील मूल्य ३.६९ बिलीयन डॉलर होते. तर भारतातून आयात केलेल्या सेवांचे मूल्य ३.७१ बिलीयन डॉलर होते. परंतु २००७-२०१३ पर्यंत मात्र भारताला ब्रिटनने केलेली सेवांची निर्यात आयातीपेक्षा जास्त होती. ब्रिटनने भारतातून सेवा व्यावसायिक व्यवस्थापन, सल्ला व संशोधन विकास सेवांच्या केलेल्या आयातीचा वाटा सर्वात जास्त होता (२०१४).

**भारत-ब्रिटन गुंतवण संबंध :**

ब्रिटन व भारताचे परकीय गुंतवणूकीच्या (FDI) बाबतीतील संबंध हे काहीसे अनिश्चित असले तरी ब्रिटनचा भारतातील परकीय गुंतवणूकीत तिसरा क्रमांक लागतो. एप्रील २००० ते मार्च २०१६ दरम्यान ब्रिटनची भारतातील गुंतवण २३ बिलीयन डॉलर असून ब्रिटनच्या एकूण परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीतील त्याचा वाटा ८ प्रतिशत अनुमानित करण्यात आला आहे. रसायने, खते, औषधी उत्पादने, अन्न प्रक्रिया, टेलीकॉम सेवा, पेट्रोलियम व नैसर्गिक वायु या क्षेत्रात प्रामुख्याने ही गुंतवण आकर्षित झालेली आढळते.

भारत, ब्रिटन व युरोपियन महासंघातील व्यापार संबंधात दुसरा महत्वाचा मुद्दा हा भारताच्या बौध्दिक संपदा अधिकारा (Intellectual Property Right) संबंधीत आहे. WTO करारातील बौध्दिक पदेतील व्यापार विषयक बाबींव्यातिरिक्त

इतर गोष्टींसाठी भारत कोणतीही बांधिलकी स्वीकारण्यात तयार नाही. तसेच भारताच्या पेटंट कायद्यात बदल करण्यासही भारत फारसा ईच्छूक नाही. त्यामुळे जुन्या औषधात थोडेफार बदल करुन पेटंटचे नुतनीकरण करण्यावर युरोपियन महासंघातील कंपनीवर बंधने आलेली आहेत.

युरोपियन महासंघात कृषिव्यापार हा संरक्षित असून त्यास बरेच मोठे अंशदान मिळते. युरोपियन महासंघातून दिल्या जाणाऱ्या अंशदानात ब्रिटनचा वाटा महत्वपूर्ण आहे. युरोपातील राष्ट्रीय शेतकरी संघटनेच्या अनुमानानूसार २०१५ मध्ये ब्रिटन मध्ये शेतकऱ्यांना ३.१ बिलीयन युरो डॉलर ची प्रत्यक्ष वित्तीय मदत झाली. ही मदत युरोपियन महासंघाच्या सामान्य कृषीधोरणानुसार (Common Agricultural Policy) करण्यात आली. तसेच ग्रामीण विकास प्रकल्पा अंतर्गत २०१४-२०२०च्या दरम्यान ब्रिटनला ५.२ बिलीयन युरो डॉलर निधी देण्यात आला. ब्रिटन हा युरोपियन महासंघाकडून ३६ बिलीयन युरो डॉलरची अन्न धान्य उत्पादन व भाज्यांची आयात करतो. बहिर्गमनानंतर ब्रिटनला युरोपियन महासंघाच्या अंशदानाचा लाभ मिळणार नाही. जर भारत ब्रिटन दरम्यान मुक्त व्यापार करार झाला तर पूर्वी युरोपियन महासंघातून आयात होणारी कृषी उत्पादने, अन्न धान्य उत्पादने-भाज्या, फळे, मासे तो ब्रेक्झिट नंतर भारताकडून आयात करु शकतो. तसेच भारतीय निर्यातदारांवर सध्या असलेली प्रशुल्केतर बंधने देखील वाटाघाटी करुन शिथील करु शकतो.

एकूणच ब्रेक्झिट मुळे ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेत बरीच स्थित्यंतरे होऊन त्यांना नवीन आव्हानांचा सामना करावा लागेल. भारताला देखील नवीन आव्हाने समर्थपणे पेलावी लागतील कारण ब्रिटन व प्रामुख्याने लंडन हे भारतासाठी व्यापार, गुंतवणूकीचे प्रवेशद्वार आहे.

**५. भारतीय अर्थव्यवस्थेवरील संभाव्य परिणाम:**

बऱ्याच भारतीय कंपन्या या ब्रिटीश अर्थव्यवस्थेशी जोडल्या गेल्या आहेत. गुंतवणुकदारांना ब्रिटनचे युरोपियन युनियन मधून निर्गमन या महत्त्वाच्या epoch making घटनेचा भारतासारख्या उगवत्या बाजारपेठेवर नक्कीच परिणाम होईल. इन्फोसिस किंवा टाटा कन्सल्टन्सी सारख्या माहिती व तंत्रज्ञानावर आधारित कंपन्या ज्यांचा निर्यातीपासूनचा युरोपियन देशातील महसूल ३० प्रतिशत पेक्षा जास्त आहे त्यांना त्यांची मुख्य ऑफिसेस ब्रिटन व युरोप अशा दोन्ही ठिकाणी स्थापन करावी लागतील. त्यांच्या तेथील प्रकल्पांवरील कमी नफ्याचे प्रमाण पहाता दोन ठिकाणी ऑफीस चालविण्याचा त्यांचा खर्च वाढेल.

अनिश्चिततेच्या वातावरणामुळे कंपन्यांना महत्वपूर्ण नियोजन (strategic planning) करणे कठीण जाईल टाटा स्टील सारख्या मोठ्या उद्योगाला देखील त्यांच्या युरोपातील प्लॅन्ट्सचे काय करावे याबाबत निर्णय घ्यावा लागेल. अलीकडील अहवालानुसार टाटा सन्स हे जर्मनीच्या Thyssenkrupp या कंपनीबरोबर आपल्या युरोपातील उद्योगांचे विलीनकरण करण्याचा विचार करीत आहे.

ऐतिहासीक व सांस्कृतिक कारणास्तव भारतीय कंपन्यांचा ब्रिटनमध्ये गुंतवणुक करण्याकडे कल दिसतो. (Bias Towards investing in UK) टाटा सन्सने केवळ कारस् ची खरेदी केली नाही तर त्यातुन टाटा स्टील युरोपची निर्मिती झाली त्यांना ब्रिटीश नावे दिली (Tetley Tea o Jaguar Land Rover).

ब्रिटनमधील परकीय गुंतवणूकीत भारताचा

तिसरा क्रमांक आहे. भारतीय कंपन्या इतर युरोपियन युनियन सदस्य देशांपेक्षा ब्रिटन जास्त गुंतवणुक करतात. वस्तुत: ब्रिटनची अर्थव्यवस्था ही युरोपियन युनियनच्या तुलनेत केवळ १७.४ प्रतिशत आहे.

ब्रिटन हे भारतीय कंपन्यांचे युरोपियन महासंघामधील प्रवेशद्वार आहे. आजपर्यंत भारतीय उद्योगांनी युरोपियन देशांवर आधारित धोरणाचा त्याग करुन ब्रिटनवर विसंबून राहणाऱ्या ब्रेक्झिट धोरणाचा स्वीकार केलेला दिसतो. ब्रेक्झिटमुळे व्यापारजन्य परिस्थिती अनुकुल होईल असे पण म्हटले जाते. मुक्त व्यापार करारासंबंधित युरोपियन महासंघाबरोबर चाललेली बोलणी फारशी पुढे गेलेली नाही. कित्येक क्षेत्रांना संरक्षण मिळावे व ते चालू रहावे हयासाठी बऱ्याच औद्योगिक लॉबीज ने मुक्त व्यापार कराराबाबत चाललेल्या वाटाघाटींचा प्रतिकार केला. उदा. आय.टी. कंपन्यांचा युरोपियन संघटनांनी भारतातील सांख्यिकी सुरक्षा तरतूदी (India's data security provisions) पुरेशा आहेत असे जाहीर करावे असा आग्रह आहे. त्यामुळे BPO (Business Process Outsourcing) उद्योगांना मदत होईल असे त्यांचे म्हणणे आहे. भारतातील आटो उद्योगांना जर्मनी व झेकोस्लोवियातील कार निर्मिती उद्योगांच्या स्पर्धेची भीती वाटते.

कदाचित ब्रिटन बरोबर करार किंवा विचार विनिमय करणे भारतास अधिक सुलभ होईल असे वाटते. ब्रिटीशांनी देखील युरोपियन संघाचे डाटा सुरक्षिततेचे मापदंड किचकट आहे असे बऱ्याच पूर्वीपासून म्हटले आहे. त्यांना देखील अमेरिकेच्या जवळ असलेली डाटा सुरक्षिततेची व्यवस्था असणे अधिक सुलभ वाटते. कार उत्पादनाच्या बाबतीत भारत कदाचित यासाठी तडजोड करण्यास तयार होईल, अर्थात त्यासाठी ब्रिटन व भारत या दोन्ही देशातील त्यांचे अस्तित्व महत्वपुर्ण असेल.

**६. सारांश :**

वेगवेगळया अहवालातून व लेखातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार ब्रिटनच्या युरोपियन महासंघातून बहिर्गमनामुळे ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेवरील संभाव्य परिणाम ब्रिटनच्या इतर देशांशी केल्या जाणाऱ्या व्यापार विषयक करारांवर व वर्तमान परिस्थितीतील राजनैतिक संबंधावर बऱ्याच अंशी अवलंबून राहतील. ब्रिटनला वरील अनेक आव्हाने पेलावी लागतील.

भारतास देखील नवीन आव्हानांना सामोरे जावे लागेल. कारण लंडन हे भारतासाठी व्यापार व वित्तीय सेवांसाठी प्रवेशद्वार आहे. युरोपियन महासंघाशी व ब्रिटनशी केलेल्या व्यापार व्यवहारात तसेच वित्तीय सेवांच्या आयात निर्यातीस त्यामुळे सुलभता प्राप्त होते. परंतु भविष्यात भारत व ब्रिटनमधील मुक्त व्यापाराच्या कराराचे स्वरुप व mode १ व mode ४ मधील वाटाघाटींवर त्याचे अंतिम स्वरुप अवलंबून राहील.

**संदर्भ :**

1. https//www.cer.org.uk./sies the economic consequences of leaving he EU. the final report of CER ,cenre for European reforms, Brexit ,April 2016,
2. The economic consequences of leaving EU ---June2014 The final report of the CER Commission
3. https:/www.ft.com/context/June 27, Brexit in seven charts-the economic impact-- financial times-Chris Giles
4. Rashmi Banga -- Brexit : Opportunities for India-Emerging Issues ,Briefing paper Sept 2016, The Common Wealth Secretariat, 2016.

◆◆◆

# ब्रेग्झिट : जागतिकीकरणाकडून राष्ट्रीयकरणाकडे

– **प्रशांत हरमकर**
अर्थशास्त्र विभाग,
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,
अमरावती.

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय सार्वमत ब्रिटनमध्ये २३ जून २०१६ मध्ये घेण्यात आले. ब्रिटनच्या लोकांनी ५२ विरूद्ध ४८ प्रतिशत मतदान करून युरोपियन समुदायातून ब्रिटनने बाहेर पडण्याचा (बर्हिगमन) कौल दिला. युरोपियन समुदाय म्हणजे २८ देशाचे सिमारहीत क्षेत्र असून वस्तू, सेवा, गुंतवणूक आणि श्रमाची मुक्तपणे गतीशीलता आहे. युरोपियन समुदायातून ब्रिटन बाहेर पडणार म्हणून याला म्हणजे ब्रेग्झिट (Brexit) असे संबोधण्यात आले आहे. मिशेल ग्रोव्ह ह्यांनी ब्रेग्झिटचे नेतृत्व केलेले होते. त्यांनी मध्यम स्वरूपाची मोहीम याकरिता उघडलेली होती. या देशातील लोक पुरेसे कुशल आहे असे मत तयार करून ब्रेग्झिटला अनुकूल मतदान करण्यात आले. मात्र दोषारोपण लेबर पक्षाच्या पुढाऱ्यावर केल्या गेले होते. मात्र आंतरराष्ट्रीय पातळीवर काळजी केल्या जात होती की ब्रेग्झिट हा ट्रम्पिझम मधून तर उद्भवला नाही कारण हा सर्व राष्ट्रीयकरणाच्या प्रवृत्तीचा भाग आहे.

आधुनिक युरोपचा पिता जीन मोनेट याचे सुप्रसिद्ध वाक्य आहे की,''आर्थिक एकीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र याकरिता अंतर्गत विरोध दूर करायला पाहिजे.'' तर फ्रॅन्को पोवोलसेलो असे म्हणतो,''नवीन समुदाय अथवा संघाची बांधणी करण्याचा मार्ग टप्प्याटप्प्यानी पुढे जात असतो. यामधून आर्थिक एकीकरण घडून येत असते याला वळण देण्याचे काम राजकीय एकीकरणाच्या नेतृत्वातून घडून येत असते.'' युरोपियन समुदाय हा महत्त्वाकांक्षी राष्ट्र प्रकल्प असून यामधून ब्रिटन बाहेर पडत आहे. ह्यामुळे या राजकीय अरिष्टाला नियंत्रित करणे कठीण आहे. त्यामुळे युरोपियन समुदायाची मूलगामी संकल्पना अपयशी ठरल्यामुळे जग सुन्न झालेले आहे.

**ब्रेग्झिट निर्णयाचे घटक :**

युरोपियन समुदायाच्या शक्तीशाली दबावाला नाकारून ब्रिटनने बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. याकरिता ब्रिटनने लोकशाही मार्गाचा स्विकार करून सार्वमत घेतले. सार्वमताने ब्रिटन बर्हिगमनाचा निर्णय दिला. या सार्वमताला वैचित्र्यपूर्ण असे पैलू आहे. या पैलूंमुळेच ब्रिटन युरोपियन समुदायातून बाहेर पडला.

या पैलूचा विचार मुख्यत्वे चार प्रकारात करता येतो. कारण हा निर्णय गुंतागुंतीचा आहे. प्रथमतः युरोपियन समुदायामध्ये एकूण २८ देश होते. या देशांमध्ये अंतर्गत पातळीवर आर्थिक, राजकीय लष्करी हित आणि प्रजासत्ताक मापनामध्ये भिन्नता होती. दुसरे विकासाच्या दृष्टीकोनामधून देखील त्यांच्यात देशांमध्ये भिन्नता आहे. तिसरे ब्रिटन

प्रजासत्ताक देश जरी असला तरी तात्पुरत्या व्हिसावर असणाऱ्या परदेशी रहिवाशाचे प्रमाण जास्त आहे.त्यामुळे वांशिक प्रजासत्ताकता ब्रिटनमध्ये आढळते. चवथे, ब्रिटनचा बहुपक्षीय व्यापार गुंतागुंतीचा आहे. ह्या सर्वांचा परिणाम ब्रिटनच्या बर्हिगमनावर झालेला आहे.

**ब्रिटनची युरोसंशयवृत्ती :**

ब्रिटनची युरोसंयमवृत्ती (Eurosceptism) फार हेकेखोर आहे. महायुद्धानंतरच्या काळात ब्रिटीश राजकारण याहून पुढे गेलेले होते. युरोपियन समुदायाची स्थापना व्हावी याकरिता ब्रिटनने सुरवातीला पुढाकार घेतला होता. विन्सर्टन चर्चिल (१९४६) युरोपियन समुदायाच्या अनुकूल होते. मात्र ब्रिटन युरोपियन समुदायात सामील झाला नाही. ब्रिटन १९५१ मध्ये पॅरिस कराराच्या बाहेर राहिला. हा करार युरोपियन कोळसा आणि स्टिल समुदयाचा होता. पुढे हा करार युरोपियन समुदायाचा भाग ठरला.

ब्रिटनने १९५७ मध्ये रोम करारावर सह्या केल्या नाही. त्यामुळे युरोपियन आर्थिक समुदाय स्थापित होत असतांना ब्रिटन त्याचा भाग होऊ शकला नाही. १९६० च्या दशकाच्या मध्यात ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेमध्ये स्थिरावस्था (Stagnation) निर्माण झाली. त्यावेळी टोरी शासनाने युरोपियन समुदायाचे अस्थायी सदस्यत्व प्राप्त केले. मात्र ब्रिटनला युरोपियन समुदायामध्ये सामील करून घेण्यात बरेच अडथळे होते. फ्रान्सने नकार अधिकाराचा वापर करून ब्रिटनच्या सदस्यत्वाला नाकारले. युरोपियन समुदायाच्या सदस्यत्वावरून ब्रिटीश राजकारण नेहमीच विभागल्या गेले होते. १९७० च्या निवडणूकामध्ये युरोपियन समुदायाचे कायम सभासदत्व हा मुख्य वादप्रश्न ठरला होता.

ब्रिटन युरोपियन समुदायामध्ये १९७३ मध्ये सामील झाला. लेबर पक्ष सत्तेत असतांना फ्रान्सने ब्रिटनच्या सदस्यत्वाला होकार दिला. याकरिता युरोपियन आर्थिक समुदाय करार १९७३ संमत केला. या करारामध्ये रोम करार समाविष्ट होता. मात्र ब्रिटन आणि रोम करारामध्ये विरोध होता ही वस्तुस्थिती होती. १९७४ च्या निवडणूकांमध्ये लेबर पक्षाने आश्वासन दिले की, युरोपियन आर्थिक सुदायासोबत पुनर्वाटाघाटी केल्या जातील. मात्र १९७५ मध्ये लेबर पक्ष विभागल्या गेला. त्यानंतर सार्वमत घेण्यात आले. २/३ बहुमताने युरोपियन आर्थिक समुदायाच्या सदस्यत्वाला विरोध झाला. तरी सुद्धा ६७.२ प्रतिशत मते युरोपियन समुदायाच्या बाजूने होती. या विरोधाभास स्थितीमुळे अंतिमत: टोरी आणि लिबलर पक्षाने युरोपियन समुदायातील समावेशनाला स्थगिती दिली. सार्वमतावरून लेबर पक्ष विभागला गेला. लेबर पक्षाला छेद गेल्यामुळे लेबर पक्ष हा टोरी आणि लिबरल पक्षाच्या जवळ आला. कारण त्याचे मुख्य लक्ष सामाजिक पाया होता.

मार्गारेट थॅचर सत्तेत आल्यानंतर टोरी पक्षाला विभाजनाचा सामना करावा लागला. थॅचर ह्यांनी १९८६ मध्ये युरोपियन करारावर सह्या केल्या. या करारांतर्गत ब्रिटनचा युरोपियन समुदायामध्ये समावेश आणि समान चलनाचे वेळापत्रक बसविण्यात आले. मात परत कृषी अर्थसहाय्य, अन्नाची प्रमाणके, विविध वस्तु व्यापारावरील नियंत्रणे यावरून विरोध झाला ब्रिटनने १९८५ मध्ये शेनगेन करार जो की सीमा नियंत्रणाच्या संदर्भात होता त्याला स्थगिती दिली. १९९० मध्ये ब्रिटन मौद्रिक संघाशी जोडला गेला. मात्र इतर काही राज्यानी यामधून दोन वर्षात माघार घेतली. १९९२ मध्ये चलन बाजारात तीव्र सट्टेबाजी झाली. यामुळे

युरोझोन बाजूला पडला.

युरोपियन समुदायाचा विस्तार १९९२ मध्ये राजकीय संघाकडून आर्थिक संघाकडे झाला. याकरिता मॅस्ट्रिच करार करण्यात आला. टोरी शासनाने मॅस्ट्रिच करारावर सह्या केल्या. मात्र सार्वमत घेण्यात आले नाही. त्यामुळे पक्षामध्येच विरोध झाला. ब्रिटनच्या शासनाने युरोपियन समुदायाशी अनेक वेळा वाटाघाटी केल्या. कलमांमधून माघार घेतली आणि सवलती सुद्धा मिळवल्या होत्या.

लेबर पक्षांतर्गत टोनी ब्लेअर ह्यांनी युरोपियन प्रकल्पाला सहाय्य करून उत्साहवर्धकता निर्माण केली होती. २००१ मध्ये नीस करारावर सार्वमत घेण्याचे ब्लेअर यांनी कबूल केले होते. कोणत्याही प्रकारचा सांविधानिक अडथळा नव्हता.यावर पार्लमेंटमध्ये चर्चा घडवून आणता आली असती. मात्र ब्लेअर ह्यांनी माघार घेतली. युरोपियन समुदायातील अनेक सदस्य देशांनी नीस करार नाकारला होता. नीस कराराला प्रतिस्थापित करून त्याऐवजी लिसबन करार आणण्यात आला. ब्रिटनने २००७ मध्ये लिसबन करारावर सह्या केल्या. ब्रिटीश पार्लमेंटच्या संमती शिवाय याला मंजूरी देण्यात आली होती. त्यामुळे डेव्हिड कॅमरून ह्यांनी विरोध केला होता.यावर युरोपियन समुदायामध्ये राहण्याबाबत आक्षेप घेण्यात आला. त्यानंतर २०१३ मध्ये सार्वमत घेण्याची घोषणा करण्यात आली.अनेक राजकीय पुढाऱ्याचे म्हणणे होते की,टोरी आणि लेबर पक्ष युरोपियन समुदायाबाबत दुटप्पी भूमिका घेत आहे. राजकीय पक्षांनी सबळ भूमिका घेऊन युरोपमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला यामुळे ब्रिटन दुभंगला गेला.

ब्रिटीश राजकारणाची स्थापना आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था, आंतरराष्ट्रीय राजकारण आणि अंतर्गत एकवाक्यता (internal cohesion) या तीन तत्वावर आधारलेली आहे. ब्रिटन हा मुक्त व्यापार विजेता देश आहे. जागतिक युद्धाशी जुळलेला देश आहे. आनंदी वस्तू साठी (jolly goods) वर्गीय युद्ध सुरू आहे. राष्ट्रीय अरिष्ट निर्माण होऊन राष्ट्रीय कर्ज, युद्धे, उग्र प्रवृत्ती, घसरते वेतनाचे दर आणि प्रादेशिक विषमता ब्रिटनमध्ये आहे. यासर्वांच्या पुढे असणारा वादप्रश्न म्हणजे विदेशी स्थलांतरित रहिवाश्याचा प्रश्न ब्रिटनला भेडसावतो आहे.

**मुक्त बाजार प्रारूप :**

दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपने नवउदारमतवादाचा स्वीकार केला. ज्यामध्ये बाजाराच्या विवेकावर संपूर्णपणे विश्वास होता. नवउदारमतवादाच्या मते बाजार हा स्वयंशोधक म्हणजे दुरूस्ती करणारा (self correcting), स्वयंम्-समतोलक (self stabilising) आणि संसाधनाचे कार्यक्षम वितरण करू शकतो. बाजार उच्चवचनाची समस्या देखील दूर करू शकतो. असे गृहीत मानले आहे की, बाजार सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून सेवा देतो. बाजार काय करू शकतो याचे प्रस्तुतीकरण त्याच्या परिणामावरून होते. याबाबत नोम चॉमस्की असे म्हणतात की,''नवउदारीकरणातंर्गत जागतिक कायदे (world order) शासनाला आर्थिक प्रक्रियेतून बाहेर जायला सांगतात.शासनाची भूमिका ही केवळ हमी घेण्याची आहे. बाजार कार्यक्षमपणे कार्य करतो. वस्तू,सेवा आणि संपत्तीचे योग्य प्रकारे वितरण करतो.

मार्गारेट थॅचर आणि रोनाल्ड रिगन ह्यांच्या अर्थशास्त्राचा आधार मुक्त बाजारच होता. वाशिंग्टन कराराने उदारीकरण आणि खाजगीकरणाचा फैलाव केला. अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक विजेते फ्रेन्डरिक वॉन हायेक (१९७४) ह्यांनी सामाजिक न्याय आणि राजकीय हस्तक्षेपाला विरोधच केला होता. तर वाशिंग्टन कराराचे समर्थन केले होते.

तसेच त्याचा भर खाजगीकरण, उदारीकरण, वित्तीयकरण, निर्नियंत्रणे (deregulation), करांमध्ये कपात, श्रमिक संघटना दुर्बळ करणे आणि सार्वजनिक सेवांच्या आऊटसोर्सिंगवर होता.

केन्थ जोसेफच्या विचारसरणीचा प्रभाव थॅचर केबिनेटवर होता. मुक्त बाजार कार्यक्रमपत्रिका स्विकारतांना त्यांनी सर्वांची मते वळवली होती. उदारीकरणाला पर्याय नाही असे बोलल्या जात होते. उदारीकरणाचे पुरस्कर्ते मिल्टन फ्रिडमन आणि शिकागो विद्यापीठातील मौद्रिक अर्थशास्त्रज्ञ म्हणत होते की, केवळ मौद्रिक धोरणामुळे स्फिती नियंत्रित केल्या जाऊ शकत नाही. स्फितीला नियंत्रित करण्याकरिता उदारीकरणाचा मार्ग योग्य आहे. रोखे बाजार आणि वित्तीय बाजारामध्ये निर्नियंत्रणानी पुढाकार घेतला होता. आर्थिक धोरणे बँकर्स (Bankers)आणि मोठ्या निगमाच्या अनुकूल बनविल्या गेले. केंद्रीय बँकेनी आपली धोरणे बदलावित असतांना वित्तीय जोखमी आणि भांडवल नियंत्रणाची भूमिका दुर्लक्षित केली होती.

उदारीकरणाच्या भूमिकेबाबत टोनी ब्लेअर बोलले की, ज्या देशांनी उदारीकरणाची भूमिका स्विकारून स्पर्धा निर्माण केली त्यांना यश प्राप्त झालेले आहे. खुलेपणा आणि बदलावर भर देण्यात आला. त्यामुळे स्पर्धा वाढून कल्याणकारी राज्याचा ऱ्हास झाला. विशेषत: ११ सप्टेंबर २००१ नंतर नवउदारीकरण धोरणांना अपयश येऊ लागले. २००८ च्या जागतिक अरिष्टांच्या यातना सर्व जगाने सहन केल्या. देशीय बाजारामध्ये संसाधने आणि उत्पन्नाचे असमान वितरण झाले. सामाजिक परतावा आणि खाजगी परताव्या मधील अंतर विस्ताराणारे होते. प्रत्यक्षात नवउदारीकरण धोरणाकडे दुर्लक्ष केले तर बाजार संपत्तीचे बुडबुडे निर्माण करू शकतो. मात्र बाजार स्वयं दुरूस्त यंत्रणा म्हणून प्रस्तुत होतांना दिसला नाही.

**ब्रिटीश अर्थव्यवस्था आणि ब्रेक्झिट प्रक्रिया :**

टोरीचे शासन २०१० मध्ये सत्तेत आले. या शासनाने सार्वजनिक खर्चात कपात करायला सांगितली होती. वित्तीय रेटिंग एजन्सीने (Financial Rating Agency) ब्रिटनला तिहेरी AAA प्रत दिलेली होती. आणि मानव संवर्धनाचा प्रस्ताव दिलेला होता. २००८ मध्ये वित्तीय अरिष्ट निर्माण झाल्यानंतर अरिष्टातून बाहेर येण्याकरिता युरोपियन समुदायाने नियंत्रणे लावली होती. जगामध्ये लंडन शहर वित्तीय भांडवल निर्नियंत्रणे ठेवणारे आहे. युरोपियन समुदाय आणि ब्रिटन यांच्या धोरणामध्ये परस्पर विरोध असल्यामुळे ब्रेक्झिट घडून आले. सोबतच ब्रिटनला तिहेरी AAA प्रत मिळाल्यामुळे वित्तीय तुटीमध्ये कपात करण्यास सांगितले. धोरणामध्ये ताठरता आणायला सांगितली. ब्रिटनमध्ये युद्धांची वारंवारिता असल्यामुळे राष्ट्रीय ऋण हा वादप्रश्न होता. त्यामुळे ह्याला अनुसरून संरक्षण बजेटमध्ये कपात करायला सांगितले होते. मात्र ब्रिटन करिता कपात घडवून आणणे कठीण होते.

ब्रिटनमध्ये युद्ध आणि सार्वजनिक कर्जाचा परस्पर संबंध ऐतिहासिक आहे. शंभर वर्षाच्या नंतर म्हणजे मार्च २०१५ मध्ये ब्रिटनने पहिल्या महायुद्धाकरिता घेतलेल्या कर्जाचा शेवटचा हप्ता दिला. मनुष्य आणि युद्धसामुग्रीची गतिशीलता ब्रिटन कडून साम्राज्याकडे दुसऱ्या महायुद्धाकरिता झाली. लष्कराने दुसरे महायुद्ध जिंकले मात्र मोठ्या प्रमाणात आर्थिक हानी झाली. याकरिता कर्जाऊ मुदती करार (Lend Lease Agreement) अमेरिकेसोबत करण्यात आला. महायुद्धानंतर ब्रिटनने अमेरिकेसाठी राजकीय नेतृत्व सोडून दिले. ब्रिटनची आर्थिक

ऋणग्रस्तता वाढली होती. ब्रिटनला प्राप्त झालेल्या एकूण कर्जामध्ये अमेरिकेचा वाटा २५ प्रतिशत होता. अमेरिकेने युरोपची पुर्नबांधणी आणि मार्शल योजनेकरिता मोठी आर्थिक मदत केलेली होती.

१९६० च्या दशकामध्ये युद्धोत्तर पुनर्भरणाकरिता आर्थिक मदत कर्जाच्या स्वरूपात प्राप्त झाली. यामुळे शोधन शेषामध्ये तुटीचा सामना ब्रिटनला करावा लागला होता. परिणामत: स्टर्लिंग-पाऊंडचे मूल्य घसरले होते. बेरोजगारी आणि आर्थिक स्थिरावस्था (Economic stagnation) निर्माण झाली होती. मजदुर संघटना विरूद्ध बेरोजगारी, वेतनाचे दर आणि प्रतिकूल अटी होत्या. म्हणून ब्रिटनने तात्काळ मदतीसाठी आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीची मदत घेतली. याकरिता आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीने सहाय्य केले. जो दोन दशकापूर्व जगातील मोठा साम्राज्यवादी देश होता त्याला अशा प्रकारची मदत मिळवावी लागली. यावेळी राष्ट्राच्या दुराभिमानाचा सखोल व्रणच सोडल्या गेला. ब्रिटनला १९७५ मध्ये युरोचे सदस्यत्व प्राप्त झाले. यातूनच अरिष्टाची निर्मिती झाली.

युरोपमधून ब्रिटन बाहेर वळला होता. त्यामुळे प्रजासत्ताक देशांपासून दूर गेला. त्यामुळे आर्थिक परिणाम त्याच्या पारंपारिक क्षेत्रावर घडून आले. थॅचरची आर्थिक सुधारणांची (LPG) सुरूवात उद्योग आणि उत्पादन आधारभूत रचनेमध्ये केली होती. जागतिक वित्तीय भांडवलाकरिता वित्तीय बाजार निर्नियंत्रित करण्यात आला होता. दुय्यम बाजार (ancillary market) सेवाकरिता कायदेशीर नवप्रर्वतने आणि कौशल्ये घडवून आणण्यात आली. यामध्ये आंतरराष्ट्रीय बाजार संस्था समाविष्ट होत्या. सार्वजनिक ऋण अरिष्टाचे मोठे धक्के लंडन शहराला १९८० मध्ये बसायला लागले होते. सट्टेबाजांनी करार खाजगी क्षेत्र आणि विकसनशील देशांशी केलेले होते. यामधून वित्तीय, अधिकोषण आणि लवादासंबंधीच्या (aribitration) सेवा प्राप्त झाल्या. लंडन तेजी मध्ये असतांना त्याचा प्रभाव इतर भागावर दिसून आला नाही. उत्पन्न आणि रोजगार घसरलेला होता. वर्गीय केंद्रीकरणामुळे भौगोलिक विभागणी होऊन ब्रेग्झिट घडले.

आर्थिक मंदीचा सामना ब्रिटन १९९१ मध्ये करीत होता. याचे कारण लंडनचे वित्त क्षेत्र होते. ब्रिटनचे राजकीय नेते युरोपियन समुदायावर दोषोरोपण करीत होते. कारण विनिमय दर आणि उच्च व्याजदराची मांडणी युरोपियन समुदायाद्वारे केल्या गेली होती. अनेकदा विनिमय दर यंत्रणा युरोपियन समुदायाच्या हाताबाहेर गेली होती. द्विपक्षीय गुंतवणूक करार (Bilateral Investment treaties) अंतर्गत नवीन संधी देण्यात आल्या. बहुराष्ट्रीय बाजार वाटाघाटी अंतर्गत जागतिक व्यापार संघटनेने दोहा फेरी प्रस्तुत केली. अमेरिका आणि युरोपिय समुदाय यामधूनच द्विपक्षीय व्यापार गुंतवणूक करायला लागले. अशा द्विपक्षीय कराराची संख्या १९८८ मध्ये ३०९ होती. ही संख्या वाढत जाऊन २००२ मध्ये २१८१ तर २०१५ मध्ये २९२६ एवढी झाली. याबाबतचे बाह्य दृश्य पाहिले तर ब्रिटनने जुन्या प्रजासत्ताक देशांना चांगल्या संधी प्राप्त करून देण्याकरिता सवलती दिल्या होत्या.

या दरम्यान ब्रेग्झिटची मोहिम उघडण्यात आली. याचा संबंध प्रजासत्तेकतेशी असून वेगळा होण्याचा आवाज होता. यामधूनच विदेशी लोकांच्या स्थलांतरणाला विरोध झाला. ब्रिटनमध्ये वंशभेद माननारा म्हणून युनायटेड किंगडम इन्डीपेन्डस पक्ष आहे. या पक्षाचे नेतृत्व निमेल फरागे करीत होते. हा पक्ष ब्रिटन आणि पूर्व युरोपमध्ये कार्यरत होता. बिंदू आधारित प्रणाली (Point Based System)

आस्ट्रेलियाने लागू केली होती. हेच प्रारूप ब्रिटनने स्विकारले. युरोपियन समुदायामध्ये ब्रिटन सामील झाल्यानंतर ऐच्छिक भागीदार म्हणून भारत, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड आणि कॅनडा या देशांना प्रस्तुत केला. या प्रजासत्ताक देशांशी बिंदू आधारित प्रणालीद्वारे द्विपक्षीय करार करण्यात आला. त्याद्वारे विदेशी स्थलांतरितांना ब्रिटन खुला करण्यात आला. जो श्रीमंत आहे, चांगला रोजगार, संपत्ती आणि विशेषाधिकार आहे त्यांना स्थानिक प्रमाणेच कमी किंमतीवर स्थानिक सेवा दिल्या होत्या.

**असमान वितरण आणि वर्गीय युद्ध :**

आर्टक, चौधरी आणि मार्कल यांच्या अध्ययनानुसार (२०१०) व्यापार उदारीकरणाच्या समायोजनाचा व्यय मोठा आहे. जो की व्यापार उदारीकरणाचा उदय सार्वजनिक पातळीवर झालेला आहे. ब्रेग्झिट म्हणजे अज्ञानांचे अविवेकी मत नव्हते तर व्यापार उदारीकरणामुळे झालेला हानीतून हे मत तयार झालेले होते. निश्तितच हा वादप्रश्न मुक्त व्यापारापासून होणाऱ्या तोट्यामधून निर्माण झाला होता. सुक्ष्म पातळीवर भेद केला तर हा पदवीधर आणि पदवीधर नसणाऱ्यामधील होता. व्यापार उदारीकरणाचा विस्तार होतांना त्याचा संबंध कुशल श्रमिक पुरवठ्याशी आहे. मात्र प्रत्यक्षात वेतनाचे दर प्रतिकूल अटीवर ठरतात. जसे की अमेरिकेमध्ये सरासरी तासाप्रमाणे वेतनदर वाढलेले नाही. तर दुसऱ्या बाजूला स्फिती आहे. त्यामुळे सरासरी वेतन ७० प्रतिशतने घसरलेले आहे. हीच परिस्थिती ब्रिटनमध्ये आहे.

नवउदारीकरणाच्या काळात उत्पन्न वितरणामध्ये विरूपणांनी (distoration) पुढाकार घेतलेला आहे. अमेरिका आणि ब्रिटनमध्ये नवउदारीकरणाचे लाभ प्राप्त करण्याकरिता उच्च उत्पन्न गटातील लोकांवरील कराचे दर कमी केलेले आहे. त्यावरून विचार केला तर धनाढ्यासाठी कर कपातीच्या धोरणामुळे रेगन लोकप्रिय झाले होते. सिमांत कर कपातीचा दर ७० प्रतिशत वरून २८ प्रतिशतवर आणण्यात आला होता तर थॅचरनी सुद्धा कर कपातीचा दर ८३ प्रतिशत वरून ४३ प्रतिशतवर आणण्यात आला होता. सद्य:स्थितीत तळाला असलेले २० प्रतिशत ब्रिटीश लोक ३७.८ प्रतिशत उत्पन्न कर देतात तर उच्चभ्रू २० प्रतिशत ३४.८ प्रतिशत कर देत असल्याचे आढळून येते.

मुक्त व्यापार असतांना नवउदारीकरणाच्या पुरेशा अटी राहतील अशी युरोपियन समुदायाने वचनबद्धता दिली होती. युरोपियन समुदायनेच युरोपचा एक बाजार (single market) असावा असा विचार मांडला होता. यामुळे पेढ्या युरोपियन खंडामध्ये विभागल्या गेल्या तर छोटे उत्पादक स्थानिक क्षेत्रामध्ये उत्पादनांचा पुरवठा करीत होते. अशा प्रकारे एकीकरणाची प्रक्रिया संपादित केल्या जात होती. मात्र एकीकरणाद्वारे उत्पादकतेचे स्वतंत्र लाभ प्राप्त व्हायला पाहिजे. हे लाभ प्राप्त करण्यात बाजार अपयशी ठरला. कारण युरोपमध्ये सांस्कृतिक विविधता आणि उपभोगक्त्याच्या पसंतीमध्ये भिन्नता होती.

मुक्त व्यापार वाढत असतांना सहकारी व्यापार भागीदार देशांना त्याचे लाभ प्राप्त होत असतात. आर्थिक मापके आणि तुलनात्मक व्ययाचा आधारावर व्यापारामध्ये वाढ घडून येते. आर्थिक वृद्धी आणि उत्पन्न वाढ घडून येते. बंद अर्थव्यवस्थेच्या तुलनेत खुल्या अर्थव्यवस्थेमध्ये लोक अधिक चांगले जीवनमान जगतात. मात्र एवढे पुरेसे नाही. प्रश्न हा मुक्त व्यापारापासून मिळणाऱ्या अनुकूल लाभाच्या विभागणीचा आहे. प्रत्यक्षात मुक्त व्यापारामध्ये लाभाचे वितरण असमान

होते. प्रत्येकाला मिळालेला लाभ अल्पसा असतो.

मुक्त व्यापार धोरणे ब्रिटनमध्ये राबवली जात असतांना श्रमिक गतिशीलता ब्रिटन सारख्या उच्च उत्पन्न देशाकडून ग्रीस आणि पोर्तुगाल सारख्या न्यून उत्पन्न देशाकडे होत होती. तेव्हा व्यापार भागीदार देशांनी वेतनदरामध्ये समानता आणण्याचा प्रयत्न केला. परिणामत: गरीब देशामध्ये वेतनाचे दर वाढले तर श्रीमंत देश घसरणाऱ्या वेतन दराचा सामना करीत होते. सोबतच बेरोजगारी वाढत गेली. जसे की मेक्सिको सोबतच्या मुक्त व्यापार करारामुळे अमेरिकेतील अकुशल श्रमिकांच्या वेतनाचे दर घसरलेले होते. अशा प्रकारची स्थिती ब्रिटन आणि अमेरिका या दोन्ही देशामध्ये होती. ब्रिटनमधील युवा बेरोजगाराचे प्रमाण मध्य २००४ ते २०१४ च्या दरम्यान पुरूष बेरोजगाराचे प्रमाण १८.४ प्रतिशतने वाढलेले होते तर स्त्री बेरोजगाराचे प्रमाण २००२ ते २०१४ च्या दरम्यान १४ प्रतिशतने वाढलेले होते.

कष्टकरी वर्गाकरिता मुक्त व्यापार प्रतिकुल परिणाम घडवून आणणारा आहे. मात्र निगमामध्ये काम करणाऱ्या उच्चभ्रू वर्गाकरिता लाभदायक आहे. ब्रिटन मधील लंडन हे शहर अति उच्च उत्पन्न गटातील लोकांचे शहर आहे. असे असतांना देखील उत्पन्न आणि संपत्तीमध्ये वाढ घडून येतांना दिसली नाही. प्रत्यक्षात याचे प्रतिबिंब असे उमटले की, लोकांनी सार्वमताचा मार्ग निवडून युरोपियन समुदायातून बाहेर पडण्याचा निर्णय दिला. लंडन शहर सोडून ब्रिटन मधील इतर भागातील लोकांनी ब्रेग्झिटच्या बाजूने निर्णय दिला तर लंडन शहराने ब्रेग्झिटच्या विरूद्ध निर्णय दिला हे देखील लक्षात घ्यायला पाहिजे.

ब्रिटीश लोक बोलत होते की जागतिकीकरणामुळे सर्व लोकांसाठी संपत्ती आणि समृद्धता निर्माण होणार आहे. मात्र ते बोलले नव्हते की यामधून युद्धे देखील निर्माण होणार आहे. जागतिकीकरणातून मर्यादित प्रमाणात संपत्ती निर्माण झाली आणि सामाजिक मनोरा (social pyramid) कोसळला. The equality trust च्या अहवालानुसार ब्रिटनमधील तळातील १० प्रतिशत लोकांचे सरासरी उत्पन्न ८,४६८ पाऊंड होते तर वरच्या उत्पन्न गटातील १० प्रतिशत लोकांचे उत्पन्न दहापट जास्त होते. म्हणजेच वेतनदरामध्ये उच्चत्तम विषमता होती. वरच्या उत्पन्न गटातील १ प्रतिशत लोकांचे उत्पन्न २,५९,९१७ पाऊंड होते तर यामधील ०.१ प्रतिशत लोकांचे सरासरी उत्पन्न ९,४१,५८२ पाऊंड होते. प्रत्येक वेळी अरिष्ट होत असतांना वर्गयुद्ध घडून येत होते. ही वर्ग युद्ध विषमतेमुळे घडून येत होते.

आर्थिक अनिश्चितता वाढल्यामुळे पूर्वीपेक्षा वर्गीय युद्ध मोठे होते. ब्रेग्झिटने दर्शविले की बाजार यांत्र कार्य करू शकत नाही. मुक्त बाजार प्रादेशिक विषमतेला नियंत्रित करू शकत नाही. ब्रिटनचे हे राष्ट्रीय प्रश्न होते. त्यामुळे ब्रिटनने विभक्तवादी भूमिका निवडली आहे. लंडन संपूर्णपणे युरोपियन बाजारामध्ये समाविष्ट असल्यामुळे त्याच्या आर्थिक व राजकीय शक्तीची घसरण झालेली आहे. ब्रिटन मधील लोकांची अपेक्षा आहे की उत्पन्न विषमता कमी होऊन रोजगाराच्या संधी वाढल्या पाहिजे. नाही तर वर्गयुद्ध घडू शकते. वर्ग युद्धातून वंशभेदाचा ध्वन्वार्थ निघतो आहे. त्यामुळे या वादप्रश्नावर नवीन प्रकारचे राजकारण होत आहे. संपूर्ण ब्रिटनमध्ये वंशविद्वेशातून हल्ले घडून आलेले आहे.

**ऋण अरिष्ट आणि मुलभूत हक्काचे विचलन :**

नवउदारमतवादी अर्थशास्त्रज्ञ आणि राजकीय शिस्तीच्या सामंजस्यामुळे एकच बाजाराची

(single market) संकल्पना अस्तित्वात येऊन युरोची निर्मिती झालेली होती. मात्र ही संकल्पना माहितीचा अभाव आणि वास्तव जगाकडे दुर्लक्ष या गृहितावर आधारलेली होती. त्यामुळे ही संकल्पना नैतिक धोक्याची आहे असे ग्रीस देशाच्या अनुभवावरून सिद्ध होते. ग्रीस मध्ये ऋण अरिष्ट घडून आले. हे अरिष्ट सोडवण्यासाठी जर्मनीच्या बँकांनी वित्तीय मदत केली. तसेच आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी आणि पश्चिमेकडील राज्याचा उपयोग करून बेलआऊट निधी (bailout fund) मिळविल्यानंतर देखील ग्रीस ऋण अरिष्ट सोडविण्यात अपयशी ठरला. त्याने ऋणाचे आकारमान लपविण्याचा फसवा मार्ग अवलंबला होता. ऋण बाजारामध्ये ग्रीस ने पुढाकार घेतला होता याचे कारण पश्चिमी राज्य हा सर्व खर्च करून घेतील आणि ऋणको देश कोणतेही नुकसान न होता यामधून बाहेर पडेल असे गृहीत मानले होते. त्यामुळे प्रतिकूल परिणाम होऊन ग्रीस ऋण अरिष्ट घडून आले.

एकूणच युरोपमध्ये सार्वजनिक पातळीवर ऋण अरिष्टाची समस्या दिसून आली. नवउदारमतवादी अर्थशास्त्रज्ञ आणि राजकीय नेत्यांनी ही समस्या सोडविण्याकरिता खर्चामध्ये कपात करायला सांगितली होती. बाजार लोकशाही (market democracy) मध्ये खर्च कपात घडवून आणण्याचे समर्थन करण्यात आले. ज्यामुळे राजकीय आणि सांविधानिक जोखमी वाढल्या होत्या. कठोर मापके आणि कल्याणकारी योजनामध्ये कपात केल्यामुळे गरीब वर्ग प्रभावित झाला. OECD देशाच्या तुलनेत ब्रिटनमधील गरीब वर्ग अधिक प्रभावित झाला. ९ डिसेंबर २०१० च्या निर्णयामुळे उच्च शिक्षणावरील खर्चा (अर्थसहाय्य) मध्ये ८० प्रतिशतने कपात करण्यात आली. यामुळे ब्रिटनमधील विद्यार्थी वर्ग प्रभावित झाला. हे सर्व घडून येण्याचे कारण राजकीय वर्गाला अतिआत्मविश्वास होता की, आम्ही या सर्व समस्या सोडवू शकतो.

जर्मनी देखील कठोर (austerity) धोरणांच्या अनुकूल होता. मात्र या धोरणानी जर्मनीमध्ये आर्थिक वृद्धी घडवून आणली नाही. जर्मनीने खाजगीकरण घडवून आणले, वेतनदरामध्ये कपात केली. निवृत्तीवेतन, सार्वजनिक क्षेत्रातील श्रमिक आणि आरोग्य सुरक्षा क्षेत्रामध्ये आर्थिक सुधारणा घडवून आणण्यात आल्या म्हणजेच नवउदारीकरणाच्या काळात शासनाची भूमिका संकुचित झाली. अशाच प्रकारची मापके ब्रिटनने सामाजिक क्षेत्रावर लावली होती. याचाच अवलंब पुढे पोर्तुगालने देखील केला, अशा प्रकारची धोरणे राबविण्याचा दबाव युरोपियन समुदाय सर्वच देशावर निर्माण करीत होता. ऋण भांडवलाचा प्रवेश वाढावा याकरिता अंदाजपत्रकिय आणि राजकोषीय धोरणामध्ये बदल केला जात होता.

युरोपच्या राष्ट्रीय शासनाने सर्वसामान्य लोक आणि एकीकरणाची उद्दिष्टे चुकवली (missing) होती. कारण प्रत्येक देशावर कर्ज होते. युरोपियन समुदाय ऋण समस्येतून सुटका करण्यास मदत करेल असे जर्मनीला देखील वाटत होते. सर्व देश समान आहे असे मानल्यामुळे मोठ्या देशाच्या प्रभावाचे नुकसान झाले त्यामुळे आपसात सदस्य देशांचे तंटे सुरू झाले. अशी प्रकरणे सोडविल्यास जर्मनी आणि फ्रान्स कार्यक्षम असल्याने सांगितल्या जाऊ लागले.

लहान सदस्य राष्ट्राकरिता युरोपियन समुदायाच्या पातळीवर संरक्षण धोरणाबाबत सहमती घडवून आणण्यात आली. कारण लहान सदस्य राष्ट्राची शासनाची भूमिका संकुचित झालेली होती. याचाच अर्थ युरोपियन समुदयाचे प्रशासन शक्तीशाली

राष्ट्रांकडे होते. युरोपियन समुदायाचे व्यवस्थापक सामाजिक अधिकार आणि दिर्घकालीन आर्थिक सुधारणांमध्ये संतुलन राखू शकले नाही. याचा परिणाम लोकशाही राज्यामध्ये तफावत दिसून आली. ही तफावत सर्वसामान्य लोक आणि धोरणकर्त्यांच्या दरम्यान होती. बाजार लोकशाही संकल्पना बेकायदेशीर कृत्य आहे हे युरोपियन समुदाय आणि आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीने समजवून घेतले पाहिजे. अंतिमत: युरोप खंडामध्ये अस्थिरता निर्माण झाली, आर्थिक सहकार्य आणि राजकीय एकिकरणातून संपन्नता निर्माण होईल असे आश्वासन दिले होते पण तसे घडून आले नाही. त्यामुळे असुरक्षितता वाढून ब्रेग्झिट घडले होते.

**ब्रिटनला युद्धांची पार्श्वभूमी :**

ब्रिटीश अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ म्हणजे शस्त्रात्र निर्माणी पेढ्या आणि शस्त्रत्राची विक्री आहे. ब्रिटन मधल्या वित्तीय युद्धामध्ये शस्त्रात्राचे दलाल गुंतलेले आहे. शीत युद्धाचा अंत झाला असला तरी अफगाणिस्तान, सोमालिया, सुदान, इराक, येमन, सिरिया आणि इतर ठिकाणच्या युद्धामध्ये ब्रिटन प्रमुख भूमिका पार पाडत आहे. जगातील प्रमुख युद्धांमध्ये ब्रिटन गुंतलेला आहे. अंदाजपत्रकीय तुटीमध्ये यावर दुर्मिळपणेच चर्चा घडून येत होती. युद्धावरील पैशाच्या स्वरूपात होणाऱ्या खर्चावर देखील चर्चा फारशी होत नव्हती. ब्रिटन नाटोचा (North Atlantic Treaty Organisation - NATO) सदस्य देश देखील आहे. एकूणच संपूर्ण जगामध्ये नाटो संघटना युद्ध आणि शस्त्रात्र कार्यक्रमाच्या बाबतीत निर्दयी म्हणून प्रसिद्ध आहे. युरोपियन समुदायाचे सामान्य विदेशी धोरण आहे. याला जोडून संरक्षण धोरणातंर्गत एकीकरणावर चर्चा घडून येत होती. या संरक्षण एकीकरणाच्या धोरणामध्ये ब्रिटन राहणार होता का? हा खरा वादप्रश्न होता.

यामधून हीच ब्रेग्झिटची मोहिम सुरू झाली. ब्रिटनच्या युरोपियन समुदायातील सदस्यताबाबत नाटो म्हणाले की, ''राहायाचे नाही आणि शिल्लक ठेवायचे नाही.'' बराक ओबामा ह्यांनी ब्रिटनला विनवणी केली की, संरक्षण सहकार्याकरिता ब्रिटनने युरोपच्या बाजूने असावे. युरोपियन समुदायाला मदत करावी. या सर्व मोहिमेला ब्लादीमिर पुतिन सहाय्य करीत होते. कारण या सर्वांचा खरा लाभधारक रशिया ठरणार होता. गेल्या काही वर्षामध्ये विरोधामुळे शासनाच्या भूमिकेत व्यापकता आली होती. या सर्व प्रक्रियेत रशिया असतांना वित्तीय मदत देखील करणार होता. त्याच्या या कारणाला करूणा असेल तर तो केवळ राजनयांचा भाग होता. अमेरिका युद्धपिपासू देश असून या सर्वामध्ये युरोप महत्त्वाचा घटक होता. अमेरिकेचा पूर्वेला विस्तार करण्याची महत्त्वाकांक्षा होती त्यामुळे पोलंड आणि युक्रेनचे लष्करीकरण करण्यात आले होते. तर रशियाला याबाबत पुर्नविचार करण्याची गरज होती. या सर्वांमुळे नाटो प्रभावित झाला होता.

जॉन कॅरीने सार्वमताचा निकाल जाहीर केला आणि युरोपियन समुदायातून बाहेर पडण्याचा मार्ग मोकळा झाला. याचवेळी अमेरिका स्वत:चे राष्ट्रीय हीत जपण्याचा प्रयत्न करीत होता. नाटो किंवा Transtanic Trade and investment partnership - TTIP अंतर्गत वाटाघाटी झाल्या होत्या. तरी देखील हे विसरल्या गेले होते की, युरोपियन समुदाय प्रकल्प हा अमेरिकेने पुरस्कृत केलेला होता. जागतिक महायुद्धानंतर केंद्रीय बौद्धिक अभिकरण (Centre Intelligent Agency) ने या प्रकल्पाला सहाय्य केले होते. हे सहाय्य हॅरी ट्रूमन पासून रिचर्ड निक्सन अध्यक्ष असेपर्यंत करण्यात आले. संयुक्त युरोप हा सोव्हियत रशियाला प्रतिस्पर्धी

आणि कराराच्या आधारावर उभा करायचा होता. त्यावेळी अमेरिका नाटोच्या उपयोग रशियाला वेढा घालण्याकरिता करीत होता. तर पूर्वेकडे विस्तार घडून येण्यासाठी युक्रेनला चिथावण्यात आलेले आहे. यादरम्यान ब्रिटनने सार्वमत घेऊन युरोपियन समुदायातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या एकाच वेळी गती देणे अधिक कठीण झालेले आहे.

नाटोने पोलंड मधील वार्स्वा मध्ये ८ व ९ जुलै २०१६ रोजी ब्रेग्झिटच्या पार्श्वभूमीवर बैठक बोलवली होती. मात्र नाटोने सर्व भर रशियाविरूद्ध युद्धसामुग्रीच्या बांधणीवर दिला होता. या बैठकीमध्ये ओबामा म्हणाले की, ब्रेग्झिटचे संक्रमण होतांना कायदा आणि शांतता आवश्यक आहे. रशिया विरूद्ध जाणे म्हणजे युरोपला धोक्यात घालणे आहे. ओबामा म्हणाले की, युरोपच्या एकत्रिकरणामुळे जे संपादन केले आहे. त्याची आपण हानी करणार नाही. कॅमरून ह्यांनी युरोपियन समुदायातून बाहेर पडण्याच्या वेदना व्यक्त करीत असतांना नाटोसंबंधीच्या बांधिलकीमध्ये कोणत्याही प्रकारचा फरक पडणार नाही आणि रशियाच्या विरूद्ध आपली भूमिका बदलणार नाही याची हमी दिली. त्याचबरोबर सूचित करण्यात आले की युरोपियन समुदायाला गंभीर धोका रशियाकडून आहे. ब्रेग्झिट घडून आल्यामुळे ब्रिटनचे संबंध प्रभावित होतील. यादरम्यान ब्रिटनला आपल्या छावण्या पोलंड, इस्टोनिया आणि युक्रेन मध्ये विस्तृत तयारी आणि संघर्षासाठी रशिया विरूद्ध तयार ठेवाव्या लागतील. यामुळे देखील ब्रिटन युरोपियन समुदायाची बाहेर राहू इच्छित आहे. युरोपियन समुदायाची सर्वसामान्य संरक्षण धोरणे ब्रिटनकरिता अडथळा होईल यामुळे ब्रेग्झिट अंमलात आले.

**समारोप :**

ब्रेग्झिट घडून येण्यामध्ये ब्रिटनचे आर्थिक राजकीय, लष्करी हित दडलेले आहे. नवउदारीकरण धोरणांचा स्विकार केल्यामुळे ब्रिटनचा आर्थिक गोंधळ झालेला आहे. म्हणून ब्रिटनमध्ये ऋण अरिष्ट, उत्पन्न विषमता, वर्गीय युद्ध आणि मुलभूत सेवामध्ये कपात घडून आलेल्या आहे. याचाच अर्थ नवउदारीकरणाची धोरणे ब्रिटनमध्ये संपूर्णपणे अपयशी ठरलेली आहे. युरोपियन समुदायाचा सदस्य ब्रिटन असल्यामुळे आपला ठसा जगाच्या राजकारणामध्ये उमटविण्याकरिता स्वतंत्रपणे निर्णय होऊ शकत नाही, जगातील विविध युद्धाशी ब्रिटनचा संबंध आहे. ब्रिटनचे लष्करी हीत जपण्यामध्ये युरोपियन समुदाय आडकाठी ठरत आहे. परिणामत: ब्रिटनने युरोपियन समुदायातून बर्हिगमनाचा निर्णय घेतला आहे.

**संदर्भ सूची :**


1. साठे मधुसूदन (२००८) : युरोपची आर्थिक प्रगती, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
2. Pinder John and Ushewood Simon (2013) : The European Union, Oxford Univ.,UK.
3. Persaud Avinash (2016) : Brexit and other Hirbingars of a return to dangerous of 1930's Vol. L1 No. 33, Aug. 13 EPW.
4. D'souza Radhu (2016) : Britain Global chicken coming Home to Roost Vol. L1, No. 33, Aug 13,EPW.
5. Sarkar Abhijit (2016) : Spoil of Brexit for India, Vol. L1 No. 33, Aug. 13, EPW.
6. Dey Shamabu (2016 ) : Fall of Market Democracy, Vol. L1, No. 33, Aug. 13, EPW.
7. Nikarge Sachin (2016 ) : The Big exit and It's Global Bricolage, Vol. L1, No. 33, Aug. 13, EPW.
8. Wariavwall Bharat (2016) : Europe after Britain's Departure : Community to Nation State, Vol. L1, No. 33, Aug. 13, EPW.
9. Oncli T. Sabari (2016) : Is Brexit Moment a Lehaman Moment ? Fear factor in Financial crisis, Vol. L1, 29, July 16, EPW.


◆◆◆

# विदर्भ अर्थशास्त्र परिषद

## वार्षिक अधिवेशनांचे अध्यक्ष

| अ.क्र. | अधिवेशनाचे स्थळ | वर्ष | अधिवेशनाचे अध्यक्ष |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | १९७०-७१ | डॉ. बी.आर. ढेकणे |
| २ | एन.एम.डी. महाविद्यालय, गोंदिया | १९७१-७२ | प्रा.सु.द. बाळ |
| ३ | भारतीय महाविद्यालय, अमरावती | १९७२-७३ | डॉ. के.आर. नाणेकर |
| ४ | श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला | १९७३-७४ | प्रा.ग.प्र. पिंपरकर |
| ५ | यशवंत महाविद्यालय, वर्धा | १९७४-७५ | प्राचार्य रा.ना. खर्चे |
| ६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | १९७५-७६ | डॉ. श्री.आ. देशपांडे |
| ७ | जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा | १९७६-७७ | प्रा.आर.एम. जोशी |
| ८ | सी.पी. ॲन्ड बेरार महाविद्यालय, नागपूर | १९७७-७८ | डॉ.ए.पी. हरदास |
| ९ | एस.पी.एम महाविद्यालय, चिखली,जि. बुलढाणा. | १९७८-७९ | प्रा. ए.एन. लोथे |
| १० | बाबाजी दाते कला वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ | १९७९-८० | प्रा.एस.आर. ओझरकर |
| ११ | धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर | १९८१-८२ | डॉ.एस.एल.लोकरे |
| १२ | आदर्श महाविद्यालय, धामणगांव रेल्वे, जि.अमरावती. | १९८२-८३ | प्रा.एस.ए.पाटील |
| १३ | सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर. | १९८८-८९ | डॉ. व्ही.एस.शेणवाई |
| १४ | महात्मा फुले महाविद्यालय, वरूड, जि.अमरावती. | १९८९-९० | डॉ.एस.व्ही.खांदेवाले |
| १५ | यशवंत महाविद्यालय, सेलू, जि.वर्धा. | १९९०-९१ | डॉ.एस.व्ही.जांवधिया |
| १६ | फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद, जि.यवतमाळ | १९९१-९२ | प्रा.के.आर.खेरडे |
| १७ | कर्मवीर महाविद्यालय, मूल | १९९२-९३ | डॉ.डी.एस.वखरे |
| १८ | शासकीय ज्ञान विज्ञान संस्था (विदर्भ महाविद्यालय) अमरावती. | १९९३-९४ | डॉ.सौ.सुनंदा सोनारीकर |
| १९ | राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्ालय, चिमूर. | १९९४-९५ | प्रा.व्ही.एस.कुळकर्णी |
| २० | जगदंबा महाविद्यालय, अचलपूर, जि.अमरावती. | १९९५-९६ | डॉ.सौ.अंजली कुळकर्णी |
| २१ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | १९९६-९७ | प्रा.डी.आर.अग्रवाल |
| २२ | जी.एस.कॉलेज, खामगांव, जि.बुलढाणा. | १९९७-९८ | डॉ.आर.वाय.माहोरे |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | १९९८-९९ | डॉ.दि.व्यं.जहागिरदार |
| २४ | राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय, नांदगांव (खंडेश्वर), जि.अमरावती. | १९९९-२००० | डॉ.व्ही.एम.वैद्य |
| २५ | सी.पी.ॲन्ड बेरार महाविद्यालय, नागपूर. | २०००-०१ | प्रा.एस.एन.अंभोरे |
| २६ | कै.ना.अ.देशमुख महाविद्यालय, चांदूरबाजार, जि.अमरावती. | २००१-०२ | प्रा.के.ई.पाटील |
| २७ | लोक महाविद्यालय, वर्धा. | २००२-०३ | प्राचार्य एन.एफ.सुदा |
| २८ | जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा. | २००३-०४ | प्राचार्य डॉ.आर.जी.भोयर |
| २९ | एस.एन.मोर महाविद्यालय, तुमसर, जि.भंडारा. | २००४-०५ | प्रा.एस.एस.देशमुख |
| ३० | श्री.म.द.भारती महाविद्यालय, आर्णी, जि.यवतमाळ. | २००५-०६ | डॉ.सौ.पुष्पा इंदूरकर |
| ३१ | बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, खापरखेडा, जि.नागपूर. | २००६-०७ | डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार |
| ३२ | श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती. | २००७-०८ | प्राचार्य डॉ.पुष्पा तायडे |
| ३३ | जनता महाविद्यालय, चंद्रपूर. | २००८-०९ | प्रा.कमलाकर हनवंते |
| ३४ | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगांव, जि.यवतमाळ | २००९-१० | डॉ.एस.पी.कुळकर्णी |
| ३५ | न्यु आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, वर्धा. | २०१०-११ | प्रा.एन.ए.पिस्तुलकर |
| ३६ | आप्पास्वामी महाविद्यालय, शेंदुरजना (अढाव), जि. वाशिम. | २०११-१२ | प्राचार्य डॉ.आर.जी.टाले |
| ३७ | वसंतराव नाईक कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर. | २०१२-१३ | डॉ.आर.आर.गव्हाळे |
| ३८ | इंदिरा गांधी कला विज्ञान महाविद्यालय, राळेगाव, जि.यवतमाळ | २०१३-१४ | प्राचार्य डॉ.संजय धनवटे |
| ३९. | शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय, अर्जुनी/मोर, जि.गोंदिया. | २०१४-१५ | प्राचार्य डॉ. वनिता चोरे |
| ४०. | बी.बी.आर्टस, एन.बी.कॉमर्स आणि बी.पी. सायन्स कॉलेज, दिग्रस, जि.यवतमाळ | २०१५-१६ | डॉ. विनायक देशपांडे |
| ४१ | विद्यासागर कला महाविद्यालय, खैरी (बिजेवाडा) ता. रामटेक, जि.नागपूर. | २०१६-१७ | डॉ. एच.आर.तिवारी |